म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. नं. 350

# स्त्रियांचा प्रश्न

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.
REFBK-0005318

ज. ना. ढापरे

REFBK-0005318
नं. ९४५
ता.
दा. क्र. ५३१८

# स्त्रियांचा प्रश्न.

“स्त्रियांचा प्रश्न” हा विषय मी लिहिण्यास घेतला आहे याचें कारण असें कीं आपल्याकडे आजकाल ज्या सामाजिक चळवळी सुरु आहेत त्यापैकीं कोणत्याही प्रश्नापेक्षां ‘स्त्रियांचा प्रश्न’ यालाच आज अधीक महत्व आलेले आहे. आज ‘संजीवनी’ ‘माहिला’ ‘किर्लोस्कर’ ‘स्त्री’ ‘यशवंत’ ‘सत्यकथा’ वगैरे मासिकें हातात घ्या, सुधारणा, नवमतवाद प्रतिपादन करण्याकरतां म्हणून प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्या, गुजगोष्टी पहा—त्यांच्या प्रमुख पृष्ठांवर तर तुम्हाला स्त्रीचें चित्र दिसेलच दिसेल, पण आंत देखील स्त्री विषयाचीच चर्चा अधिक प्रमाणांत केलेली आढळून येईल; इतकेंच नव्हे तर केवळ स्त्रियांच्याकरतां वाहिलेली अशी स्वतंत्र मासिके निघालेली आहेत; त्याच्याही पुढें जाऊन एका मासिकानें मजल मारली आहे, ‘महिला’ मासिकाला तर पुरुषाचा वाराही लागतां कामा नये इतकें तें सोवळें बनवलें आहे; अशा रीतीनें स्त्रियांच्या प्रश्नाला आज महत्व आले आहे; त्यांच्या हक्काचा आणि स्वातंत्र्याचा लढा जोरांत सुरु झालेला आहे.

मला वाटतें परमेश्वरानें स्त्री ही वस्तूच अशी कांहीं विचित्र आणि विलक्षण निर्माण केलेली आहे कीं जगाच्या आरंभापासून तों आज तागायत कोणत्याही काळांत पहा ‘स्त्रियांचा प्रश्न’ यालाच प्रमुख स्थान मिळत गेलेले आहे. महाभारत घ्या त्यांत द्रौपदीची विटंबना, रामायण घ्या त्यांत रावणाचें सीताहरण, त्यानंतरचा अगदीं अलीकडचा म्हणजे

मुसलमानांचा काळ घ्या त्यांनीं हिंदुंचा धर्म बुडवला, देवळें उध्वस्थ केली, द्रव्य लुटले तरी त्याकाळींही स्त्रियांचें रक्षण करणें हा समाजापुढें मोठाच प्रश्न येऊन पडला होता आणि आज आपण एवढया मोठ्या सुधारलेल्या काळांत जन्मास आलों आहोत तरी देखील स्त्री–जीवनाचा लढा सारखा सुरुं आहेच आणि मागच्या अनुभवावरुन असेही विधान केलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं कीं आजच्या ज्या स्त्रिया स्वातंत्र्याकरतां आणि समान हक्काकरतां पुरुषाशीं भांडत आहेत त्यांना ती स्वतंत्रता किंवा तें समान हक्क प्राप्त झालें तरी देखील पुढें मार्गे तिसराच कांहींतरी एक नवीन पंथ त्या काढतील किंवा परिस्थितीनें निघेल कीं तत्कालीन समाजापुढेंही स्त्रीजीवनाचाच प्रश्न प्रामुख्यानें उभा राहील.

आजच्याही समाजापुढें हाच प्रश्न प्रामुख्याने उभा राहिलेला आहे. स्त्रियांना शिक्षण पाहिजे, त्यांना स्वातंत्र्य पाहिजे, त्यांना पुरुषांच्या बरोबरीचें हक्क पाहिजेत, त्यांचे विवाह अज्ञान स्थितींत न होताना प्रौढपणी त्यांच्या सज्ञानस्थितींत त्यांच्या पसंतीनें, आवडीनें झाले पाहिजेत, विधवांचे विवाह झपाट्यानें सुरू झाले पाहिजेत, त्यांच्या उपजीविकेची स्वतंत्र अशीं निरनिराळीं साधनें निर्माण झाली पाहिजेत, त्यांना कलाकौशल्य शिकविले पाहिजे, एकत्र कुटुंबांतील विधवांना नवऱ्याइतकेंच हक्क मिळालें पाहिजेत, स्त्रियांना घटस्फोटाचा कायदा प्राप्त करून दिला पाहिजे. एकंदरीत जेणेंकरून आयुष्यांत स्त्रियांना कांहीचेही दुःख न होता समाजांत त्यांना स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग घ्यावयास मिळेल अशी व्यवस्था झाली पाहिजे अशी ही स्त्रियांच्या बाबतींतील आजच्या समाजाची घोषणा सारखी सुरू आहे.

वास्तविक स्त्रियांच्या सुधारणेचे हे वरील मार्ग आजचे नसून गेली पन्नास वर्षें त्याची सारखी चर्चा सुरूं आहे, आणि त्या दृष्टीनें प्रयत्नही झाले आहेत. लो. टिळक, न्या. रानडे, आगरकर वगैरे पासून ते आज हयात असलेले प्रो. कर्वे, रा. देवधर पर्यंत सर्वांनीं स्त्रियांच्या सुधारणेची

कोणती बाजू उचलून धरलेली नाहीं असें झालेलेच नाहीं. त्यांनीं शाळा कॉलेजें, युनिव्हर्सिट्या स्थापना केल्या, अनाथबालिकाश्रम काढले, विधवा विवाहोत्तेजक संस्था निर्माण केल्या, सेवासदनें उघडलीं, अनाथ अर्भकांचें जीव वांचवण्याकरतां पंढरपूर वगैरेसारख्या ठिकाणीं संस्था काढल्या, शारदा कायदा पास करून घेतला, घटस्फोटाचा कायदा होऊं घातला आहे, एकंदरीत जे जे शक्य तें तें सर्व त्यांनीं केलें आहे. स्त्रीशिक्षणाला, स्त्री स्वातंत्र्याला जेवढें उत्तेजन द्यावयास पाहिजे तेवढें दिलें आहे.

तरी दुःखाची आणि दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, पन्नास वर्षांपूर्वीची ओरड आणि आजची ओरड यांत फारसा फरक पडलेला दिसून येत नाहीं. उलट सुधारणेच्या या पन्नास वर्षांच्या इतिहासाकडे पाहिलें तर असेंच आढळून येईल कीं, आरंभाआरंभाला स्त्रियांना शिक्षण मिळाल्यामुळें, स्वातंत्र्य मिळाल्यामुळें त्या सुधारत चालल्या असे त्यावेळच्या सुधारकांना वाटलें. आणि असेंच शिक्षण आणि स्वातंत्र्य कायम ठेवलें तर त्यांची उत्तमप्रकारें सुधारणा होईल अशी आशा करायला त्यांना जागा होती परंतु आजची त्यांची स्थिति पाहिली कीं मोठीच निराशा होते. त्यांची स्थिति सुधारण्याऐवजीं ती अत्यंत शोचनीय अशी होऊन बसली आहे. एकेकाळीं पुरुषांच्या शिक्षणाला जें महत्त्व होतें तें आज उरलेलें नाहीं. स्त्रियांच्या शिक्षणालाही आरंभाआरंभाला पुरुषाच्या शिक्षणाइतकेंच महत्त्व होतें पण पुरुषांच्या शिक्षणासारखींच स्त्रियांचीही स्थिति होऊन बसली आहे. त्यांच्या स्वातंत्र्याकडे प्रथम प्रथम समाज सहानुभूतीच्या दृष्टीनें व किंचित् आदरानें पहात असे तोंच आज त्यांच्या स्वातंत्र्याकडे साशंक दृष्टीनें व कांहींसा अनादरानें पाहूं लागला आहे. आरंभाआरंभाला स्त्रियांना पुरुषाप्रमाणें पटापट नोकऱ्या मिळत गेल्यामुळें स्वतंत्र जीवन त्यांना फारसें त्रासदायक झालें नाहीं परंतु त्यांना आतां पुरुषाप्रमाणेंच नोकऱ्या मिळेनाशा झाल्या आहेत. त्यामुळें पैशाच्या अभावी स्वतंत्र जीवन

त्यांना जाचक आणि त्रासदायक वाटूं लागलें आहे. वैवाहिक जीवनाला फारसें महत्व न देतां स्त्रियांनीं अविवाहित राहून स्वावलंबी आयुष्य काढावें ही आवड किंवा सुधारणा आरंभाआरंभाला स्त्रियांना सुखदायक वाटूं लागली होती व समाजही तिकडे एक नवीन गोष्ट म्हणून कौतुकानें पहात असे. पण आजची एकंदर समाजाची आर्थिक स्थिति पालटून गेल्यामुळें विवाहाच्या बाबतींत स्त्रियांची स्थिति निराशाजनक झाली आहे. अविवाहित राहूं लागल्यामुळें त्या काटेरी कुंपणांतच अधिक प्रमाणांत अडकत चालल्या आहेत.

अशा रीतीनें चोहोकडून त्यांची सुधारणा होण्याच्याऐवजी त्यांना प्रत्येक गोष्टींत निराशा दिसूं लागली आहे. त्यांच्यांत तीव्र असंतोष माजला आहे. त्या पुरुषांशीं, समाजाशीं सारख्या भांडत सुटल्या आहेत. कधीं न मिळालेलें अन्न आधाशी ज्याप्रमाणें बकाबका खात सुटतो त्याप्रमाणें किती शिकूं, किती नटूं, किती थटूं, किती नाचूं, किती बागडूं, किती बोलूं, हसूं, किती प्रेमाच्या कानगोष्टी बोलूं, हितगुज किती सांगूं, पुरुषाच्या विरुद्ध किती लिहूं, मनूच्या नांवानें किती खडे फोडूं, धर्म-रूढी-शास्त्र याच्या-विरुद्ध किती ओरड करूं असे आजच्या स्त्रियांना झालें आहे. प्रत्येक गोष्टींत त्यांनीं अतिरेक करून सोडला आहे. त्यांचें बोलणें, त्यांचें चालणें, त्यांचें नेसणें यांत नाविन्य असले तरी स्त्रीत्वाची बाजू झुगारून देऊन पुरुषी ऐट ओतप्रोत भरलेली दिसते. जाणूनबुजून थोडा आचरटपणाही स्वीकारल्याचें आढळून येते; त्यामुळें त्यांच्याविषयीं आदर प्रेम उत्पन्न होण्याचें ऐवजीं अनादर मात्र उत्पन्न होतो. आपण चांगलें दिसावें ही जी मनांतली अस्फुट इच्छा असते त्याचेऐवजीं ती एक न पहाण्यालायक वस्तु होऊन बसते. तोंडाला पावडर फासून माणसाच्या चेहेऱ्याला माकडाचें रूप देण्यांत स्त्रियांना काय स्वारस्य वाटत असेल ते त्यांचे त्यांनाच ठाऊक! केसाची एखादी बट वाऱ्याच्या ओझरत्या लहरीनें गालावर रुळत राहिली तर

नि- ता.

कदाचित् त्यांत एखाद्याला थोडी मौज वाटेल पण बेछूट मोकळे सोडलेले सर्व केसच जर वादळानें उडत असलेल्या गवतासारखे डोक्यावर पसरूं लागले तर त्यांत काय शोभा असणार? कित्येक स्त्रिया तर आपले दोन्ही कानच केसांनी झाकून टाकतात आणि खरोखर जे भाग झाकले जावेत ते उघडे पडलेले असले तरी त्याची त्यांना पर्वा वाटत नाहीं. सुधारणेच्या बाबतींतील ही त्यांची उतावळी समाजाच्या डोळ्यांत सलूं लागली आहे. आजच्या स्त्रियांचा पुरुषांवर विश्वास नाहीं. आज त्या पुरुषाच्या मदती-शिवाय आपली उन्नति करण्यास धाव घेत आहेत. स्वतंत्र जीवन, स्वावलंबन समान हक्क या कल्पना त्यांच्या डोक्यांत शिरल्यामुळें पुरुषांशीं त्यांची सहकारिता नाहीं--असहकारिता आहे. प्रेम नाहीं द्वेष आहे. सलोखा नाहीं भांडण आहे, पुरुषांच्या स्वातंत्र्यावर, हेतूवर, आचारावर त्या उघड उघड हल्ला करीत आहेत; पुरुष जुलमी, अन्यायी म्हणून त्या त्यांना तुच्छ लेखीत आहेत. पुरुषाशीं सहवास नको, त्यांचेपासून अलग तुटून स्वतंत्र राहून आपलें जीवन हाकण्याकडे त्यांची प्रवृत्ति दिसून येत आहे. त्यांना पुरुषाशीं वागताना कायदा पाहिजे, हक्क पाहिजे;

आमच्या मतें स्त्रियानी कायद्याच्या हक्काच्या जोरावर आपली सुधारणा आणि उन्नत्ती करून घेण्याचा जो हा मार्ग स्वीकारला आहे तो साफ चुकीचा आहे. हे जे जग चालले आहे ते कायद्याच्या आणि हक्काच्या जोरावर चाललें नसून त्याची सर्व उभारणी सहकारितेच्या, सहानुभूतीच्या, प्रेमाच्या पायावर झालेली आहे; या जगांत कायद्यानेच जर आपणाला चालायचे म्हटले तर भूतदया प्रेम परोपकार हे शब्दच त्या ठिकाणीं येऊं शकत नाहींत. मग प्रत्येकानें आपापलें हित पहावे-कोणी कोणासाठीही तळमळायचें कारण नाहीं-कोणी कोणासाठीही झीज सोसायला नको, देह कष्टवायला नको, कोणी कोणासाठी ही स्वार्थत्याग करायला नको असा जगाचा न्याय होऊन असेल; एक सुखानें नांदतो आहे नांदो बिचारा, दुसरा दुःखाश्रू ढाळीत

पडला आहे पडेना बापडा-आम्हाला काय त्याचे,-एक बायकोच्या पायावर लोटांगण घालीत आहे, घालेना, दुसरा बायकोला पायाखालीं तुडवीत आहे, मरेना तो तिकडे, आम्हाला त्यांत लक्ष घालण्याचें कारण ?-समाजांत अनाथ पोरकीं पोरे आहेत-ती जगोत नाहीतर मरोत-समाजाला,दुसऱ्याला, शेजाऱ्याला काय त्याचे, विधवांची स्थिति करुणाजनक आहे, असेना-त्यांच्या नशीबांतच जर सुख नसेल तर समाजानें त्याला काय करावे; प्रो. कर्व्यांनी स्त्रियांकरतां एवढी धडपड करण्याचें कारण काय; नाथीबाई ठाकुरसीला आपली संपत्ती काय जड झाली होती. कै. गोखले. गो. मा. चिपळूणकर वगैरे मंडळींना स्त्रियांच्या उद्धाराच्या पायीं आपली आयुष्यें खर्ची घालण्यापलीकडे त्यांना दुसरा कांहीं उद्योग नव्हता कीं काय ? यावरून एक गोष्ट सिद्ध होत आहे कीं कायद्यानें, हक्कानें हें जग चालत नसते.

परंतु दुर्दैवाची गोष्ट आहे कीं आजच्या स्त्रियांना कायदा पाहिजे, हक्क पाहिजे, अनैसर्गिक असें स्वातंत्र्य पाहिजे. त्याचा परिणाम काय झाला आहे तो दिसतच आहे. आज जिकडे तिकडे असंतोष, भांडण, बेकारी, द्वेष वाढला आहे. वास्तविक स्त्रीपुरुषांत किती गोडी रहावयास पाहिजे ? नवरा बायकोंत किती प्रेम असावयास पाहिजे ? कुटुंब म्हणजे एक स्वर्गीय आनंद वाटावयास पाहिजे. पण आज तें प्रेम नाहींसें होऊन कायदा पाहिजे,करार पाहिजे. हक्क पाहिजे ही इच्छा समाजांत पसरली आहे. आमच्या मते स्त्रियांचे खरें स्वातंत्र्य म्हणजे त्यांनीं पुरुषाशीं विवाहबद्ध होऊन प्रजोत्पादन करणें, गृहस्थाश्रम स्थापून योग्य असे आचरण ठेवणें—तो त्यांचा खरा धर्म--त्यांच्या जीवनाचा खरा संसार तो—त्यांत त्यांचा खरा आनंद; परंतु या सर्व गोष्टींचा विचार आणि चर्चा विस्तारानें करण्यापूर्वी पूर्वीचा आपला समाज कसा होता, त्यांत स्थित्यंतर कसकसे घडत गेले आहे, त्यापासून समाज सुधारला कां अधोगतीला गेला, त्यांत आनंद, संतोष, शांतता, नांदू लागली आहे कां त्याच्या उलट असंतोष माजला आहे या गोष्टीचा प्रथम विचार करूं या.

## ( २ ) पूर्वींच्या समाजाची स्थिति.

पूर्वींच्या समाजाचा परमेश्वरावर आणि कुटुंबांतील लहान थोर मंडळींचा कर्त्या पुरुषांवर पूर्ण विश्वास असे. धर्माला भिऊन नीतीनें व सदाचरणानें वागणें हें तो कर्तव्य समजत असे. वाडवडिलांनीं आंखून दिलेले मार्ग, त्यांनीं चालविलेले आचार, पाडलेल्या रूढी यावर कर्त्या पुरुषाचा पूर्ण विश्वास असें:—आणि तेच आचार तो आचरणांत आणीत असे. कर्त्या पुरुषांवर अवलंबून असणाऱ्या माणसांना त्या पुरुषांविषयीं आदर भीति व अभिमान वाटत असे. तो कुटुंबाचा हितकर्ता आहे ही त्यांची समजूत असें. भाऊ अगर मुलगा बरोबरीचा झाला असला तरी वडील माणसांना मान देण्यांत, त्यांचे आज्ञेंत रहाण्यांत कमीपणा किंवा अपमान वाटत नसे. ते जे जे करतात ते ते सर्व आपल्या हिताचें असते या विश्वासानें तें एकत्र-पणांत आनंदाने रहात असत. त्यामुळें प्रत्येकाला कोणत्याही प्रकारचीं स्वतंत्र अशी मतें नसत, कोणालाही स्वतंत्र अशी जाबाबदारी वाटत नसे, फार काय पण लग्न होऊन चार पोरेंबाळें झालेल्या मुलाच्या हातून एखादे वेळीं चुकून अपराध घडला किंवा वडील माणसांचा अपमान केला गेला आणि रागाच्या भरांत बापानें एखादे वेळीं मुलाच्या मुस्काडीत भडकाविली तरी देखील त्या मुलाची वर तोंड करून उलट बोलण्याची छाती होत नसे; पुरुषांची ही स्थिति होती मग बायकांची मर्यादा सुटलेली कोठून आढळ-ण्यांत येईल ? समाजांत प्रतिष्ठित कुटुंब, कुलशीलवान कुटुंब गणलें जावे म्हणून पुरुषही स्त्रियांना मानानें वागवींत असत; स्त्रियांना उंची उंची वस्त्र प्रावरणांनीं आणि दागदागिन्यांनीं सुशोभित करण्यांत ते स्वतःला धन्य मानीत आणि आज एखादी बी. ए. एम्. ए. झालेली विदूषी पाहिली कीं ज्याप्र-माणें मनांत आदर उत्पन्न होतो तसे पूर्वी गोठ तोड्याची बाई पाहिली कीं

आदर वाटत असे; त्यांतच स्त्रियाही खूष असत व अशा समाधान स्थितींत राहूनच त्या संसार आनंदानें चालवीत असत. कुणीही बाहेरचा पाहुणा आला तर फलाफुलांनीं गजबजलेली बाग पाहून ज्याप्रमाणें मनाला आनंद वाटतो त्याप्रमाणें म्हाताऱ्याकोताऱ्यापासून तो सुनालेकी मुलेंबाळें यांनीं गजबजलेले घर पाहून मनाला आनंद वाटत असे. पुरुषांना उदर निर्वाहा-पुरतें व्यवहारी शिक्षण दिले आणि मुलींचीं लग्नें लावून टाकली म्हणजे दोघांच्याही आयुष्याची कर्तव्यें संपली असें समजून चालणारा तो काळ होता. पुरुषांच्या रूपाकडे स्त्रिया लक्ष न देतां पदरीं पडलेला पती हा देव त्या मानीत व पुरुषही प्रथम जी मुलगी सांगून आली ती 'लक्ष्मी' घरीं आली, ती परत पाठवावयाची नाहीं, फक्त ती चांगल्या कुळांतली आहे कीं नाहीं एवढें पाहिलें कीं झाले असे समजून तिला पत्करीत, घरीं आल्यावर बायको दोन वेळेला जेवावयाला घालते. संसाराचा गाडा उत्तम रीतीनें हाकते—झाली ना तिला चार पोरें बाळें—धन्य झालो एवढ्या समजूतीवर कुटुंब आणि समाज आनंदात सुखांत चालला होता. पूर्वीच्या स्त्रियांना कुटुंबाची दुःखें व वडील माणसांकडून होणारा जुलूम निमूटपणें सोसणें हा धर्म वाटत होता. पतीवर निस्सीम प्रेम करणें, त्याला देव मानून त्याच्याशीं एकनिष्ट रहाणें, त्याला आपल्यापेक्षां श्रेष्ठ व पूज्य मानणें, आपल्या सौभाग्याशी पतीचा अखंड संबंध आहे व त्यामुळेंच आपण सुखी आहोंत असें मानणे हें त्यांना भूषण वाटे. त्यांच्या सुखाच्या स्वातंत्र्याच्या कल्पना एकट्यापुरत्या, संकोचित वृत्तीच्या व स्वार्थमूलक नसून कुटुंबाच्या आणि पतीच्या सुखांत त्या समरस होत असत; सर्वांचे सुख तें आपलें सुख आणि सर्वांच्या दृष्टीला जे चांगलें दिसतें तें आपलें भूषण असें त्या मानीत. आपले शरीर आपलें घर आणि त्यांतील माणसें यांत त्या भेद मानीत नसत; शरीराला नटवणें काय आणि घर शोभीवंत करणें काय हें त्यांना सारखेच वाटे. त्यांचा निसर्ग, त्यांची शोभा,

त्यांचा सखा, त्यांचा मित्र, त्यांची करमणूक, म्हणजे सर्व घर असें. कोकिळेचे कूजन ऐकायला त्यांना घराबाहेर जावें लागत नसे. वृद्ध बाय-कांनीं पहाटे ' घनःश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय जाइला । उठि लवकरि वनमालि उदयाचळी मित्र आला । ” असली गोड भूपाळी म्हंटली कीं सर्व जगाचं गाणं आणि त्यापासून होणारा आनंद त्यांत आला. आधुनिक स्त्रीपुरुषाप्रमाणें घरचे सौंदर्य टाकून निसर्गाची शोभा पहायला त्यांना एखाद्या टेकडीवर किंवा ओढ्याचा काठी बसावयाला जाण्याचें कारण पडत नसे. त्यांचे अंगण,तें झाडून झोडून स्वच्छ करणें, सडासंमार्जन करून त्यावर पतीच्या किंवा देवतांच्या नांवाच्या रंगवेलिका काढणें हीच त्यांची मोठीं करमणूक असे; पुरुष उठायचें आंत वेणीफणी करून त्यांच्या सेवेला तत्पर रहाणें हेंच त्यांचे कर्तव्य त्यांना वाटे. त्यांत दास्यत्व, कमीपणा येतो ही शंकाही त्यांच्या मनाला शिवत नसे. मला कुणी माझ्या जिवाचा सखा भेटेल कां म्हणून आजच्या तरुणीप्रमाणें उसासे टाकीत बसण्याचे आणि अश्रू ढाळीत रहाण्याचें त्यांच्यावर प्रसंगच कधीं येत नसत. वडील पाहून देतील तो आपला पति, तो आपला देव, सखा, मित्र, आपणच ते अशा भावनेत रंगून जाणें हेच खरे जीवित असे त्या मानीत आणि पुरूषही पण त्यांना तितक्याच सन्मानानें वागवीत असत, आणि त्यामुळेंच पूर्वीच्या समाजात, कुटुंबांत, घरांत, प्रत्येकाच्या मनांत एकमेकांविषयीं आदर, प्रेम, अभिमान, आनंद वावरत असलेला दिसे.

( ३ ) आजचा समाज.

एखादा माणुस आजारी पडला म्हणजे त्याला जशी अशक्तता आलेली असते आणि त्यामुळें त्याच्या प्रकृतींत मोठेंच स्थित्यंतर घडून येते, तेंच तो माणूस पण ओळखूं येईनासा होतो, त्याप्रमाणें आजच्या आपल्या समाजाची स्थिति झालेली आहे. पूर्व आणि पश्चिम इतका त्यांत फरक पडला आहे. आचारांत, विचारांत, रहाणीत सर्वांतच

बदल झाला आहे. पूर्वीच्या धार्मिक कल्पना सर्व नाहीशा करूनच सुधारणेचे गाडे थांबले नाहीं—तर त्या सर्व कल्पना झुगारून देऊन उलट अधर्मानें वागण्यातच आजकाल जो तो प्रतिष्ठितपणा मानूं लागला आहे. पूर्वीच्या घरांतून वेदघोषाचें ध्वनी ऐकूं येत होते तर आज नाटक आणि सिनेमांतील पदें कानांवर पडत आहेत. पूर्वी घरांत वैश्वदेव होणें व त्याचा धूर घेणें हे आरोग्याच्या दृष्टीनें हितावह वाटत होते तर आज घरोघरीं स्टोव्हचे भरभरणें आणि सिगारेट चिरोटचे धुराचे लोट दृष्टीस पडत आहेत. पूर्वी बाहेरून घरांत आल्यावर कपडे काढून, हातपाय तोंड, स्वच्छ रीतीनें धुवून, सोवळे नेसून, शुचिर्भूत होऊन देवास नमस्कार करून जेवावयास बसणें ही वडील माणसांची इच्छा म्हणून किंवा आपल्या कुळांत तो आचार सुरूं होता म्हणून लोक पाळीत असत, आज शेतखान्यातलें पाय तसेंच घेऊन स्वयंपाकघरांत अस्तन्या सारुन जेवणावर ताव मारणारे किती तरी सांपडतील!—नापिकाकडून स्मश्रू करणें, धोब्याकडून कपडे धुवून आणणें,ही कामें त्या त्या जातीच्या लोकांवर सोंपविली जात असत, आज जो तो स्वतःच न्हावी आणि धोबी बनला आहे. आज वडिलांचे शहाणपण ऐकण्याचे कारण नाहीं-ज्याला त्याला मी शहाणा असे वाटत आहे. मी शिकलेला, मला सर्व समजते, माझा मी स्वतंत्र-कसला देव धर्म आणि वडील माणसे, आमच्या आधीं ते जन्मास आलें म्हणून वयानें मोठे, यांत त्यांचा काय मोठेपणा? त्यांना फाजील मान देणें म्हणजे त्यांचे नसते महत्व वाढवणें! मी मिळवावें आणि सर्वांनी खावें हा न्याय कोठला? आईबाप तिकडे उपाशी राहिलें म्हणून मला काय त्याचें? मला काय कोणाची पर्वा? माझे काय कोणाविणें अडणारे आहे? दोन पैसे जवळ असले कीं जग मित्र होते, संसाराच्या अडचणी पैशाने सहज नाहीशा करतां येतात ही आजच्या समाजाची कल्पना आहे. कांहीं एका विशीष्ट तऱ्हेची स्त्री असली तरच ती आपणाला बायको हवी आणि अमुक

मताचा आणि मनाचा पूर्ण असला तरच तो नवरा हवा, मनाप्रमाणें न मिळाल्यास दोघांचीही अविवाहित रहाण्यापर्यंत पाळी येते इतकें आज समाजाचें परिवर्तन झाले आहे. पतीवर अंधश्रद्धेने प्रेम करणें, त्याला देव मानणें, आपल्या सौभाग्याशीं पतीचा अखंड संबंध आहे वगैरे गोष्टी हल्लींच्या स्त्रियाना थोतांड वाटूं लागलें आहे. पति हा मित्र आहे आपल्या दर्जाचा आहे, जन्माला प्राणी आला तो केव्हां मरतो याचा काय नेम-अशा नश्वर देहाच्या नांवाने जन्मभर अश्रू गाळीत आणि ऊर बडवीत वैधव्यांत बसण्यापेक्षां पुन्हां लग्न, पुन्हां नवा संसार, पुन्हां नवा आनंद-तो जिवंत आहे पण पत्नीच्या मर्जीने, कलाने चालत नाहीं तर त्याच्याशीं काडीमोड करुन दुसऱ्याशीं संसार थाटणें अशाप्रकारच्यां विवाहाच्या व पतिपत्नींच्या कल्पना आहेत. लग्न व्हायचे आहे माझे आणि त्याची आईबापानी वाटाघाट करणें हा न्याय कोठला ? म्हणून मुलामुलींचे वडील माणसांशीं भांडण. "बाबा, मला अजून शिकायचे आहे, माझं इतक्यांत लग्न करायचें नाहीं" म्हणून मुलामुलींचा आईबापाशीं हट्ट ? स्त्रीनें पुरुषाशीं लग्न लावलें म्हणून आपले विचार, आपली बुद्धि, आपले स्वातंत्र्य काय म्हणून त्याला विकावें ? हल्लीच्या सुधारलेल्या काळांत आपल्या हौशी, आपल्या गरजा, आपल्या इच्छा भागवण्याकरतां पुरुषाच्या पैशावर अवलंबून रहाण्यापेक्षां स्वतंत्र उद्योग करुन पैसा मिळवणें हे ध्येय बायकांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेवलें आहे. पुरुषाशीं अंधपणानें विवाहबद्ध होऊन त्याच्या ताब्यांत जाणें, त्यानें चांगले वागवलें तर ठीक, तसे न वागवलें तर त्यापासून होणारे हाल व उडणारी दुर्दशा वाचवण्याकरतां पुरुषांच्या स्वतंत्र वृत्तीला कायद्याने निर्बंध घातला पाहिजे म्हणून सरकार-जवळ कौंसिलद्वारें हक्क मागणीचें प्रयत्नं स्त्रिया करीत आहेत.

आजच्या स्त्रियांना एके ठिकाणीं घर करून रहाणें नको आहे. त्याला त्या कोंडवाडा समजतात. एकाच पुरुषाशीं विवाहानें बद्ध होऊन रहाणें

ही त्यांना गुलामगिरी वाटते. पुरुषांनीं मिळवावे आणि स्त्रियांनीं त्यावर जगावें हे मनोदौर्बल्य आहे, ही मानहानी आहे, पुरुषापासून अलग, तुटून स्वतंत्र रहाणें हे त्यांच्या चळवळीचें सार आहे. शिकायचें कशाकरतां तर स्वावलंबी बनण्याकरतां, स्वातंत्र्य कशासाठीं तर आपल्या मनाप्रमाणें आपल्याला वागता यावे म्हणून ! मातृपद कां नको तर सौंदर्याची हानी होते म्हणून ! हक्क कशाकरतां तर आपल्या सुखांत कमी पडतां कामा नये म्हणून ! संसार कां नको तर नोकऱ्या आणि धंदे करायला सवड पाहिजे म्हणून ! विवाहांत प्रेम नको, करार पाहिजे ! एकंदरींत आपले आयुष्य आपणाला स्वतंत्रपणानें कसे घालवतां येईल हें ठरवणें हे आजच्या सुशिक्षित स्त्रियांच्या चळवळीचें ध्येय आहे ! ज्याला पूर्वीचा समाज नीति समजत होता ती आजच्या समाजाला एक मोठी जूलमाची गोष्ट वाटूं लागली आहें ! ज्याला पूर्वीचा समाज व्यभिचार समजत होता ती आजची नवी मतं किंवा नवी स्मृति ठरत आहे; नीति पहायची नाहीं, धर्म पहायचा नाहीं, शास्त्राचा विचार करायचा नाहीं, समाजाची, कुटुंबाची-कशाची पर्वा करायची नाहीं, मनाला वाटतें किंवा सोयीचें ठरतें हुबेहुब तसें वागायचें हा आजचा राजमार्ग आहे-ही आजची नीति आहे. हा आजचा धर्म आहे. सर्वांत वाईट जाचक जर समाजाला बंधन कोणतं असेल तर ते वैवाहिक बंधन; लग्नाचा शिक्का स्त्रीपुरुषांवर बसला तरच त्यांना परस्परांवर प्रेम करण्याचा हक्क असावा हा कुठला न्याय ? व्यभिचार हा शब्द हे निव्वळ बुजगावणं आहे.कामवासना उद्दीपित झाल्या तर त्या अविवाहित स्थितींतही पूर्ण करण्याचा प्रत्येक व्यक्तीला हक्क आहे. त्याला लग्नाच्या बंधनाची, वयाच्या मर्यादेची जरूरी नाहीं. त्यापासून होणारी प्रजा हा व्यभिचार नव्हे-निसर्गानें घडणाऱ्या या सहजच्या गोष्टी होत-यांत पापवासना कोणीही मानण्याचें कारण नाहीं अशा या नवविचाराच्या लाटा जोर जोरांनीं पूर्वीच्या खडकावर सारख्या टकरा देत आहेत. नवविचारांनीं समुद्र

आज खवळून गेला आहे. नवविचारांचें वादळ जोरांत सुरू झालेलें आहे. आजचे मोठमोठाले विद्वान स्त्रीपुरुष या विचारांना पोषक असे ' बंधनांच्या पलीकडे ' ' अटकेपार ' ' नवगीता ' असे ग्रंथ लिहून या विचारांना पुष्टी देत आहेत. आज आपली सर्व उच्च तत्वे जमीनींत पार गाडून टाकून ' रसेल ' हा नव्या मताच्या स्त्रीपुरुषांना आदर्श वाटूं लागला आहे. आजच्या आक्रोशांमधून हाच ध्वनी निघत आहे. आजचे " कळयाचे निःश्वास " हेंच वातावरण दरवळून टाकीत आहे. आज त्यांना " लग्न " हा " बाजार " वाटूं लागला आहे. आज विधवेला मी 'विधवा'कीं 'कुमारिका ' असा भ्रम पडला आहे. पूर्वीं जो आपणांला ' कलंक ' वाटत असे ती आज 'शोभा' ठरत आहे.ज्या स्त्रीपुरुषांच्या संसाराकडे आपण कुतुहलानें पहात होतो तो आजच्या समाजाला जन्माचा 'बंदीवास ' वाटूं लागला आहे. स्त्रिया पतीला पूर्वीं देव मानीत, आज ' इश्श मेला नवरा ' म्हणून स्त्रिया नाके मुरडीत आहेत. " आईग, मी नायकीणीच्या मुलीशीं लग्न लावलं तर तुला काय ग वाटेल ? " असा मुलगा आईला प्रश्न करूं लागला आहे. " महाराच्या मुलीवर माझं प्रेम बसलं आहे. तिच्या हातात हात घालून मी मिरवलो म्हणून बिघडलें कुठें ? " अशी प्रीतीच्या आणि प्रेमाच्या बाबतींत धडपड सुरूं आहे. आजच्या तरुण तरुणीपुढें ' कला प्रेम सौंदर्य ' या व्यतिरिक्त दुसरा विषय नाहीं.

पूर्वीच्या आणि आजच्या समाजांत असं हें स्थित्यंतर घडून आलेलं दिसत आहे. प्रत्येकानें जुन्याचाच अंगिकार करावा आणि नवें त्याज्य ठरवावें असा कोण हट्ट धरेल ? पण जुने सोडतांना आणि नव्याचे ग्रहण करतांना त्यांत आपले हित किती आहे हें पहाणें मात्र अत्यंत जरूरीचें आहे आणि त्या दृष्टीनें आपल्या समाजात जे हे स्थित्यंतर घडून आलेलें आहे त्यापासून समाजाचे किती हित झाले आहे कां तो अधोगतीस जात आहे याचा आतां विचार करूं.

## (४) पूर्वींचा समाज–आनंद, आजचा–दुःख

पूर्वींचा समाज कसाही असो–त्यांत आनंद होता, सुख होते, आजचा समाज पहा–कुटुंब घ्या, व्यक्ति घ्या–त्यांत तीव्र असंतोष, पूर्ण असमाधान जो तो त्रासलेला, गांजलेला असा दिसत आहे; पूर्वी जीविताची, सुखाची मांडणी एकत्र कुटुंबावर, संघटणेवर, परस्परावलंबी अशी होती म्हणून समाज सुखी होता. आजच्या व्यक्तीला स्वतःच्या सुखापुरती स्वतंत्रता पाहिजे म्हणून व्यक्ति दुःखी आहे.

असे कोणीही म्हणत नाहीं कीं, जुने हें त्रिकालाबाधित असे सोने आहे एक अवस्था कायम राहणें हा सृष्टीचा नियमच नाहीं. त्यांत बदल हा नेहमीं होतच असतो; परिवर्तन हें ठरलेलेच आहे. पण बदल होताना सर्व जुने तें सोने असे जसे म्हणूं नये तसे जे नवे ते सर्व सोने, ते हवे--असेही आधाशाप्रमाणें करून उपयोगी नाहीं. पूर्वीच्या समाजानें तें केलें नाहीं म्हणून तो सुखी होता. आजच्या समाजांत दुःख आहे याचें कारण सर्व नवें ते त्याला सोन्यापेक्षांही सोने वाटते हें होय.

जिना चढतांना ज्याप्रमाणें एकेक पायरी चढत गेले पाहिजे, त्याप्रमाणें तो उतरतांनाही घसरगुंडीनें उतरून उपयोगी नाहीं. आजोबानीं बांधलेल्या घरांत मग ते मोडकळीच्या स्थितींत आलें असलें तरी त्यांतच रहा असे कोणीही म्हणणार नाहीं, तुमच्या ज्या आजच्या सोयीगैरसोयी असतील तेवढ्यापुरती दुरुस्ती करा आणि रहा असेच शहाणे उपदेश करतील.पण नातवाचें शहाण-पण काय विचारावें ? "आजोबांना काय अक्कल होती ? मी आतां तें जुनें घर पाडून पहा कसे आपल्या अकलेनें नवीन सुंदर घर बांधतो तें !" नातवानें आपल्या अकलेनें नवीन घर बांधलें, अगदी मनाप्रमाणें झालें. मग आतां तक्रार कां ? "सुख नाहीं, सुख नाहीं" अशी ओरड कां ? तर आजच्या व्यक्तीची वल्पना च अशी कीं, माझ्या एकट्याच्या सुखाकरतां माझ्या एकट्याच्या स्वातंत्र्याकरितां मी घर बांधले; या समजुतीमुळें तो

दुःखीच राहणार. कारण त्याला हे कळत नसते कीं, व्यक्तीचा जन्म एकट्यापुरता, स्वतंत्र राहण्याकरतां नाहीं. त्याच घराला पूर्वीचा समाज गृहस्थाश्रम समजत होता म्हणून तो सुखी होता. माझ्या, व्यक्तीच्या, एकट्याच्या सुखावर कुटुंब समाज याचें सुख अवलंबून नसून सर्वांचे सुख तें माझें सुख अशी त्याची सुखाची विस्तृत कल्पना होती म्हणून तो सुखी होता. आजच्या व्यक्तीला आई नको, बाप नको, धर्म नको, समाज नको, कुटुंब नको, व्यक्तीच्या सुखाला जे आड येत असेल ते कायद्याच्या आधारें दूर केलें पाहिजे या कल्पनेमुळें तो दुःखी आहे, असंतोषी आहे.

एकत्र कुटुंबांत राहिल्यामुळें सर्वांना सुख मिळतें, ही पूर्वीची समाजाची कल्पना होती; आजचा समाज त्याविरुद्ध आहे.

आईबाप भाऊ यापासून मुलगा आपल्या बायकोला घेऊन स्वतंत्र राहूं लागला, ठीक आहे; ही सुधारणा, ही स्वतंत्रता जर व्यक्तीला हवी अशी वाटतें तर तिनें खुशाल ती अनुसरावी-पण त्यांत तरी ती सुखी आहे कां ? त्यांत देखील ती नुसती गांजलेली नाहीं तर पूर्ण वैतागलेली दिसत. बायको विटाळशी झाली, अगर अजारी पडली, अगर चार पाहुणे घरी आलें की स्वयंपाकाची बाई बोलवा, गर्भारपण आले कीं पाठवा प्रसूतिगृहांत या गोष्टी बोलण्याला सोप्या आणि दिसण्यांत थोड्या ऐटीच्या, स्वतंत्र बाण्याच्या अशा वाटतात खऱ्या पण त्यापासून तितकेच तोटे ही आहेत. स्वतंत्र राहिल्यामुळें प्रत्येक बाबतींत परावलंबन, दुसऱ्याचें आर्जव, आणि पैशाचा दुप्पट नाश-शेवटी सुख नाहीं तें नाहींच असा अनुभव येतो. आईबापावर कसा कां होईना हक्क असतो. मायेमुळें त्या आपल्या सुनालेकींकरतां झिजत असतात, पण तें सुख आजच्या समाजाला नको आहे. मिशा न फुटलेला मुलगा आणि परकर नेसणारी मुलगी कां असेना हक्काच्या भाषा बोलूं लागतात.

विवाहित मुलाला वाटते मी आणि बायकोनें स्वतंत्र राहून मजा करावी बायकोला वाटतें मी नवऱ्याशी लग्न लावलें आहे. त्यांच्या आईबापाचें

कष्ट मी कां करावेत ? त्यांच्या आज्ञेत मी कां रहावे ? सासू जर सुनेला म्हणाली

" मुली एवढा लांब पदर काढणें चांगलं नाहीं. "

" लोकांना दिसेल एवढं जरा मोठं कुंकू लावीत जा "

" भांडी जरा स्वच्छ घासावी, विसळावी "

" फुरसतीच्या वेळी थोडं दळावं, निवडावं. "

" सदा पुस्तक काय ते हातांत ! " छे ही कोणी सासूची कटकट सोसावी ?

" पुरुषबाहेर असले म्हणजे मोठ्यांदा बोलू नये ? " बाई बाई ही कोण आमची मुस्कटदाबी ?

" रोज अन्न उरतें आणि मोलकरणीची घन होते, थोडं काटकसरीनं नाहीं कां वागतां येत ? " थेरडी सुखानं अन्नही खाऊ देइना !

लेकही बायकोच्या नादानें आईला दोन समाधानाच्या गोष्टी सांगत असतो " आई तुला करायचय काय- ती जाणें तिचा संसार जाणे ".

तीच बायको स्वतंत्र राहिली आणि मग " साखर संपली " " डाळदाणा संपला " सहा महिने झाले नाहींत तों " लुगडी फाटली " आठवडयातून दोनदां सीनेमा, एखादें नाटक हे ठरलेलेच-महिना संपला कीं वाणी, मोलकरीण पैशासाठी राहिलीच दारांत उभी-मग डोळ्यापुढें काळ्या पांढऱ्या रेघा दिसूं लागतात-मग बायकोला सांगावेसे वाटतें " घरांत भांडी घासली, लुगडी धुतली म्हणून बिघडले कुठे " !

दहाजणांत जे काम सहज होत असे त्या प्रत्येक कामाला पैसा मोजावा लागतो, जें प्रथम प्रथम सुखाचें वाटतें तेंच पुढें त्रासाचें होतें, संकट ओढवल्यासारखे होतें. तरुणवयांत अंगांत स्वतंत्रतेचे वारे शिरलेले असते. जगाचा अनुभव काडीचा नसतो, भविष्यकाळांविषयीं कांहीं कल्पना नसते, उंच भराऱ्या माराव्याशा वाटतात पण त्या चक्रांत एकदां सांपडलें की सुख मिळण्याचें ऐवजी संकटालाच सारखे तोंड देण्याची पाळी येत असते.

बालविवाहाची चाल आपल्यांत होती तेव्हां आईबापांना एकच काळजी होती, दोन पैसे खर्च करून मुलीचें लग्न लावलें कीं संपलें. स्थळें शोधण्यांकरतां काय त्रास पडेल तेवढाच. आजचा समाज सुधारलेला-त्याची दृष्टी बदललेली, त्याला या बालविवाहाच्या पद्धतीवर मोठाच अन्याय, मोठाच जुलूम, निर्दयता दिसूं लागली. "लग्नाची मुलगी म्हणजे काय जनावर आहे कीं तिचें गळ्यांत दावें अडकवून बाप दाखवेल त्या वाटेनें तिनें निमूटपणें गेले पाहिजे?" "अज्ञान मुलीवर जुलूम करणें—छे-ही रानटी चाल-त्यांत सुधारणा ही झालीच पाहिजे" म्हणून प्रौढ विवाहाची चाल प्रचारांत आली, शारदा कायदाही पास झाला; आईबापांना वाटले, झाले, सुटलो आतां, उपरणें झाडून मोकळे व्हायला कांहीं हरकत नाहीं, कारण सुधारणा झाली; पण अनुभव काय येतो तर पूर्वी लहान खिंड होती-त्यांतून चटदिशी निसटून जाणें सोपें होतें-आतां एवढा मोठा बोगदा लागला आहे कीं त्या अंधारांतून चाचपडत चाचपडत जातां जातां पूर्वी फक्त पायपिटी असे, आंता रस्ता इतका बिकट झाला आहे कीं गुडघे मोडायची, कपाळ फुंटायची वेळ आली आहे. पूर्वी मुलींच्या बाबतींत आईबापांना एकच टोंचणी असे, आतां चोहोंकडून सुया बोचूं लागल्या आहेत.—

"अगबाई कितीग ही उंच ढांगळ-आतां हिला नवरा कसा मिळणार?"

"अगबाई सुभी आतां चार पोरांची आई दिसूं लागली-कोण बाई हिला पत्करणार?"

"लग्नाची कां ही मुलगी? इश्श--केवढी घोडी वाढली आहे?".

"ह्या काय चांगल्या रहात असतील!".

"तुम्ही म्हणतच आहांत तर देऊं होकार! पण आमची कांहीं यंदा लग्न करण्याची इच्छा (लायकी) नाहीं. आतां तुमची मुलाचा विलायतेचा खर्च सोसण्याची आणि तो परत येईपर्यंत मुलगी संभाळायची तयारी असेल तर करूं विचार!

ती अंगानें सुटत चालली कीं तिला लठ्ठ होण्याची चोरी—कारण मग अशा "म्हशीला" कोण पत्करणार?

वरं, ती काळजीनें वाळत चालली कीं "करायाचं काय असलं हें हाडुक पदरांत वांधून?"

तिला घरांबाहेर मोकळं सोडण्याची सोय नाहीं,"कुत्रं चावेल कां-साप डसेल कां-भूत-पच्छाडेल कां" ही काळजी!—आजच्या आईबापांना प्रौढविवाहाच्या या थपडा सारख्या बसत आहेत.

पूर्वी समाजांत प्रेमच नव्हते, नवरा बायकोंत मित्रमैत्रीणींत प्रेमाच्या उच्च कल्पनाच नव्हत्या, पूर्वींचें विवाह रानटी—कबूल—आज अगदीं शेले म्हणतो तसलें उच्च प्रेम, जॉन स्टुअर्ट मिल्ल किंवा आधुनिक बर्ट्रंड रसेल, हावलॉक एलिस वगैरेंच्या दृष्टींचें स्वातंत्र्य, उच्च, पवित्र प्रेम, प्रीतिविवाह कबूल-समाजाला हे पसंत आहे ना, बेलाशक त्याचं अनुकरण करा. पण मग तरुण तरुणींची आत्महत्या कां? डिसअपाइंटमेंट्स कां? ब्रोकन लव्ह कां? रिव्होल्ट कां? डायव्होर्स कशाकरितां? आजच्या बहुतेक काव्यांचा सूर निराशेचा-तो कां? प्रेमावर रजिस्ट्रेशनचा शिक्का कां? या उच्च प्रेमांत अविश्वास कां? जे प्रेम आईबापांच्या जुलमामुळें उत्पन्न झालेलें नाहीं, तर स्वतःच्या आवडीनें शोधून काढले, वस्त्रगाळ करून शुद्ध केलें, अगदीं तावून सुलाखून निवालें तें खरें प्रेम, स्वर्गीय प्रेम, जे इटर्नल त्याला काय-द्याचें बंधन कशाला? पूर्वींच्या उच्च प्रेमाचें ताजमहाल पहा—त्यावर कितीहि पाऊस कोसळोत, कसलेही मोठमोठालें आघात येवोत—त्याला रेसभरही कोठें भंग नाहीं; आजच्या प्रेमाचें ताजमहाल पहा, केव्हां डुलतील, केव्हां कोसळून पडतील याचा नेमच नाहीं! सकाळीं बांधावा आणि दुपारी तो भंगावा इतका तो अशाश्वत कसा? इतका डळमळीत कसा? पूर्वींच्या प्रेमाला एकच दिशा-एकच मार्ग, आजच्या प्रेमाला अनंत वाटा-पूर्वींचा आपला एक धोपट मार्ग असे पण समाज त्यापासून सुखी होता-आतां

ता. २०८

त्यांत इतकें गुंतागुंतीचे प्रश्न निघाले आहेत—खरा मार्ग कोणता हेंच कळेनासें झालें आहे. त्यामुळें जिकडे तिकडे गोंधळ माजला आहे. जुनें धरावें तर लाज वाटतें किंवा मनाला पटत नाहीं-नवे पत्करावें तर त्यांत सुख नाहीं अशी समाजाची चमत्कारिक स्थिति झालेली आहे.

( ५ ) स्त्रियांची गाऱ्हाणी—त्याचें निरसन

वेदकालांत श्रुतिस्मृतीसारखें जे ग्रंथ झाले त्या ग्रंथाविरुद्ध स्त्रियांची मोठी तक्रार आहे. मनू हा त्यांना मोठा शत्रू वाटतो. कारण काय तर त्यानें स्त्रियांना स्वातंत्र्य देऊं नये असें आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे. आणि त्याची मतें परंपरेनें आजच्या बहुजन समाजाला मान्य आहेत. आजचा समाज--आजचा पुरुष त्याप्रमाणें वागत आहे म्हणून स्त्रियांनीं त्यांच्याविरुद्ध चळवळ सुरू केलेली आहे. आतां या स्त्रियांच्या विरुद्ध मनूनें म्हंटलें आहे तरी काय तें पाहूं. “स्त्रीनें बाल्यावस्थेंत पित्याच्या आज्ञेंत रहावें, तरुणपणीं पतीच्या आज्ञेंत असावें, पतिनिधनानंतर पुत्राच्या संमतीनें चालावें.”

मनूच्या या लिहिण्याचा स्त्रिया असा अर्थ करतात कीं, त्यांना स्वातंत्र्याचा वारा त्यांच्या आयुष्यांत केव्हांहि मिळूं नये. त्यांनीं आजन्म पुरुषाच्याच दास्यत्वांत रहावें. वास्तविक मनूची तशी इच्छा नव्हती; परंतु मी म्हणतो इतक्या मागें तरी जा कशाला--त्याचा विचारच न करतां आजचाही पुरुष स्त्रीला स्वातंत्र्य पाहिजे असेंच म्हणेल पण तसें म्हणतांना तो मनूप्रमाणेंच म्हणेल कीं, तिन्हींहि अवस्थेंत स्त्रीनें पुरुषाच्याच आज्ञेंत रहावें, तिनें पुरुषाच्या मर्जीनें चालावें. या त्यांच्या म्हणण्यांत आमच्या दृष्टीनें तरी मुळींच अन्याय दिसत नाहीं. स्त्रीवर काडीचाही जुलूम होत नाहीं. स्त्रीला पुरुष दास्यत्वात टाकतो हे त्यांचे म्हणणें साफ खोटे, निव्वळ खोडसाळपणाचे आहे.

झाड आपोआप वाढतें कां ? त्याला फळें आपोआप येतात कां ! त्याचे कष्ट माळ्यालाच विचारावेत. ही तर साधी व्यवहारांतील पोटाकरता

कष्ट करणाऱ्या जीवाची गोष्ट झाली पण जिच्या मायेला मर्यादा नाहीं, जिच्या कष्टाला मोल नाहीं, मातेच्या प्रेमाला जगांत तुलना नाहीं, ज्या आपार्यी ती स्वतःला, देवाला; वेळ आली तर जगाला विसरते अशा आईच्या ताब्यांत लग्न होईपर्यंत मुलीनें रहाणें हे काय दास्यत्व! मुली-करतां बाप काय कमी कष्ट करीत असतो? त्यानें जर म्हटलें कीं, लग्न होईपर्यंत मुलीनें माझ्या ताब्यांत रहावें तर हा काय त्या मुलीवर जुलूम? मुलींनीं आईबापांच्या आज्ञेंत न रहावें तर मग त्यांनीं कोणाच्या आज्ञेंत रहावें? आईबापांनीं आपल्या मुली आपल्या आज्ञेंत, धाकांत न ठेवाव्यात तर मग काय त्यांनीं त्यांना जगाच्या बाजारांत मोकळ्या सोडाव्यात? हक्क, स्वातंत्र्य या नांवाखालीं त्या नाचतील तसं त्यांना नाचूं द्यावं? अगदीं मुलींच्या लहरीनं त्यांनीं वागावं? मुलगी म्हणाली—"बाबा मला शिका-यच नाहीं" तर "बाळ नको शिकूस अं"—असं म्हणून आईबापांनीं काय तिची पाठ थोपटावी! ती दहा दहा वाजेपर्यंत निजून राहिली तरी आईबापांनीं काय तिला अधिक पांघरूणें घालून अंगाई गीत गात थोप-टींत बसावें? "बाबा, माझ्या एका शाळेच्या मित्राबरोबर मला आज रात्रीं हिंडायला जायची लहर आली आहे" असं मुलीनं म्हटलं तर बापानें काय "थांब बाळे, काळोख्या रात्रीं वाटेंत कुठं ठेंच लागेल—रस्त्यावर खाच खळगे—साप किरडूं असण्याचा संभव—तुला कंदील दाखवून पोंच-वतो अं?"—असं कां म्हणावें?—

स्त्रियांचे म्हणणें कीं मुलीना जे वर पहायचे ते आईबापांनीं न पहाताना ती स्वतंत्रता मुलीना असावी. वास्तवीक मुलींनीं स्वतःचे वर शोधून काढणें यांत गैर असे कांहींच नाहीं. माझी खात्री आहे कीं ते जर योग्य असतील तर कोणतेही समंजस आईबाप त्यांना हरकत घेणार नाहींत. कारण कोणत्या आईबापाना आपल्या मुलींचे कल्याण व्हावें असें वाटणार नाहीं? ज्या आईबापांनीं ती जन्माला आल्यापासून हालअपेष्टा

५३१८



काढून तिला वाढवली, शरीरानें, पैशानें, झीज सोसून तिला जपली, टपली शिक्षण दिलें, कोणालाही ती पसंत पडावी आणि ज्यांच्या पदरीं पडेल त्यांचा संसार उत्तम रीतीनें तिला करता यावा अशी शहाणी केली त्या मुलीचे आईबाप स्वप्नांत तरी तिचे अकल्याणचिंततील: कां ? पण छे, आजच्या शिकलेल्या बाईला हें कुठलं पटायला ? तिचा टेंभा कांहीं वेगळाच--तिचा अहंकार कांहीं निराळाच—तिची तिसरीच ऐट; मान वेळावीत वेळावीत गाल फुगवून, नाक फेंदारुन ती बोलेल "मग त्यांत काय आईबापानी मोठसं केलं ? मुलीना जन्म देणें हे त्यांच कर्तव्यच आहे ? "

आणि एखाद्या शहाण्यानें जर समंजसपणाने अशा दीडशहाण्या बाईला प्रश्न केला " आणि त्यांची आईबापानी लग्नें लावगें ? " "अह-छे, ते मात्र आईबापांचं कर्तव्य नाहीं. तिथं मुलीचा हक्क आला तिची स्वतंत्रता आली " त्यांना वाढवणं, त्यांना शिकवणं हा मात्र मुलींचा आईबापावर हक्क आणि त्या जरा मोठ्या किंवा सज्ञान झाल्या कीं झाल्या त्या शहाण्या-मग त्यांना फुटली शिंगे—! अठरावीस वर्षांची मुलगी झाली-शाळेचं किंवा कॉलेजचं शिक्षण तिला मिळालं तरी अशी काय तिला मोठी अक्कल आलेली असते कीं तिनें लगेंच स्वतंत्रपणाचा टेंभा आईबापांपुढें मिरवावा ?—आईबापावर त्यांनीं विश्वास ठेवूं नयें आणि ज्या वयांत काडी-चाही अनुभव आलेला नाहीं अशा वयांत जगावर मात्र विश्वास टाकायला त्यांनीं तयार व्हावें हा कुठला शहाणपणा ? आणि या स्वतंत्रपणांत, या प्रवृत्तींत अत्यंत निंद्य, तिरस्करणीय, दोषार्ह अशी जर कोणती गोष्ट असेल तर ती आईबापांवर अविश्वास दाखवण्याची ही होय. आजच्या नवमतवादी स्त्रीपुरुषांच्या शिकवणीचा परिणाम म्हणून मुलींच्या मनांत आईबापांविषयीं अविश्वास, अनादर उत्पन्न व्हावा, "हक्क हक्क" "स्वातंत्र्य स्वातंत्र्य" या घोषणा करून त्यांनीं त्यांच्या विषयीं कृतघ्नपणा व्यक्त करावा याच्याइतकी निंद्य, कृतघ्नपणाची, मूर्खपणाची, मुलींना शरम आणणारी दुसरी

गोष्ट नाहीं! जगांत विचारतो कोण कोणाला ?—स्वार्थ, स्वसुख हे जिकडे तिकडे पसरलेलें आहे. चांगल्या मुलीं पदरीं असूनही आईबापांचे हाल कुत्री खात नसतात अशी समाजाची स्थिती आहे, प्रेमाच्या गोड गोड गोष्टी फुकटांत मिळत असतात तोंपर्यंत सर्व ठीक असते-काव्यांत प्रेमाच्या गोष्टी वाचाव्यात-आनंद मानावा, व्यवहारांत प्रेम पैशानें मोजले जाते, स्वातंत्र्य, प्रेम, वगैरे गोष्टि पैशापुढें रद्द आहेत. आजच्या उल्लू मुलामुलीना व बेजबाबदार मासिककाराना या गोष्टी कुठल्या पटायला ? त्यांना एक माहीत-आईबापांना कांहीं कळत नाहीं-आम्ही मोठे झालों, सज्ञान झालों आमच्यावरचा शिकून शहाण्या झालों, आईबापांचा हक्क उडाला आमच्या प्रेमाच्या, स्वातंत्र्याच्या, लग्नाच्या बाबतींत ढवळाढवळ करण्याचा त्यांना अधिकार उरत नाहीं; त्यांना कां म्हणून विचारलें तर—"वाः आमचें मास्तर, आमचें प्रोफेसर आम्हाला हेंच शिकवतात; वा: मी आज लायब्ररींत मासिकं पाहिली त्यांत हीच शिकवण. फडक्यांच्या कादंबऱ्या वाचल्या-आम्हांला कशाची अटक ?—आम्हांला कोण बंधनांत ठेवणार ? आमचें पंख कोण खुडून टाकणार ?" धिःक्कार असो अशा लेखकांना कीं जे आईबापांच्या कृत्यांना "बापशाही" म्हणून संबोधतात !—आईबापांच्या सदिच्छांना 'बापशाही' म्हणून त्यांची हेटाळणी करायची हे शिक्षण, वीष कीं अमृत ? ही स्वतंत्रता कां कृतघ्नपणा ? ही सुधारणा कां अधोगती ? ही नवी मतें कां बाष्कळपणा ? उपकाराची ही फेड कां ? ही माणुसकी कां ? ही उच्च संस्कृति कां ? 'महिलांची' ही योग्य शिकवण कां ? स्त्रीचें हें योग्य कर्तव्य कां ?

कदाचित कोणाला हे एकतर्फी किंवा विकारवशतेचें लिहिणें वाटेल; तरी आतां आपण थोडासा मुलींच्या बाजूनें या प्रश्नाचा विचार करूं; ज्या मुलींनी आईबापांच्या संमतीशिवाय आपल्या मर्जीप्रमाणें आपली लग्नें व्हावीत असें वाटतें, त्यांनीं प्रथम सज्ञान झाल्याबरोबर आपल्या स्वतंत्र

जीवनाची सोय केली पाहिजे. कारण मग त्यांच्या पोषणाची जबाबदारी आईबापांवर कां म्हणून रहावी—किंवा त्यांनीं पाडावी ? जर त्या स्वतंत्रपणें स्वमतांप्रमाणें वागणार तर मग आईबापांचा आणि त्यांचा संबंध काय उरला ? त्यांच्या त्या मालकिणी झाल्या ! —बापानीं अशा मुलीना घरांतून घालवून दिल्या तर त्यांचें तें कृत्य योग्यच ठरणारे आहे; कारण त्यांनीं तरी अशा मुलींच्या करतां कां बुडावें ? कां कष्ट सोसावेत ? कां पायपिटी करावी ? कां तोंडं वेंगाडावीत ? तेव्हां अशा मुलीनी आईबापांपासून वेगळें रहाण्याची प्रथम तयारी केली पाहिजे. आपल्या समाजाची रचना, चाली-रीति, मनुष्य स्वभाव सर्व लक्षांत घेतां मुलीना स्वतंत्र रहाणें किती शक्य आहे याचा त्यांनींच निर्विकार मनांनीं विचार करावा. धरून चालूं या कीं मामा काका किंवा कोणी ओळखीचा अगर एखादी संस्था यांत रहाण्याचे जमलें तरी नवरा पहाणें, तो शोधून काढणें, पैसा जमविणें हा मार्ग तरी सोपा आहे कां ? समाज समंजस असता तर आईला काळजी करण्याचें, बापाला जोडे फाडायचें कारणच पडलें नसते, ' दारिका हृदयदारीका ' किंवा " झाली ज्याची उपवर दुहिता—चैन नसे त्या तापवी चित्ता " असली काव्येच रचली गेली नसती !

स्वतंत्र रीतीनें वर पहाण्याचा प्रसंग मुलींच्यावर खरोखरीच यावा म्हणजे चढेल वर कसे असतात, मुलींच्या बाबतींतलें त्यांचे तर्क किती बालिश असतात, ' मुलगी पसंत नाहीं ' हे तोन्यानें उच्चारलेलें शब्द मुलीचा बाप किती नम्र होऊन ते सहन करीत असतो, " तुमचं आमचं जमायचं नाहीं. " यांत मुलींच्या बापाच्या दारिद्र्यावस्थेची कशी अधम-पणानें तोंडावर उच्चारणी होऊन माणुसकीची पायमल्ली होत असते हे त्यांना कळून येईल. हे सर्व अपमान मुलीचा बाप मुकाटयानें सहन करीत असतो म्हणून मुलींची लग्नें तरी सुखासमाधानानें होत आहेत. मुलींनी ही कामें अंगावर घ्यावीत—त्यांची लग्नेच होणें दुरापास्त होईल. एखाद्या कोठल्या

तरी कॉलेजच्या पोरीचें एखाद्या पोराशीं स्वतंत्र रीतीनें लग्न जमलें म्हणजे सरसकट सर्व मुलींची लग्नें सुलभरीतीनें होतील अशी जर प्रेमवेड्या तरुण-तरुणींची कल्पना असेल तर ती भ्रामक आहे. आईबापानीच तें हाल, तें अपमान सोसावेत. तरुण वय, शिक्षणानं बनलेलीं स्वतंत्र मनें, किंवा सेन्सिटिव्ह स्वभाव अशा मुलींनी स्वतः भाग घेऊन आपली लग्नें जमवि-ण्याचा प्रयत्न करावा त्यांची लग्नें होणें कठीण जाईल. चढेल पण भुके-बंगाल पोरांना मुली कुठल्या हुंडा देणार ? बरं, हुंड्याची पैशाची पर्वा न करतांना सौंदर्यावर मुलें भाळतील म्हणावें तर सगळ्याच मुली कांहीं शकुं-तला, उर्वशी, रंभा, सौंदर्याची खनी नसतात कीं जिभल्या चाटीत चाटीत पोरांनीं त्यांच्यामागें धावावें !—इंदू बिंदूच फार !—शिवाय कापडाची, वाण्याची, बोहऱ्याची दुकानें असतात पैसा टाकला कीं तेथें माल मिळतो· तशी विवाहेच्छु मुलांची दुकानें थोडकीच आहेत कीं, कपाटांतून आपली मुलें बसवलेली, जावें पहावें आणि पसंत पडेल त्याच्याशीं लग्न जमवावें ?—तेव्हां अशा रीतीनें विचार केला म्हणजे मुलींना स्वतंत्र रीतीनें आपली लग्नें करणें किती कठीण आहे हें दिसून येईल.

"गुणाः पूजास्थानम्" हे तत्व प्रसंग आला कीं बाजूला पडतें आणि

"बाकी सर्व ठीक आहे पण थोडं नाक मोठं आहे."

"तशी मुलगी विद्येत वगैरे हुषार आहे पण कपाळ जरा लहान आहे."

प्रौढविवाहाचे भोक्ते—शारदा कायदा पास झाला म्हणून आनंद मान-णारे स्वतःवर प्रसंग यावा कीं—

"मुलगी जरा मोठी आहे हो."

"काय बुवा अलीकडच्या मोठ्या मुलींवर विश्वास कसा ठेवावा—"

"अहो तुम्ही आमच्या पत्राचं उत्तर दिलं नाहींत ?"—काय ती उत्तर देण्याची ऐट "सॉरी !"—

यावरून मनू किंवा आजचा पुरुष म्हणाला की मुलींनी आईबापांच्या आज्ञेंत रहावें तर त्यांत अन्याय आहे असे कोणासही वाटणार नाहीं. तो मुलीवर जुलूम नसून तो त्यांना खरा आधार आहे.

आतां पत्नीनें पतीच्या आज्ञेंत रहावें कीं कसे याचा विचार करूं.

## पत्नीनें पतीच्या आज्ञेंत रहावें

स्त्रिया आपल्या दागिन्याना कुलपांत कां ठेवतात? उद्यां जर त्या दागिन्याना वाचा फुटली आणि त्यांनीं जर स्त्रियांच्या विरुद्ध ओरड सुरुं केली कीं स्त्रियांनीं आमचं स्वातंत्र्य नष्ट केलं आहे, आम्हाला कपाटांत किंवा तिजोरींत कोंडून ठेवतात हा अन्याय आहे, हा आमच्या-वर जुलूम आहे, तर स्त्रियांना ते कितपत पटेल? त्यावर स्त्रिया म्हणतीलच कीं दागिना ही वस्तूच अशी आहे कीं ती मोकळी राहिली तर ती चोरण्याची कोणासही बुद्धि व्हावी ! जवळ जवळ अशीच स्थिति स्त्रियांचीही आहे. सृष्टिकर्त्याचीच अशी इच्छा दिसते कीं स्त्रिला फारसे स्वातंत्र्य नसावें; कारण त्यानें स्त्री ही वस्तूच अशी कांहीं मोहक केली आहे कीं पुरुषांच्या डोळ्यांना ती आकर्षक वाटावी ! स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या ज्या स्त्रिया आहेत त्यांनीं पुरुषजातीवर रागावण्यापेक्षां खरें म्हटलें तर विधात्या-वर रागावले पाहिजे. कारण त्यानें त्यांना इतकें सौंदर्य कां दिले ? कोमलांगी कां केलें ? शरीराचे कांहीं भाग लोकांच्या दृष्टींत भरण्याइतकें उठावदार कां केले ? हरणासारखे नेत्र त्यांना. ज्याला पुरुषाचें चेहेऱ्यावर केसाचें पीक पेरतां आले त्याला स्त्रियांच्या बाबतींत काय अशक्य होतें ? पण कुरुपता तर राहोच पण गाल काय तर म्हणें गुलाब, नाक चाफेकळीसारखे, ओठाला उपमा कशाची तर तोंडल्याची, दंतपंक्ती कशी तर कुंद कळ्या, चाल गजगती-वस्तूच अशी कीं कवीला देखील काव्य करायला स्फूर्ति व्हावी! एवढा मोठा कालिदास कवी-त्याला काय जगाला शिकवायाल उच्च विषय स्मरला नसेल? पण त्याला देखील शाकुंतल मेघदूत असे स्त्रीविषयक शृंगार

आणि करुणरसपर काव्यें रचण्याचा मोह व्हावा हे कशाचें द्योतक आहे? अशी जी सुंदर वस्तू ती कोणता पुरुष स्वतःची झाल्यावर तिला जपणार नाहीं? आणि हें जपणें म्हणजे गुलामगिरी कां? मोरानें मला पसाराच फार, कोकिळनें माझा कंठच गोड, पुष्पानें मला सुवास आणि सौंदर्य कां दिले, चंदनानें म्हणावें मी सारखे झिजावेंच कां? असे प्रत्येकजण म्हणून जर ब्रम्हदेवाला दोष देऊं लागला तर त्याच्याइतकी हास्यास्पद अशी दुसरी कोणती गोष्ट आहे? पुरुषांना दोष देण्याच्या भरांत स्त्रियांना आपल्या सौंदर्याची किंमत वाटेनाशीं झाली आहे. विनय जो सहज गुण तो त्यांना दुर्गुण वाटूं लागला आहे. अबला न रहाताना छाती काढून चालणाऱ्या शिपायाच्या शौर्याची आज त्यांना स्फूर्ति होऊं लागली आहे. त्यांची अवयवं सृष्टीचा क्रम पुढें चालवण्याकरितां उपयोगांत यायची तो त्यांना आज शरीरावर भार वाटूं लागला आहे. स्त्रीत्व येणें, मुलांना जन्म देणें, त्याना दुग्धपान करणें. त्यांचं संवर्धन करणें हा त्यांना नरक वाटूं लागला आहे. ज्या पुरुषाच्या सहवासानें, शक्तीनें त्यांच्या जीविताचें सार्थक व्हायचे तो पुरुष एक जुलमी राजा आहे, त्याचा सहवास नको, आपल्या अंगाला त्याचा स्पर्श नको, त्याच्याशीं विवाह नको, संसारापेक्षां शिक्षण फार प्रिय वाटूं लागले, घर-काम ही हमाली आणि शाळेंतलं जे हमालीचं काम तो खरा संसार वाटूं लागला आहे, स्त्रियांच्या विचाराच्या आणि आचाराच्या बाबतींत अशी क्रांति घडून आली आहे.

खरं पाहिलं तर स्त्रिया पुरुषांविषयीं निष्कारण गैरसमज करून घेऊन आपल्या आयुष्याचं मातेरं करीत आहेत; आजचें किती पुरुष असा हट्ट धरणारे सांपडतील कीं बायकोनें "बुचड्याच्याऐवजीं वेणीच घातली पाहिजे, कुंकू मोठेंच लावलें पाहिजे, कोपऱ्यापर्यंतच्या बाह्याचीच चोळी घातली पाहिजे, सुताडाच नेसला पाहिजे,हातांत रासवटी हिरव्या बांगड्याच भरल्या पाहिजेत, हातांत पुस्तक घरतां कामां नयें, नेहमीं बायकोनें घरांत

कोंडूनच घेतलें पाहिजे ? " आपणाला तर चित्र उलट दिसत आहे. आजचे तरुण आपल्या प्रियपत्नीचें कोडकौतुक पुरविण्यांत इतकें दंग असतात कीं दिवसांतील नोकरी व्यतिरिक्ततेचा त्यांचा बहुतेक काळ प्रियाराधनेंत खर्च होत असतो. स्त्रियांनीं बाजार केला--सिनेमा किंवा नाटकाच्या थिएटरांत नवऱ्याच्या खुर्चीला खुर्ची लावून बसल्या तरी त्यांचे कौतुकच करणारे सांपडतील. आपल्या पश्चांत बायकोला कोणाच्याही दारांत भीक मागायला जायला लागूं नयें म्हणून तिच्या नांवाची पॉलिसी उतरून पोटाला चिमटा बसवून प्रीमियमचें हप्ते आज बहुतेक पुरुष भरत आहेत. अगदीं गरीबींत रहाणारें जोडपें असले तरी नवरा बायकोला दळूं देत नाहीं, कांडूं देत नाहीं भांडी घासूं देत नाहीं, बायको अजारी पडली असताना तिच्या सुश्रुशेकरितां नवऱ्याची इतकी जिवापाड मेहनत चाललेली असतें कीं पुष्कळ वेळां घरांतील वडील माणसाच्या नाखुषीला तो बिचारा पात्र होत असतो. आज नवरा बायकोला एकटा प्रवास करूं देतो, सायकलवर बसायची तिची हौस पुरवतो, टेनिस खेळायची तिची इच्छा दिसल्यास तिला ब्याट विकत घेऊन देतो, तिला अनवाणी चालूं देत नाहीं, ती बाहेर पडल्यावर उन्हानें तिच्या नाजुक प्रकृतीवर अपाय होऊं नयें म्हणून छत्री पुढें करतो-फार काय पण ज्याला दोन मुलें झालेली आहेत असें जोडपे रस्त्यानें जाताना पहावें-पुरुष आपल्या छातीवर मुलाचा भार घेऊन चालत असतो आणि बायकोच्या हातांत ब्लाऊजचें किंवा पातळाचें बंडल असून ती ऐटींत चालत असलेली दिसेल !-अशा नवऱ्याच्या ताब्यांत स्त्रीनें राहूं नयें तर काय-इतकें ज्या स्त्रीचें नवरा कौतुक करतो त्याला तिनें लाथा झाडाव्यात ? मनू जे म्हणतो कीं स्त्रियांनीं पुरुषाच्या ताब्यांत रहावें यावर आजच्या स्त्रियांचे म्हणणें काय कीं पुरुष स्त्रीला घरांत घरकामें करण्याकरितां डांबून टाकतो आणि आपण मात्र बाहेर स्वतंत्रपणें वावरतो. सद्यस्थिती पाहिली तर याच्या अगदीं उलट आहे. पुरुष बाहेर पडतो तो जणुं कांहीं स्वातं-

ऱ्याचा आनंद भोगण्याकरितांच ! जणू कांहीं सृष्टीचें मनोहर देखावे पहाण्याकरितांच तो बाहेर पडत असतो ! खरी स्थिति अशी आहे कीं, बायकोच्या आज्ञा, इच्छा, हौसी पूर्ण करण्याकरितांच तो बाहेर पडत असतो. बायकोची मर्जी जाऊं नयें, तिच्या पसंतीला येतील अशा वस्तू शोधून काढण्याकरतांच तो बाहेर भटकत असतो. तो एक दुर्दैवी प्राणी म्हणून बाहेर भटकत असतो. पण स्त्रिया त्याचा विपर्यास जर न करतील तर मग त्या नव्या मताच्या कसल्या ?

खरी स्थिति अशी आहे कीं, पुरुष स्त्रीला गुलाम करीत नसून उलट स्त्रीच पुरुषाला घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणें राबवीत असते. अशी स्थिति असतांना कोणीकडून तरी मनूला पुरुषाला नांवें ठेवण्याकरतांच स्त्रियांच्या खोट्या स्थितीची भेसूर वर्णनें त्या करीत सुटतात. पुरुषांनीं आपण मिळविलेल्या पैशाचें दागिनें करणें—बायकांची हौस पुरवणें यांत त्यांचा काय दोष ? "नंदीबैल सजवतात त्याप्रमाणें म्हणे पुरुष बायकांच्या अंगावर दागिनें चढवतात !"—नंदीबैल होण्याची खरी हाव कोणाची ! दागिन्याकरतां बायका प्राण सोडीत असतात. बायकोनें दागिन्याचा हट्ट घेणें आणि तो तिच्या नवऱ्यानें पुरवणें यांत पुरुष कसा मूर्ख ठरतो हेंच आम्हाला कळत नाहीं. हट्ट घेणाऱ्या शहाण्या आणि तो पुरवणारा नवरा तो मात्र मूर्ख कां ? ज्या आजच्या शिकलेल्या बायका पूर्वीच्या किंवा त्यांच्या मनानें आजच्या अडाणी यांना दागिन्याकरतां नांवें ठेवतात त्या आज काय करीत असतात ? सुशिक्षित स्त्रियांना बसायला मोटार पाहिजे, नेसायला फ्यान्सी पातळे पाहिजेत, केसाना पोमेड, वासाला सेंट, डोळ्याला चष्मा, कानांत टप्पोऱ्या मोत्याच्या कड्या, गळ्यांत मोठ्या मण्याची माळ, वेडेवाकडे चालता आले तरी पत्करलें पण पायांत स्लीपर पाहिजे ! सर्व शरीर जरी जगाला दिसले तरी चालेल पण वायलचे झिरझिरीत पातळ पाहिजे हे मात्र नंदीबैल सजणें नव्हे !—हा आपला अगदीं साधासुधा न्याचरल प्लेन लिव्हिं-

गवा नमुना नाहीं ?—आणि इतकी हौस पुरवणारा नवरा असला तरी आजची शिकलेली बायको म्हणते घटस्फोटाचा मला हक्क पाहिजे ! त्या नवऱ्यानें जसे कांहीं मागील अनेक जन्मींचे या बायकांचे रीणच घेतलेले असते कीं त्याच्या शिव्या मिळाल्या तरी त्या खाऊन पण ते फेडलेंच पाहिजे ?—

तेव्हां मनूनें जे म्हटलें आहे कीं स्त्रीनें पतीच्या आज्ञेंत रहावें यांत बिघडलें कुठें हेंच कळत नाहीं. आज पुरुष आहे म्हणून स्त्रियांना किंमत आहे. पुरुष आहे म्हणून स्त्रियांची हौस पुरवली जात आहे ! जो पुरुष स्त्रीकरतां अहोरात्र झटतो त्यानें स्त्री आपल्या ताब्यांत रहावी अशी अपेक्षा केली तर लगेंच तो काय क्रूर, जुलमी झाला ? स्त्रीनें पुरुषाच्या ताब्यांत रहावें असें मनू म्हणतो—ही तर पांच हजार वर्षांपूर्वीची गोष्ट झाली. आजचा पुरुषहि तेंच म्हणेल. याचा अर्थ स्त्रीला दास्यत्वांत ठेवणें नसून पुरुष हाच तिचा खरा संरक्षक आहे—स्त्री ही उपभोग्य वस्तु आहे हे त्यांच्यातील मोठें व्यंग त्या विसरतात आणि हट्टानें पुरुषाशीं स्पर्धा करतात; पुरुष आड वाटेला एकटा सांपडला तर चोर काय करील ? फार तर त्याच्या दोन थोबाडींत देऊन त्याच्याजवळ जे असेल नसेल तें सर्व लुबाडून नेईल. पण बायको एकटी सांपडली तर तो द्रव्य लुटेल आणि अब्रूवरही उठेल. आगगाडींत तर असें प्रसंग येतात; त्या वेळेला ती सफ्रेजेट नाहीं महा सफ्रेजेट असली तरी काय करणार ? तेंच पुरुषाचें सहाय तिला असलें तर तिला स्वतःच्या आयुष्यांवर केवढा विश्वास असतो ?—ब्रह्मदेवानेंच जिथें हें बायकांत व्यंग ठेवलें आहे तिथें त्यांनीं भलत्या महत्त्वाकांक्षेला बळी पडून आपल्या आयुष्याची माती करूं नये. असा मागेंही काळ आला नाहीं आणि पुढें येईल अशी खात्रीनें आशा नाहीं कीं, स्त्रियांनीं पुरुषांच्या मदतीशिवाय पुरुषाच्या ताब्यांत गेल्याशिवाय त्यांचं संरक्षण घेतल्याशिवाय त्यांचं आयुष्य या जगांत सुरक्षित राहील !—उगाच चिडून संतापून मनूला शिव्या देण्यांत काय अर्थ

आहे ? ज्याच्याजवळ व्यंग आहे त्यानें नमूनच वागलें पाहिजे; तेव्हां पुरुष ह्या स्त्रीला दास्यत्वांत ठेवतो हे बायकांचे म्हणणें साफ खोटें आहे; उलट तो तिचा संरक्षक होत असतो. बायकांनीं त्यांना नांवें ठेवण्याऐवजीं त्यांचे आणि मनूचें आभारच मानलें पाहिजेत. त्यांत बायकांनीं काडीचाही कमीपणा मानण्याचें कारण नाहीं.

पतिनिधनानंतर स्त्रीनें पुत्राच्या तंत्रानें चालावें यांत कोणाचाही मतभेद होणार नाहीं असें वाटतें म्हणून त्याची चर्चा करण्याचें प्रयोजनच नाहीं; कारण म्हाताऱ्या माणसांना पोटच्या मुलांशिवाय जगांत दुसरा कोण विचारणार आहे ?

तेव्हां मनूनें जे म्हटलें आहे कीं मुलींनीं आईबापांच्या, पत्नीनें पतीच्या आणि पति निधनानंतर स्त्रीनें पुत्राच्या आधीन रहावें यांत अयोग्य असें कांहींच नसून समाजहिताच्या आणि स्वास्थ्याच्या दृष्टीनें त्याचे म्हणणें किती हितप्रद आणि बोधप्रद आहे याचा नवमताच्या स्त्रियांनीं निर्विकार मनानी विचार करावा.

( ६ ) समान हक्क.

स्त्रियांचें म्हणणें कीं, पुरुषांना अनेक लग्नें करण्याचा जर अधिकार आहे तर तो अधिकार स्त्रियांना कां असूं नये ? स्वैराचारांमुळें पुरुष जर पतित होत नाहीं तर स्त्रियांना तरी पतिता कां मानाव्या ?

या दोन्हीं प्रश्नांना पहिलें अगदीं सरळ उत्तर असें कीं पुरुष ते पुरुष स्त्रिया त्या स्त्रिया. पुरुषाप्रमाणें स्त्रियांना हक्क कां नाहींत ? तर त्या स्त्रिया आहेत म्हणून. पुरुष आणि स्त्री यांचे नाक, कान, डोळे जरी एक असले तरी शरीर रचनेंत जर भिन्नता आहे तर पुरुषांप्रमाणें व्हावें अशी त्यांनीं इच्छा धरणें अयुक्तिक कसें ठरतें ?

मग स्त्री आणि पुरुष हा भेद तरी ठेवावयाचें कारण काय ? स्त्री पुरुषांना मिळून एक स्त्री तरी किंवा एक पुरुष तरी म्हणावें ? पुरुषानीं तरी

नं. ...... ता. ....

आपलें कपडे म्हणजे धोतर, कोट, टोपी रुमाल घालण्याचें सोडून चोळी घालायची आणि लुगडे नेसायची तयारी ठेवली पाहिजे किंवा बायकांनीं तरी चोळ्या लुगडी फेंकून देऊन अंगांत कोट जाकीटे चढवली पाहिजेत ! कृष्णराव, गोपाळराव ही नांवें अजीबात नामशेष करून कृष्ण कितीहि राव असला तरी कृष्णाबाई, गोपाळरावांचे गोपिकाबाई असें तरी एक सररहा म्हणायची चाल काढली पाहिजे किंवा खरोखरीच्या मनोरमेला मनोहर आणि सुधाला सुधाकर म्हटले पाहिजे ! एवढ्यानें तरी बायकांची समान हक्कानें तृप्ति होईल कां नाहीं याची शंकाच आहे. कुंकू बायकानींच कां लावावें आणि पुरुषानीं गंधच कां लावावें ? जानवें कोणी अडकवावें आणि मंगलसूत्र कोणी बांधावें अशी भांडणें खास सुरू होतील. मी हक्काकरतां भांडणाऱ्या स्त्रियांची टवाळी अगर चेष्टा करण्याच्या हेतूनें हें लिहीत नाहीं पण एकदां कलह माजला, हक्काचें भांडण सुरू झालें म्हणजे त्यांतून कोणकोणत्या गोष्टी निष्पन्न होतील हे सांगतां येणार नाहीं.

आज पाश्चिमात्य देशांत घटस्फोटाचा कायदा त्यांना मिळाल्याबरोबर त्यांतील गांभीर्य जाऊन बालिश आणि थिल्लर गोष्टींनाच अधिक महत्त्व आलेले आपणाला आढळून येत आहे. आरंभाआरंभाला भाऊ भाऊ अगदीं एक विचारानें असतात. पण एकदां कां भांडण पेटून वाटपापर्यंत पाळी आली कीं सर्व नातें विसरून जात्याची वरची तळी कोणी घ्यावी आणि खालची कोणी घ्यावी असल्या क्षुल्लक गोष्टीनाही महत्त्व येते ना ?— विधवाना कुंकू लावायचा कां हक्क असूं नये, किंवा कुंकवाचा आणि लग्नाचा काय संबंध हे विचार विधवा कुमारीसारख्या आजच्या बायका विचार प्रदर्शित करीत आहेतच ना ?—

पुरुषांप्रमाणें स्त्रियांना अनेक लग्नें करण्याची इच्छा झाली. किंवा कायद्यानें त्यांना हक्क मिळाला तरी त्या सुखी कशा होतील हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. अनेक लग्नाच्या पाठीमागें लागणाऱ्या

ज्या स्त्रिया त्यांची समाजात किंवा खुद्द त्यांचे नवऱ्याजवळ किंमत कशी राहील, विश्वास कसा टिकेल याचा त्यांनींच विचार करावा. अशा स्त्रियांच्यावर त्यांचे नवरे काय म्हणून विश्वास टाकतील ? आज स्त्रियांना पुरुष जे सुख देत आहेत, त्यांनीं कमावलेल्या पैशावर चार दागिने करून ते त्यांना घालण्यास देत आहेत, त्यांची वाटेल ती इतर हौस पुरवीत आहेत, आपलें घर, प्रपंच त्यांच्या स्वाधीन करीत आहेत ते कोणत्या भावनेनें ? आपल्या बायका आजन्म आपल्याला चिकटून राहणार आहेत ह्या त्यांच्या अगदी स्वप्नांत देखील खोट्या न पडणाऱ्या दृढ समजुती आहेत म्हणूनच ना ? ज्या स्त्रियांच्याविषयीं पुरुषांची अशी कल्पना झालेली आहे कीं लहर फिरली कीं त्या घर सोडून जाणार, दुसऱ्या पुरुषाशीं लग्न लावणार अशा स्त्रियांवर कोणतें पुरुष मनापासून प्रेम करतील ? कशाला ते त्यांच्यासाठीं घरें बांधतील ? विश्वासानें ते आपली मालमत्ता कां म्हणून त्यांच्या स्वाधीन करतील ? शिवाय पहिल्या नवऱ्यापासून जी मुलें झाली असतील त्यांची वाट काय ? " ही आपली मुलें घ्या, संभाळा—मला दुसरा नवरा करायचा आहे "—म्हणून पहिल्या नवऱ्याच्या दारांत ती मुलें टाकून दुसरा नवरा शोधायला जी बायको जाईल तिला दुसरा पुरुष तरी कसा पत्करेल ? त्या बाईच्या पहिल्या नवऱ्याचे उदाहरण त्याच्या डोळ्यांपुढें नाहीं कां येणार ? बायको जायची निघून मुलें मात्र गळ्यांत पडायची हे कळल्यावर अशा दुःखाच्या खाईत कोणता सूज्ञ पुरुष उडी घालील ?—

शिवाय हा कांहीं साधा देवघेवीचा व्यवहार नव्हे कीं यंदा इरकली लुगडे फाडले आतां पुढच्या वर्षीं महेश्वरी आणि त्याच्या पुढच्या वर्षीं गजानन मिल्सची लुगडी फाडायची !—येथें स्त्रियांना आपलें शरीर दुसऱ्याचें ताब्यांत देण्याचा प्रश्न आहे; तें देखील नुसतें नांवाला द्यायचें नाहीं तर ते पुरुषाला उपभोगायला द्यावयाचें या योगानें सर्व आयुष्य अनिश्चित ठरणार. हा

व्यवहार जगांत सुखानें कसा काय चालणार याचा विचार त्या विचाराच्या बायकांनींच करावा. बायकांना जर यांत आपली अब्रू जात नाहीं असें वाटूं लागलें तर अशा बेअब्रूच्या बायकांशीं कोणते सुज्ञ पुरुष सहकार्य करायला, त्यांच्याशीं लग्न लावायला तयार होतील ?—पुरुषांप्रमाणें स्त्रियांना अनेक लग्नें करण्याचा हक्क पाहिजे, त्यांना काडीमोड पाहिजे—पहिल्या नवऱ्याशीं न पटलें तर त्याचा संबंध तोडून टाकून त्यांना दुसरा नवरा करण्याचा हक्क पाहिजे. मनूने किंवा पूर्वीच्या विचारी समाजशास्त्रवेत्त्यांनीं स्त्रियांवर कोणता प्रसंग येऊन कोसळला तर त्यांनीं काडीमोड करावी हे अगदीं स्पष्ट शब्दांत सांगून ठेविलें आहे व त्या वचनांप्रमाणें स्त्रिया जर पहिल्या नवऱ्याला टाकून पुनर्लग्न करण्यास निघाल्या तर त्यांच्याकडे समाज सहानुभूतीच्याच दृष्टीनें पाहील; पण ज्या पाश्चिमात्य देशांत हा कायदा सुरूं आहे तेथील लोकांची आजची परिस्थिती पाहिली तर या कायद्याचें जे उच्च तत्त्व तें त्यांनीं पार झुगारून देऊन त्याला त्यांनीं इतकें हिडिस स्वरूप आणले आहे कीं ती वर्णनें वाचूं लागलों तर किळसच यावी. माझी खात्री आहे कीं आपल्या-कडेही तो कायदा पास झाला तर त्याला तितकेंच हिडिस स्वरुप येईल. स्त्रियांना आपल्या लहरीनें वागायला त्यांच्या हातीं एक चाबूकच होऊन बसेल.

"हं-मी सांगते त्या तऱ्हेनं माझ्याशीं वागलं पाहिजे अं ?- तरच तुमचं माझं जमेल. नाहीं तर कायद्याचें फटकारे बसतील ?" असा घडोघडी धाक दाखवणाऱ्या महामायेशीं संसार करायला कोणता पुरुष—खुद्द सुधारक तरी तयार होईल ?—

"अहो तुम्ही एल्एल्. बी. ना ? मग असे भुकेदंगाल कसे ? वकि-लींत पैसा मिळत नसला तर हमाली करा—काय वाटेल ते करा—पण रहायला किनई—इश्श कसलं हे भिकार घर—! बंगला पाहिजे. फिटेल ना ही माझी हौस ? नक्की अं ? माझ्या मैत्रिणीनी माझ्याकडे मोटारींतून यावं आणि मला मात्र त्यांच्याकडे पायीं जावं लागावं ?"

" हिराबाईच्या रेकार्डस किती छान निघाल्या आहेत–हे काय हो—जेव्हां तेव्हां माझ्याकडे रागानें पहाता ?—ही मी चाललें—माझा कांहीं हिंदु पद्धतीनं तुमच्याशीं विवाह झालेला नाही—" रजिस्टर आहे रजिस्टर म्यारेज ? "

" अहो तुम्ही माझ्याशीं लग्न लावलत आणि सहासहा महिने माझ्याकडे ढुंकून पहात नाहीं ? "—

" वा: फार शहाणी तूं—तूं बर्थ कंट्रोलची पुरस्कर्ती, तेव्हां म्हटलं आपण थोडा योगसाधनाचा अभ्यास करावा—"

" छे–तुमचं माझं नाहीं पटायचं—मला काडीमोड केली पाहिजे—"

" इश्श तुम्ही आतां किती लठ्ठ होत चाललात ? मला नाहीं तुम्हीं आवडत ! "—

" तुमच्यांत मोठं व्यंग आहे—तुम्हाला गातां येत नाहीं. आणि मला अलीकडे संगीत फार आवडूं लागलं आहे—इश्श, असे ओठ काय चावता? तुम्ही कसेहि असलात तरी तुमच्याशीं जन्मभर संसार करण्यासारखा तो मेला हिंदु पद्धतीचा नाहीं आपला विवाह–रजिस्टर आहे रजिस्टर म्यारेज ? "—

अशा विचाराच्या ज्या सफ्रेजेटस त्यांच्याशीं कोणते पुरुष दोन हाताचे चार हात करायला तयार होतील ?—ते उलट दोन हात लांबच रहातील. अशा बायकांशीं विवाह करायला, हा निखारा पदरांत बांधून घ्यायला–ही ब्याद गळ्यांत अडकवून घ्यायला, जे भूत रोज मानगुटीवर बसणार अशाला जवळ करायला कोणता विचारी पुरुष तयार होईल ?

तेव्हां पुरुषांप्रमाणें स्त्रियांनीं अनेक लग्नें करण्याचें मनांत आणलें तरी या व्यवहारी जगांत तें कितपत शक्य आहे याचा त्यांनींच विचार करावा.

आतां समाजांत कांहीं पुरूष असे सांपडतात कीं जे पहिल्या बायकोला टाकून देऊन दुसरीशीं लग्न करतात. अर्थात् ही गोष्ट निंद्य आहे खास. पण हे माझ्यामतें अपवाद होत. समाजांत असे विवाह फार कमी आणि जे

पहिल्या बायकोस टाकण्यास प्रवृत्त होतात त्यांच्या बायकांत कांहींच दोष नसतात आणि पुरुषच तेवढे काय ते अपराधी असतात हे म्हणणें कितपत न्यायाचें होईल ? बायकांतही इतकें ब्रह्मांड दुर्गुण सांठवलेले असतात कीं त्याचें वर्णन करणें कवीसही कठीण जाईल.

" शंभर पुरुष एके ठिकाणीं राहूं शकतील पण दोन बायका कांहीं एकत्र राहूं शकणार नाहींत " ही तर बायकांविषयींची ख्याती !

" भाऊबंदकी " हा शब्द बायकांच्या दुष्ट स्वभावामुळेंच जन्मास आला असावा.

" जन्मदात्या आईबापांपासून कित्येक बायकांनीं आपले नवरे घराबाहेर काढले असतील ! "—

शेक्सपीयर " स्त्रीजात बेइराम म्हणतो " यांत कांहीं तथ्य आहे कां ?

माझ्या लिहिण्याचा उद्देश असा कीं आजचा स्त्री समाज स्त्रियांचा कैवार घेऊन केवळ पुरुषांना जो सारखा नांवे ठेवीत असतो त्यांत बायकांकडे ही पुष्कळ दोष येतो हे मला दाखवायचं आहे. पुरुष जसे बायकांना टाकण्यात अन्याय करतात त्याप्रमाणें दुष्ट बायकांच्या पायांत वैतागून गेलेलेही अनेक पुरुष दाखवतां येतील. स्त्रियाविषयीं कांहींच लिहितां येणार नाहीं कां ? अहाहा एकेक ध्यान पाहिलें तर ओकारीच यायची. पण अशा शूर्पणखा-नाही पुरुष संभाळून घेत नसतात कां ! ती गृहलक्ष्मी समजून तिच्याशीं आनंदानें संसार करीत नाहींत कां ! पुरुषांचा हा थोरपणा बायका कबूल नाहीं करायच्या—कांहीं कांहीं बायका पुरुषांवर इतका ताबा चालवीत असतात कीं प्रत्यक्ष जुलमी राजाही आपल्या प्रजेला इतका ताब्यांत ठेवत नसेल !—

## ( ७ ) स्वावलंबन

आजच्या जीवनकलहाच्या धकाधकीत पुरुषांना मदत म्हणून किंवा पुरुषांवर अवलंबून न राहतां स्वतंत्रतेनें रहातां यावें म्हणून स्त्रियांनीं नोकऱ्या अगर उद्योगधंदे करून मिळणाऱ्या पैशांवर जगणें म्हणजेच स्वावलंबन होय.

आपल्या हिंदु समाजाला म्हणण्यापेक्षां विशेषत: ब्राह्मण समाजाला ही कल्पना अगदीं नवी आहे. ब्राह्मण समाजांत स्त्रियांनीं पुरुषांशीं लग्नें लावून संसार थाटणें, घर संभाळणें, गृहकृत्यें करणें हे त्यांना माहीत. पुरुषांनीं बाहेरचे धंदे करून पैसे मिळवावेत, बायकांनीं घरांतील सर्व व्यवस्था पहावी ब्राह्मण समाजांत हे असें चाललें आहे. पण आजच्या 'स्त्री'ला, आजच्या 'गृहलक्ष्मी'ला, आजच्या 'महिले'ला हे पसंत नाहीं. त्यांना हे जिणें परावलंबी वाटतें. मानहानीचें वाटतें ! यांत स्त्रियांची उन्नती नसून त्या अधोगतीला जात आहेत, ही त्यांना मानसिक, शारीरिक, बौद्धिक सर्व तऱ्हेची गुलामगिरी वाटते. कारण स्त्रियांना इंग्रजी शिक्षण मिळत नव्हते तोंपर्यंत हे सर्व ठीक होतें; पण आतां जर स्त्रिया इंग्रजी शिकूं लागल्या आहेत तर त्याचा व्यवहारांत कांहीं तरी उपयोग झाला पाहिजे. मग इंग्रजी स्त्रिया जे जे करतात त्याचें अनुकरण करणें ओघानेंच आलें.

वास्तविक इंग्रज स्त्रियांची आणि आपल्याकडील स्त्रियांची गोष्ट यांत महदंतर आहे. तिकडील स्त्रियांच्या आयुष्याची, विवाहाची, नीतीची, कुटुंबाची कल्पना आपल्यापासून अगदीं भिन्न आहे. त्यांत पूर्व आणि पश्चिम इतका फरक आहे. आयुष्यांत लग्न झालें न झालें, लग्न सकाळीं झालें आणि संध्याकाळीं काडीमोडीचा प्रसंग आला तरी त्यांना त्याचें कांहीं वाटत नाहीं. लग्नाशिवाय परपुरुषांशीं संबंध आला तरी त्यांत नीति बिघडली असें त्यांना वाटत नाहीं. आगगाडींत जसा तात्पुरता प्रवास करावयाचा तसे त्यांचे वैवाहिक जीवन; घर करून, कुटुंब करून रहाणें याची त्यांना फारशी जरूरी भासत नाहीं. हॉटेल्समधून घरच्यासारखें जेवण मिळतें, तेथें रहाण्याचीही चांगली सोय असते, गर्भारपण आले तर प्रसूतिगृहें असतातच त्यांचे स्वागत करायला; मुलाला आईनें पाजलेंच पाहिजे असे नाहीं, त्याला सांभाळायला दाया आणि पाजायला उत्तम कंडेन्स्ड मिल्क मिळतें, मुलगा मोठा झाला कीं बोर्डिंगांत ठेवावयाचा, शिक्षण पुरें झालें कीं नोकरी

उद्योगधंदा करून त्यानें कोठेंही रहावें, आपले पोट भरावें, पसंत पडेल तिच्याशीं विवाह लावावा, मुलें नको असल्यास तशी व्यवस्था करावी अशी तिकडे स्थिति आहे. हा कित्ता आमच्या ब्राह्मणाच्या बायकांनीं गिरवावा अशी हौस त्यांना आली आहे; ज्या पाश्चिमात्य देशांत हे आचार सुरूं आहेत त्या देशांत त्यांना या आचारापासून सुख आहे कां ? जर त्यांना त्यांत सुख असेल तर आपण त्याचें अनुकरण करावें !—पण तिकडच्या मोठमोठ्या लोकांची त्या विरुद्ध जर ओरड सुरूं आहे तर त्याचे आपण शहाणें होण्याकरतां शहाणपण शिकावें हा कुठला शहाणपणा ?

खरें पाहिलें तर आपला समाज जरी आजच्या स्थितींत आर्थिक दृष्ट्या इतका खालावलेला आहे तरी तो सुधारायला स्त्रियांनीं उद्योग अगर नोकऱ्या करून द्रव्य मिळविणें हा खरा उपाय नव्हे. उलट पुरुषांच्या मार्गांत त्या अडचणी उत्पन्न करीत आहेत. पाश्चात्य ज्ञानाच्या संसर्गानें आपल्याकडच्या स्त्रियांनीं आपली जी स्त्रीत्वाची कल्पना ती पार बदलून टाकली आहे. जे त्यांना भूषण तें दूषण वाटूं लागलें आहे. त्याचा परिणाम मात्र आज असा स्पष्ट दिसत आहे कीं कुंटुंब करून रहाण्याची त्यांच्या अंगांत पात्रता उरलेली नाहीं—अविवाहित आयुष्य काढणें कष्टप्रद वाटूं लागलें आहे—फार शिकलेली बाई ही झेपायची नाहीं—तिच्या कल्पना मोठ्या, तिचा खर्च दांडगा, म्हणून अशा स्त्रीशीं विवाह करायला पुरुष सहसा तयार होत नाहीं. शिक्षणाचा परिणाम जो " प्लेन लिव्हिंग हाय थिंकिंग् " त्याचें ऐवजीं "हाय लिव्हिंग अँड नो थिंकिंग" असा होऊन बसला आहे; त्यामुळें शिकलेल्या स्त्रियांचा समाजाला तर काडीचा उपयोग नाहीं—एक नवें खूळ समाजात धिंगाणा मात्र घालीत आहे.

थोडीशीं शिकलेली बायको ज्याच्या घरांत आहे त्याचा संसार पहावा, कुटुंबांत दोन माणसें असली तरी घरांतील केर काढण्यास, अंथरूणें पांघरूणें घालण्यास, भांडीं घासण्यास, दळणें दळून आणण्यास, लुगडी, धोतरें

घुण्यास, मंडईतील भाजी आणण्यास गडी अगर मोलकरीण लागते. वास्तविक स्वयंपाकाची भांडी अशी किती असणार ? त्या बाईचा नवरा ज्या कचेरीत काम करीत असतो त्याच्यापुढें पडलेला कामाचा ढीग पहावा म्हणजे त्या मानानें ती भांडी कांहींच नसतात पण ही रानटी चाल–शहरांतल्या बायकांनीं कशी पत्करावी !–कचेरींत तो बिचारा मान मोडून कामें करीत असतो आणि आंग मोडून घरांतील कामें करायला बायकोला कमीपणा वाटतो ! कचेरींत एखादें लहानसें चिटोरे कां असेना ते जपून ठेवा. यसाठीं तो बिचारा दक्ष असतो पण मोलकरणीनें घसाघसा आदळून आपटून चार महिन्यांत जरी भांडी फोडली अगर लुगडी फाडली तरी बायकोला त्याची किंमत नसते. दोन मैल ऑफीस लांब असले तरी तो बिचारा दमला थकला असला तरी तसाच रेटत पायीं येत असतो, तेवढेंच चार आणे वाचलें आणि " वेणी अं " म्हणून पोऱ्या ओरडला कीं, बायको चटकन् आणा काढून देतें. कोणी रिकामटेकड्या बायका आल्या कीं चार कप काय आणि आठ कप काय चहा चढलाच चुलीवर–अन्न उरलें कीं झाली मोलकरणीची धन ! ऑफिसचे काम पांच वाजायचे आंत कसें उरकेल ही त्या बिचाऱ्याला काळजी आणि घरांत पांचट मासिकें वाचून बायको कसा तरी वेळ दवडीत असते ! अवेळीं खाणेपिणें, सिनेमा, नाटकें, घरांत नको असणाऱ्या जिनसा, फाजील कपडे, निष्कारण प्रवास यामुळें पैसा मिळत नाहीं कां जो मिळतो तो अनाठायीं खर्च होतो ? बहुतेकांची वाण्याकडची उदारी असते. तो देईल तें माप आणि काढील ती उधारी ! किती बायका अगर पुरुष आणलेल्या सामानाची नक्की बाकी सांगूं शकतील ? शिवाय बाहेर कोठें चार ठिकाणीं चौकशी न करतांना दारांवर घेणारें लोक तर खास फसत असतात. माप खरें असतें कीं खोटे याची चौकशी कोण करतो ? एकाच वाणाची दोन लुगडी रमाबाई, ठमाबाईनीं घेतलेली असावीत. रमाबाई सहज ठमाबाईला लुगडे दाखवतें–रमाबाईनें किंमत

दहा रुपये सांगितली कीं, " अगबाई मी अकरा दिले, दारांवर आला होता, भेल्यानं चांगलंच फसवलं "–ठमाबाई ओरडत असतात. दागिन्याचंही तसच. पूर्वींचे लोक गोट, तोडे, सरी, वाक्या असें ठोक जिन्नस करीत. आजचे दागिनें लाखेचे, हलके फूल मोडायला गेलें तर रुपयाचें चार आणे कांहीं हातीं लागत नाहींत. तेव्हां अत्यंत काटकसरीनें जर संसार केला तर आजच्या स्थितींतही कुटुंब सुखानें जगूं शकेल पण इकडे कोण लक्ष देणार !

आजच्या स्त्रियांची उच्च महत्त्वाकांक्षा म्हणजे नोकरी करावी, दुकानें उभारावींत, खाणावळी ( त्याला नांव हॉटेल द्यावें ) उघडाव्यात.

नोकरी म्हटलं कीं बायकांची अशी एक समजूत होऊन बसली आहे कीं "अं, त्यांत काय आहे अर्ज खरडला कीं नोकरी ठरलेलीच. त्यांत काडीचा त्रास नाहीं. शाळा म्हणा, ऑफीसे म्हणा, अगदीं आपल्या घरांजवळ !–वरिष्ठ अधिकारी काय–आपल्या मुठींत खास असणारच. पगार मनांप्रमाणें मिळणारच." आज प्रत्येक स्त्री आपल्या खोलींत बसून असे मनोराज्य करीत असते. पण जे आज नोकरी करीत आहेत त्या पुरुषांना नोकरीचा इंगा विचारावा म्हणजे त्यांत काय सुख असते तें बायकांना कळून येईल. जरा जेवायला उशीर होऊन हाफीसची वेळ टळूं द्या कीं त्या बिचाऱ्या कारकुनांची धांदल पहावी–कांहीं वेळेला तर रस्त्यानें पळत सुटलेले दिसतात. ते दप्तर खाकोटीला, वरून पाऊस पडतोच आहे, चिंगल उडाल्यामुळें पाठीकडे पहाण्याची सोयच नाहीं, जोडा पायांतून निसटतोंच आहे–सायकलची घंटा, मोटारचा पोंSSSपों तर हात धुवून पाठीमागें लागलेलाच असतो–टांगेवाल्याचें 'ए दप्तर' 'ए छत्री'–अशा स्थितींत काय त्या बिचाऱ्याची त्रेधा उडत असेल !–बायकांवर असे प्रसंग यावेत आणि नोकरी करायची म्हटलं कीं असे प्रसंग येणारच–तर बायका कशा पळत सुटणार आणि ऑफिसं कशी गांठणार ? उद्यां बुधवार, शनवार, सदाशिव

पेठेंतील बायकांनीं नोकऱ्या करण्याचें ठरविलें आणि समजा त्यांच्या सुदैवानें त्यांना नोकऱ्या मिळाल्या तरी सरकार कांहीं स्त्रीदाक्षिण्य दाखवून मोरोबा-दादांच्या वाड्यांत कलेक्टर कचेरी आणणार नाहीं, किंवा जनरल पोष्ट ऑफीस विश्राम बागेंत ठेवणार नाहीं. रोज दोन तीन मैल तंगड्या तोडत जाण्याचा प्रसंग खरोखरच बायकांवर यावा म्हणजे नोकरीचा इंगा त्यांना कळेल. शिवाय वरीष्ठाची खेटरपूजा, व कामाचें ढीग पाहिल्यावर नको ही नोकरी, याच्यापेक्षां प्रसुती वेदना बऱ्या असेंच उद्गार त्यांचे तोंडून निघतील. सर्वच बायका कांहीं एम्. ए. किंवा एम्. डी. होत नाहींत; किंवा सर्वच बायकांना कांहीं शाळा खातें मिळणार नाहीं. समजा उद्यां पोष्टांत पांच बायकांना नोकऱ्या मिळाल्या तरी सर्वच कांहीं सुपरिंटेंडेंट किंवा क्लार्कस होऊं शकत नाहींत. पोष्टमनचें काम ज्या बाईवर येईल तिनें हातात पत्रें किती घ्यावीत, खाकोटीला पार्सलें किती मारावीत, इन्शुअर-न्सेस डोकीवर किती ठेवावीत! शिवाय "ललना मना नच अघलव शंका" अशा स्त्रिया 'दुरुन चला' असं कितीकांना म्हणणार आणि लांबून पत्रें कितीकांच्या पुढें टाकणार?

येऊन जाऊन बायकांना त्रास पडणार नाहीं असें खातें म्हणजे शाळा खातें होय! पण तें खाते तें केवढें—त्यांत आतांच इतकी चेंगराचेंगरी झाली आहे कीं, किती तरी बायकांना आज घरीं बसण्याची पाळी आली आहे! मग सर्वच बायकांनीं नोकऱ्या करायचें म्हटल्यावर त्यांना जागा कोठून मिळणार?

खाणावळी बायकांनीं काढाव्यात हे शिक्षण घेऊन स्वतंत्र वृत्तीनें रहा-णाऱ्या बाणेदार बायकांनीं आपल्या पुढें ध्येय ठेवायचे म्हटलें तर त्यांनीं तो मार्ग स्वीकारावा. त्यांतला अनुभव घ्यावा म्हणजे समाजांत मान्यता किती मिळतें, पैसा किती मिळतो, किती सुख लागते, किती स्वतंत्रता मिळते हें त्यांचें त्यांनाच कळून येईल. स्त्री जीवनाची आमच्या मतें ही थट्टा आहे.

या एकंदर विवेचनांवरून बायकांनीं स्वावलंबी होणें किंवा होण्याची आशा धरणें किती निरर्थक आहे हें दिसून येत आहे. उत्तम संसार करणें,

त्यांतच शक्य ती काटकसर घरकामें करून करणें हेंच त्यांचे खरें स्वावलंबन. भलत्या भानगडींत पडून त्यांनीं आपली फसगत करून घेऊं नयें. **बायकांनीं प्रत्येक बाबतींत पुरुष होण्याची हाव धरणें हें खास त्यांच्या उन्नतीचें दर्शक नव्हें**

( ८ ) पतिनिधनानंतरची स्त्रियांची स्थिति

एक गोष्ट मात्र सत्य आहे कीं पतिनिधनानंतर स्त्रियांची स्थिति अत्यंत शोचनीय होतें यांत शंका नाहीं. ज्या घरांत स्त्रीचा पति जिवंत असताना ती मालकीण म्हणून वावरत असते त्याच घरांत पतिनिधनानंतर तिला कोणी प्रेमानें वागवलें तर बरे, नाहींतर तिची कोणत्याही वस्तूवर सत्ता उरत नाही. ज्या घरांत तिने गृहिणी म्हणून हक्क सांगावा, पतीच्या जिवावर तोऱ्यांत मिरवावें, सौभाग्यवती म्हणून समाजांत थाटामाटानें चमकावें, तिच्यावर पतिनिधनानंतर घरांत तोंड लपवून आयुष्याचे दिवस काढण्याची पाळी यावी याच्याइतकी दुर्दैवाची जगांत दुसरी गोष्ट नसेल. खिंडींत सांपडलेल्या माणसाला चोर जसा लुबाडतो, नागवतो तशी तिची अवस्था करून टाकायची. पतिनिधनानंतर कोण ती तिच्या अंगावरील दागिने उतरून घेण्याची घाई ? आधीं न्हावी बोलवा आणि तिला भादरून टाका ! सनातन्यांची ही पहिली ओरड ! जगांतील कोणत्याहि विषयसुखाची तिनें आशा करतां कामा नये ! फारच ती वटवट करूं लागली तर दिलें तिच्या अंगावर पोटगीचे पाचदहा रुपये फेकून—जग नाहीं तर मर !—

या स्थितीतून त्यांची मुक्तता व्हायला पहिली गोष्ट जर कोणती व्हावयास पाहिजे असेल तर ती ही कीं त्यांचीं शक्य तितक्या लवकर लग्नें करून टाकणें ही होय. त्यांच्या कामवासना या प्रथम तृप्त झाल्या पाहिजेत. पोटाचा प्रश्न कसा तरी सुटत असतो; पण समाजानें त्यांच्या ज्या कामवासना दडपून टाकल्या आहेत त्या तृप्त करण्याकरतां त्यांना जे आडमार्ग स्वीकारावें लागतात, निष्कारण बालहत्या करणें त्यांना प्राप्त होतें या गोष्टीला प्रथम

आळा बसला पाहिजे. बायका या गोष्टी खास अनुसरतात आणि पुरुषाच्या सहवासाशिवाय जर या सर्व गोष्टी घडत नाहींत तर पुरुषांशी रासरोस त्यांची लग्नें लावून देऊन समाजांत त्यांना उजळ माथ्यानें, निर्भय चित्तानें, मानमान्यतेनें जगूं देणें हेंच योग्य नाहीं कां ?

बालविधवांना अविवाहित ठेवून त्यांना शिक्षणाचा मार्ग दाखवणें हा खास त्यांच्या कल्याणाचा, सुखाचा, उन्नतीचा मार्ग नव्हे ! ज्या वयांत ज्या गोष्टींची आवश्यकता वी प्रथम झाली पाहिजे तीच केली पाहिजे, पोटांत आगीचा डोंब उसळला आहे आणि तोंडानें वेदघोष करायला लावलें किंवा "शिक्षण शिक्षण" म्हणून उपदेशाचें पाठ दिलें तर त्याचा उपयोग किती होईल ? अन्नाचें घासच प्रथम तोंडांत कोंबले पाहिजेत; अन्नापेक्षांही वासनांच्या वेदना तीव्र असतात आणि पुरुषांपेक्षां बायकांना कितीतरी पटीनें अधिक वासना असतात असें म्हणतात; तर तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. पण आजच्या बायकांची, समाजाची शिवकणच उलटी ! मग आयुष्याचें तारूं आपलें वाऱ्याच्या झोकानें जिकडे जाईल तिकडे चालले आहे; त्याला निश्चित मार्ग नाहीं, निश्चित ध्येय नाहीं. तेव्हां बायकांना थोडा वेळ शिक्षण नाहीं मिळालें—त्यांना पुरुषाचें दास्यत्व पत्करावें लागलें तरी पुरवलें पण त्यांची जी कुचंबणा चालली आहे, त्यांच्या हातून ज्या हत्या होत आहेत त्या तरी खास त्यांची लग्नें झालीं तर थांबतील, त्यांच्या मनाला स्वास्थ्य येईल; आपण विधवा झालो तरी समाजांत आपणाला पुन्हां सौभाग्यपद लाभून सुखानें जगतां येईल अशी खात्री त्यांना वाटूं लागली कीं मग त्यांनीं थोडे शिक्षण घेतले किंवा त्यांना ज्या सुधारणा इष्ट वाटतील त्याचा त्यांनीं अंगिकार करण्याचें ठरवलें तर त्याला कांहीं दिवसानी तरी खास गोड फळे येण्याला सुरवात होईल.

ही तरुण विधवांची गोष्ट झाली पण साधारण उतार वयांत ज्या विधवा होतात त्यांना आपलें आयुष्य सुखानें घालवण्यास योग्य अशी समाजव्यवस्था

खास झाली पाहिजे. पुष्कळ निरनिराळे मार्ग सुचवितात. सनातनी म्हणतात त्यांनीं उरलेलें आयुष्य कुटुंबांतच राहून जे मिळेल ते खाऊन व कुटुंबसेवा करून घालवावें; सुधारकांचे म्हणणें हा त्यांच्यावर जुलूम आहे. त्यांच्या नवऱ्यांचा जो कांहीं स्थावर जंगम इस्टेटीत हक्क असेल तो त्यांना त्यांच्या नवऱ्यांच्या पश्चात मिळालाच पाहिजे. त्यांना वाटलें तर त्यानीं कुटुंबांत रहावें. त्यांची तशी इच्छा नसल्यास त्यांना स्वतंत्र रीतीनें कोठेही रहाता यावें अशी समाज व्यवस्था पाहिजे.

वास्तविक दोघांच्याही म्हणण्यांत उच्च हेतु आहे, पण अनुभव पाहिला तर दोघांच्याही म्हणण्यांत तथ्य नाहीं. दोघानाही त्यांना जगवावें अशी इच्छा आहे पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहिली तर दोघेही त्यांना खायला बसले आहेत. करणारानें समाजव्यवस्था अगदीं उत्तम हेतूनें केली पण त्याचा आजचा आचार जर पाहिला तर त्याच्या अगदीं उलट दिसतो. एकानें त्याचें मंडण केलें कीं, दुसऱ्यानें त्याचें खंडण करण्यास केलीच सुरवात. एकानें स्तुतीला आरंभ केला कीं, दुसऱ्यानें निंदेला आरंभ केलाच. एकानें एक गोष्ट चांगली म्हणण्याच्या अवकाश. त्याला वाईट म्हणायला दुसरा टपलेलाच असतो. नियम केले तें मोडायला उठलाच कोणी तरी. वास्तवीक जे मनुष्य आपल्या घरांत वीस वीस वर्षे राहिलेलें आहे तें कायमचें आपले घरांत रहावें अशी इच्छा कोण धरणार नाहीं ? या धोरणानें विधवेनें एकत्र कुटुंबांतच जन्म काढावा असें कोणी म्हणूं लागला कीं "घरांत एक हक्काची मोलकरीण झाली" म्हणून झालीच सुरवात तिचा बुद्धिभेद करायला. मी असे कित्येक सुधारक पाहिले आहेत कीं, ज्यांनीं एकत्र कुटुंबांतील विधवांची दीन स्थिति गावी. "त्यांना स्वातंत्र्य नाहीं, त्यांना मानानें वागवलें जात नाहीं त्या एका पैशाला महाग होतात" "सर्वांचीं बोलणीं त्यांना खावी लागतात" म्हणून त्यांना घरांबाहेर काढायचें आणि त्याच स्त्रिया त्या सुधारकांच्या घरीं भाकरी बडवीत, उष्टी

काढीत आणि भांडी खरडीत आपलें आयुष्य घालवीत असलेल्या दिसतात ! इकडे दीर वगैरे तिच्या पैशाचा अपहार करतील, तिला नागवतील, बुडवतील म्हणून तिला घरांबाहेर वकील वाद करून काढतील आणि मग ते काय करतील तर प्रोसेस, स्टॅंप, दरखास्त, कैफीयत, अपील असे म्हणत म्हणत तिला सर्वस्वी लुबाडून अखेर भिक्षापात्रच तिच्या हातांत देऊन मोकळे होतील ! वकीलाच्या कचाटयांत न्याय मिळण्याकरतां गेलेल्या किती विधवाना सुखानें जगता आले असेल ? एखाद्या विधवेचा पोटगीचा दावा कोर्टांपुढें यावा म्हणजे बाहेर विधवांचे कैवारी म्हणून मिरवणारे कोर्टांत कशी आपली अक्कल लढवीत असतात तें पहावें ? विधवेच्या वकीलानें उत्पन्नाच्या मानानें जर दोनशे रुपयेची मागणी केली तर विरुद्ध बाजूच्या वकीलानें तक्रार केलीच—त्यांच्या मागणीला हरकत घेतलीच म्हणून समजावें ! मग अशा परस्थानी विधवांच्या इस्टेटी गिळंकृत करण्यापेक्षां घरच्या माणसांनीं खाल्लें म्हणून बिघडलें कुठे ? सुधारकांची जी ओरड आहे कीं विधवेला कांहीं हक्क नाहींत पण आज अशा कित्येक विधवा आहेत कीं ज्यांच्या हातीं आजपर्यंत अनेक वेळा भरपूर पैसा आलेला आहे पण समाजांत कावळे टपलेलेच असतात त्यांच्या टाळूवरून हात फिरवायला ! वाडवडिलांनी मिळविलेल्या इस्टेटी परक्याच्या घरांत जर कोणी घालीत असतील तर या विधवाच. जे ते त्यांना लुबाडायला, त्यांना खायला, आपली दुकानें उघडून बसलेलेच असतात. कथेकरी, पुराणीक, बुवा, हे तर त्यांचे हक्काचें खरें वारसदार. त्यांना खायला बसला नाहीं कोण ? सर्वांची धडपड असते ती त्यांचें लचके तोडायला। "स्वातंत्र्य" "उन्नति" या वर्तमानपत्रांतील पोकळ, भुलवणाऱ्या, फसवणाऱ्या जाहिराती होत ! पुष्पांडपाकाची जाहिरांत देणाऱ्याचा जो हेतू तोच या विधवांच्या कैवाऱ्यांचा ! समाजात जर इतकें थोर मनाचें, उच्च विचाराचें, उत्तम संस्कृतीचें लोक असतील तर मग कायदे सुधारणा हे शब्द फोल नाहींत कां ? विधवांची स्थिते

परावलंबी नाहीं, करुणास्पद नाहीं असे आमचे म्हणणें नाहीं पण त्यांच्या स्थितीची जी भेसूर चित्रें रंगविली जातात तितकी ती खास नाहींत. उलट अशा परावलंबी स्थितीत दिराजवळ असतांना त्यांना जे थोडे बहुत मानानें सुख मिळण्याचा संभव त्याला पण त्या स्वतंत्र झाल्यामुळें पारख्या झाले-ल्याची उदाहरणें नाहीं कां दाखवतां यायची ?

आजकालच्या कांहीं विचारी लोकांचें म्हणणें आहे की स्त्रियांना ज्ञाना-ल्यानें शिक्षण दिले पाहिजे. त्यांना ज्ञानी केले पाहिजे म्हणजे त्यांचे त्यांना हित कळूं लागेल—त्यांना मिळालेली संपत्ति रक्षण करण्याचें त्यांना कळेल व मग त्या सुखी होतील. स्त्रियांना शिक्षण देऊं नये—त्यांना ज्ञानी करूं नये, आपलें हित पहाण्याला आणि इस्टेट राखण्याला त्यांच्यांत लायकी उत्पन्न करूं नये असे कोण म्हणेल? पण केवळ शिक्षणानें त्यांची स्थिति सुधा-रेल, त्यांची संकटे नाहींशीं होतील, त्यांची संपत्ती टिकेल हे म्हणणें आम्हांला पटत नाहीं. जे शिक्षण आपण स्त्रियांना देऊन त्यांना सज्ञान करणार त्याच्यापेक्षांही उच्च शिक्षण घेतलेलें पुरुष आपल्या समाजांत हल्लीं काय कमी आहेत ? त्यांची आज काय स्थिति आहे ? आज कोर्टांत जे दावें चालूं आहेत ते काय फक्त अडाणी, निरक्षर, लोकांचेच आहेत ?--चांगलें चांगलें सुशिक्षित काय भांडत नाहींत ? लांड्यालबाड्या करीत नाहीत ? देवाची शपथ घेऊन काय खोट्या साक्षी देत नाहींत ? वकीलाची दारें पुजत नाहींत ? लोकांना लुबाडीत नाहींत ? गरीबांचे काळ होऊन बसत नाहींत ? शिक्षणाचा दुरुपयोग करून त्यावर पैसा मिळवीत नाहींत ? आणि घालवीतही पण नाहींत ? स्त्रियांना फसवीत नाहींत ? त्यांना वाममार्ग दाखवीत नाहींत ? त्यांच्या टाळूवरून हात फिरवीत नाहीत ? समाज सुधा-रतो तो केवळ शिक्षणानें नाहीं--आजच्या शिक्षणानें तर खास नाहीं ! ज्यांना ए. बी. सी. डी. ही येत नाहीं अशा लोकांत काय दानत नाहीं ? प्रामाणिकपणा नाहीं ? परोपकार नाहीं ! भूतदया नाहीं ? सचोटी नाहीं ?

संस्कृति नाहीं ? माणूसकी नाही ? तुम्ही आगगाडीत मजा पहा. एखादा शिकलेला सिगारेटसचे झुरके ओढीत ऐटींत दहा माणसाची जागा अडवून बसेल--तोंच एखादा लंगोटया " या दादा--बसूं या दाटीदाटीनं, चार घटका तर काढायच्या " म्हणून आंग चोरुन बसेल ! " वैद्यो नारायणो हरी " किती सांपडतील ? मोठमोठ्या ब्यांका काढायच्या--लोकांच्या ठेवी साहजोकपणें ठेवायच्या आणि अखेर आपली तुंबडी भरून म्यानेजरानें दिवाळे काढायचे हा शिक्षणाचाच परिणाम ना ? केवळ शिक्षणानें स्त्री सुधारेल--तिला आपली इस्टेट जतन करण्याची अक्कल येईल या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

विधवांच्या हालांची सुधारक वर्णनें करतात, जगांत हाल कोणाचें नाहींत ? जगांत किती सुखी सांपडतील ? जगांत भांडणें काय कमी चालत असतात ? पण अशा जगांत आपण पटवून घेऊन नाही कां चालत ? प्रत्येकानें स्वतंत्र व्हावें आणि आपलें तेवढें हित पहावें म्हटलें तर जगच चालणार नाहीं. विधवांनी तरी थोडे आप्तमंडळीशीं पटवून घेतलें म्हणून बिघडले कुठे ? दिरांपासून फटकून निघून घरोघर भाकरी भाजीत हिंडणें यांत तरी काय विधवा मिळवतात ? त्यांत काय कमी कष्ट पडत नसतील ? आम्ही शिकून मास्तरिणी होऊं ही ऐट मारण्यांत तरी काय अर्थ आहे ? त्यांत काय हाल कमी असतात ? वरच्या अधिकाऱ्यांच्या काय लाथा खाव्या लागत नाहींत ? त्यांना किती स्वतंत्रता मिळते ? ज्या स्त्रिया या स्थितीचा अनुभव घेत आहेत त्यांनीं प्रामाणिकपणें सांगावें कीं यांत किती सुख असतें, किती स्वातंत्र्य असते ! शिक्षणापेक्षांही यांत खऱ्या जर कोणत्या गोष्टीची आवश्यकता असेल तर घराण्याचा, कुटुंबाचा अभिमान असणें ही होय. " आपल्या नांवाकरतां मरायचं " ही जी म्हण आहे त्यांत जीविताचें सर्वस्व आलें असें समजण्यास हरकत नाहीं.

भाऊ मेल्याबरोबर भावजय घरांतील निम्मी वाटणी घेऊन घरांबाहेर जाणार असा जर नियम झाला तर भाऊ भाऊ जिवंत असताना " ताटांत सांडलें काय—वाटीत सांडले काय " हा जो आपलेपणाचा, एकत्र कुटुंबाचा कुटुंब परंपरा चालविण्याचा अभिमान आहे तो खात्रीनें टिकणार नाहीं-- नवरा मेल्याबरोबर " टाका माझी वाटणी--माझी मी स्वतंत्र आहे--मी महाराला देईन " असे म्हणणाऱ्या ज्या बायका त्यांच्या नवऱ्याकरतां त्यांच्या आई बापांनीं, भावानी कांहींच कां श्रम केलें नसतील ? कांहींच कां झीज सोसली नसेल ? वाडवडिलांनीं इस्टेटी करून ठेवायच्या त्या कुटुंब परंपरा टिकावी आपल्या घराण्याचें नांव चालावें म्हणूनच ना ? तेव्हां थोडे हाल सोसावें लागलें तरी तें सोसलें पाहिजेत. पण ज्या समाजांतील गुंडाना अशा स्त्रियांचे रक्त खायचे असते ते त्यांना योग्य असा सल्ला कां देतील ?

एक गोष्ट मात्र खरी कीं, सर्व समाज जर खरोखरीचा उच्च संस्कृतीचा असला की, " परद्रव्य लोष्ठवत, परस्त्री मातृवत " हे त्याच्या हाडांत पूर्ण मुरलेलें आहे मग अशा समाजांत जरी स्त्रिया स्वतंत्र राहिल्या तरी त्यांच्याविषयीं एक प्रकारचा विश्वास धरायला हरकत नाहीं; कारण समाज कांही तिला लुबाडणार नाहीं गिळणार नाहीं--तिच्या पश्चात सर्व इस्टेट आपल्याच घराण्यांत परत येणार आहे--मग राहिली कांहीं दिवस स्वतंत्र म्हणुन बिघडले कुठे ? पण आजचा समाज काय--हातांत दर्भ घेऊन तिचे श्राद्ध करायला उभा आहे ! अशा समाजात ' अनाथ ' ' अबला ' म्हणून संबोधणाऱ्या स्त्रियांची स्वतंत्र राहून धडगत कशी काय लागेल याचा विचार त्यांनींच करावा.

त्यांच्या सुखाचा जो दत्तक घेण्याचा मार्ग त्याची उदाहरणें समाजाच्या डोळ्यापुढें आहेतच. मेल्यानंतर त्यांना काय मोक्षप्राप्ती असेल ती असो--या आयुष्यांतच त्यांचा कपाळमोक्ष होत असतो—मेल्यानंतर तो पिंड देईल

कां नाहीं याची साक्ष जिवंतपणींच तो त्यांना अन्नाला महाग करून देत असतो—त्यांचे पिंड पाडीत असतो. मेल्यानंतर तो पाणी पाजण्याची वाटच पहात नाहीं, या जन्मीच त्यांना पाणी पाजून मोकळा होतो. घराण्याचा तो लौकिक ठेवील कां नाहीं याची विधवांना काळजी करण्याचें कारणच पडत नाहीं—त्या जिवंत आहेत तोंपर्यंतच तो घरादाराचें वाटोळें करून त्यांना त्यांच्या हयातींत घरोघर भिक्षा मागायला लावीत असतो. तेव्हां यासंबंधी अधिक लिहिण्याची जरूरीच नाहीं. आज अनुभवानेंच जग शहाणें होत चालले आहे.

या एकंदर विवेचनावरून तरुण विधवांना आमचे सांगणें कळाले असेलच कीं त्यांनीं शिक्षणाच्या मागें न लागतां आपली लग्नें कशी होतील या प्रयत्नाला लागावें आणि ज्या विधवांची लग्नाची मर्यादा ओलांडली आहे त्यांनीं समाजावर विश्वास न टाकताना आपल्या कुटुंबातच राहून उरलेलें आयुष्य काढावें हाच त्यांच्या सुखाचा खरा मार्ग आहे. आगीतून सुटून फोफाट्यांत पडण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

### ( ९ ) स्त्रियांचे शिक्षण.

स्त्रियांना शिक्षण नको असें म्हणणाराला जग मूर्खांत काढील! काढेना—नाहीं तरी जग कोणाला शहाणें म्हणत असतें ? आम्हीं तरी स्त्रियांना शिक्षण नको असें कसें म्हणूं! अंधश्रद्धेनें स्त्रियांना शिक्षण नको कारण पूर्वीं कुठें स्त्रियांना शिक्षण मिळत होते, मग त्यांचा कुठें प्रपंच अडला होता असेंहि म्हणणार नाहीं; आणि आज मुलींना अगदीं त्या पांच वर्षांच्या झाल्याबरोबर त्यांच्या हातांत पाट्या देऊन जे शाळेंत टाकायचें तें मरेपर्यंत किंवा त्यांची लग्नें होईपर्यंत त्यांना अविचारानें (aimlessly) शिकवावें असेंहि म्हणणार नाहीं. परंतु याचा विस्तारानें विचार करण्यापूर्वीं स्त्रियांचा जन्म कशा करतां आहे, या जगांत त्यांचा योग्य मार्ग आणि निसर्गतः त्यांचे खरे कर्तव्य कोणतें याचा प्रथम विचार करूं.

जगांत प्रत्येक गोष्ट सहेतुक निर्माण होते. ब्रह्मदेवानें स्त्री निर्माण केली यांत त्याचा विशिष्ट हेतूं असलाच पाहिजे. नाहीं तर शरीराची रचना त्यानें पुरुषासारखीच केली असती; पण स्त्रीचा जन्म नवऱ्याची बायको होण्याकरतां, नवऱ्याकडून प्रजोत्पादन करून घेण्याकरतां, उत्तम गृहिणी, उत्तम माता होण्याकरतांच आहे असें ठरवूनच त्यानें तशी रचना केली. 'मनूनें'- असें म्हटलें आहे म्हणून आजच्या बायका त्याच्या नांवानें खडे फोडतात आणि आम्ही त्या मनूचा अनुवाद करतो म्हणून आम्हालाही त्या नांवें ठेवतील हे आम्ही पूर्ण ओळखून आहोत. आम्हाला तर मनू पूर्ण पटतोच पण आम्हीं असेंहि म्हणूं कीं मनू म्हणतो म्हणून आम्ही म्हणतो असेंही कोणी समजूं नये. आम्हाला कालचा मनू, मिल्ल माहीत नाहीं आणि आजचा रसेल, स्टॅनले हॉल किंवा बेन लिन्डसेहि माहीत नाहीं. झाड म्हटलें कीं त्याचें धर्म कोणते हे समजावून घ्यायला वनस्पती शास्त्राचा अभ्यास कशाला करायला पाहिजे ? ते उगवून वरती आलें कीं त्याला पानें फुटणार, फळें येणार हें ठरलेलेच.

ती कुमारिका आहे तोपर्यंत पुरुषाला जशी विद्या तशी तिला गृहकृत्यें, ती उपवर झाली कीं तिचें लग्न लावणें व लग्नानंतर प्रजोत्पादन करून कुटुंब रक्षण करणें, गृहस्थाश्रम पाळणें हा तिचा खरा धर्म 'शिक्षण शिक्षण' करणाऱ्या बायकांना माता होण्यांत खरें सुख काय असते हें त्या कुमारिका राहिल्यामुळें त्यांना कळत नाहीं. त्यांना एकदां ते सुख मिळूं द्या. त्यांना ते शिक्षण, जगाची इतर सुखे तुच्छ वाटलीच पाहिजेत. हा सहज धर्म आहे. स्त्रियांनीं निर्हेतुक शिक्षण घेणें, अविवाहित राहून नोकऱ्या करणें हा खरा व्यभिचार आहे. निसर्गाचा, शरीर धर्माचा हा कोंडमारा आहे. हा आत्मघातकीपणा आहे! यावरून स्त्रियांचा जन्म कशाकरतां आहे आणि त्यांचे कर्तव्य कोणते हें आमच्या मतें तरी उघड आहे.

आतां स्त्रियांनीं आपली लग्नें करणें, माता होणें, कुटुंब रक्षण करणें ही जरी त्यांची कर्तव्यें आहेत तरी त्याला आनुषंगिक अशा इतर गोष्टींची आवश्यकताही नको असें नाहीं; 'गवयाचें गाणें' असें म्हटलें तरी त्याला तंबोरा, तबला, साथ करणारा, हें सर्व जसें पाहिजे त्याचप्रमाणें संसाराचेंहि आहेच. तो संसार किंवा तें कुटुंब उत्तम रीतीनें हाकता यावें म्हणून पुरुषांत आणि स्त्रियांत नानाविध गुणांची जरूरी आहे. पुरुषाला शिक्षण पाहिजे याचा अर्थ केवळ धनोत्पादनाकरतां त्याची आवश्यकता आहे असें नाहीं; त्या शिक्षणामुळें तो एक उत्तम नागरीक व्हावा, संसारांत तो एक कर्ता पुरुष व्हावा, त्याचे अंगीं श्री दाक्षिण्य यावें वगैरे अनेक गुणांचा समुच्चय व्हावा हा त्यांतला मूळ उद्देश आहे. स्त्रीलाहि शिक्षण पाहिजे. कारण आपल्या संसारांत जगाशीं जो व्यवहार चालला आहे त्याचे यथार्थ ज्ञान तिला शिक्षण असल्याशिवाय कसे मिळणार? तेव्हां स्त्रियांना शिक्षणाची जरूरी नाहीं असें नाहीं पण ते अगदीं अल्प प्रमाणांत; आयुष्याचें ते सर्वस्वी ध्येय होऊं शकत नाहीं. त्याच्याकरतां स्त्रीधर्म सोडण्याची आवश्यकता नाहीं.

स्त्रियांच्या शिक्षणाचे दोन भाग पडतात. एक जरूरीपुरते शिक्षण आणि दुसरें जरूर आहे म्हणून शिक्षण. वास्तवीक मुलीचें शिक्षण किती असावें हें तिच्या आईबापानींच ठरवणें योग्य आहे. आज आईबाप आणि मुलगी या अशा वाटेनें चालल्या आहेत कीं ज्याला कांहीं उद्देश हेतू ध्येय नाहीं. दुसऱ्यानें जेव्हां त्यांना विचारावें कीं मुलीचें लग्न केव्हां करणार किंवा मुलीच्या वर्तनांत जर त्यांना कांहीं गडबड दिसूं लागली तर मग त्यांचे डोळे उघडूं लागतात. तोंपर्यंत अगदीं अंधश्रद्धेनें समाजांत तशी एक चाल पडली आहे म्हणून आईबाप आपल्या मुलींना शाळेंत पाठवीत असतात. मुलीहि अज्ञानपणानीं शाळेंत जात असतात. यामुळें मुलीचें लग्नाला निष्कारण वय वाढतें आणि या अर्धवट शिक्षणाची कांहीं एक उपयोग

होत नाहीं. आणि त्यापायीं खर्च मात्र निष्कारण होतो. ज्या मुलींनी अगदीं बी. ए. एम्. ए. पर्यंतचें शिक्षण घेणें हेंच त्यांनीं आपल्या आयुष्याचें ध्येय ठरवलें आहे त्यांच्याबद्दल बोलणेंच नको पण ज्यांना इतकें शिक्षण बिलकुल घ्यावयचें नाहीं असें ज्या मुलींच्या वडलांनीं ठरवलें आहे त्यांना त्या आजारी नसताना निष्कारण हें औषधाचें ढोस कशाकरतां देत बसायचें ? हल्लीं चौदा वर्षांच्या आंत ज्याप्रमाणें मुलींची लग्नें होत नाहींत त्याप्रमाणेंच अठराच्या बाहेर कांहीं मुलींच्या लग्नाची मर्यादा जात नाहीं. या चार वर्षांत मिळालेल्या शिक्षणाची आजपर्यंत लग्न झालेल्या किती मुलींनी वाढ केली आहे ? किती मुलींनीं त्याचा खरा सदुपयोग केला आहे ? हल्लींचें शिक्षण जे मुलींना मिळत आहे त्याचा लग्नानंतर संसाराच्या उपयोगी पडावें म्हणून कोणी कसला प्रयत्न केला आहे ?—

हजारांत फार तर एखादी मुलगी अशी सांपडेल कीं जी खर्चाचा हिशेब स्वतः लिहून ठेवीत असेल किंवा नवऱ्याच्या ऑफीसच्या कामाला मदत करीत असेल ! ते आपल्या त्या अल्प विद्येचा खरा जर कांहीं उपयोग करीत असतील तर चटोर पांचट शृंगाररसोत्पादक कादंबऱ्यांचे अहोरात्र वाचन आणि फार झाले तर वर्षांचे काठी दोन चार पत्रें खरडणें; एवढ्या करतां आयुष्याची पांच सहा वर्षें व्यर्थ घालवणें हा कोठला शहाणपणा ? आयुष्याचा, पैशाचा व्यर्थ नाश नाहीं कां ? आतां शारदा कायदा पास झाला आहे म्हणून लिहिणेंच प्राप्त आहे,मुलीला चौदावें वर्ष लागल्याबरोबर तिच्या आईबापानीं तिचें लग्न करून टाकावें, तिच्या नवऱ्याच्या आवडी निवडीप्रमाणें तो तिला शिकवील. मुलींच्या आईबापांनीं या शिक्षणाच्या मुळींच भानगडींत पडूं नये. कारण शिकलेली बायको पाहिजे म्हणून ऐट मारणारे बहुतेक पुरुष लग्नानंतर बायकोला चुलीतच कोंबत असतात मग अशानी आईबापांना तरी व्यर्थ कां बुडवावें ? आज मुलाच्या शिक्षणाला पैसा नाहीं म्हणून बाप ओरड करीत असतो तोच बाप मुलीच्या निरुपं-

योगी शिक्षणाकरतां खर्च करीत असतो ! त्यांतून तें शिक्षण पुरें झाल्याशिवाय लग्नच करायचें नाहीं असा ज्यांचा निश्चय आहे त्यांची गोष्ट निराळी पण हें जे अर्धवट शिक्षण घ्यायचें तें कशाकरतां ? इंग्रजी दुसरी किंवा तिसरी या इयत्तेपर्यंत गेलेल्या मुली सरासरीनें पंधरा सोळा वर्षांच्या असतात आणि जवळ जवळ तोंच लग्नाचा काळ असतो; कांहीं कांहीं मुलींना तर इंग्रजी तिसरीपर्यंत गेलेल्या पण वयानें शरीरानें मोठ्या दिसूं लागल्याबरोबर त्यांच्या आईबापांना भीति वाटतें म्हणून त्यांना शाळेंतून काढून घरी ठेवीत असतात. मग चारदोन वर्षांत त्यांची लग्नें होतील तेव्हां खरें; त्यापेक्षां चौदाव्याच वर्षी त्या मुलीचे लग्न करून टाकण्याचे ठरवले तर त्या मुलीची कुचंबणा होणार नाहीं आणि बापाच्या मागची काळजी पण नाहींशी होईल. तेव्हां मुलीला जे शिक्षण द्यावयाचें किंवा तिचें लग्न करावयाचें त्याचा पालकांनीं, आईबापांनीं विचार करून या गोष्टी ठरवल्या पाहिजेत. समाजांतील अविचारी लोकांच्या भलत्या शिकवणीकडे मुळींच लक्ष देऊं नये. कारण त्यांचे बोलणें फुकाचें असते आणि आईबापांना सर्व बाजूंनी बुडायचें असतें. तेव्हां मुलींना जरूरीपुरतें शिक्षण–देणेंच योग्य आहे.

आतां शिक्षणाची खरी जरूरी जर कोणाला असेल तर ज्यांना आजन्म अविवाहीत रहावयाचे असेल आणि आपलें आयुष्य परोपकाराकरितां किंवा द्रव्योत्पादनाकरतां घालवायचे असेल त्यांना होय.

आतां ज्यांना अनेक कारणामुळें आजन्म अविवाहित रहावयाचे आहे त्यांनीं शिक्षण घ्यावें असें आपण म्हंटलें म्हणजे सहजच असा एक प्रश्न उद्भवतो कीं त्यांनीं कोणते शिक्षण घ्यावें ? कारण प्रत्येक आचरणाला कांहीं तरी नियम आणि मर्यादा ठरलेल्या या आहेतच; आणि अनुभवानें ठरावयाच्या ज्या गोष्टी तो तिसरा एक मार्ग आहेच.

आजच्या समाजाची अशी परिस्थिति आहे कीं ज्या स्त्रियांना अविवाहित रहाण्याची इच्छा आहे त्या तशा राहून शिक्षण घेतात त्यांच्या डोळ्यापुढें एकच

ध्येय असते कीं आपलें आयुष्य स्वतंत्रपणानें आपणाला कसे घालवता येईल. तसें आयुष्य कां घालवायचे असा जर कोणी त्यांना प्रश्न केला तर बहुतेकांचे ठराविक उत्तर आहे "पुरुषांचा सहवास नको. पुरुषांचा संबंध नको. पुरुषांशीं लग्न नको. त्या बंधनांत कोणी रहावे ?" त्यांची तशी प्रामाणिक समजूत असेल तर त्याला कोणीही हरकत घेणार नाहीं. पण पुरुषाच्या रागावर ज्या स्त्रिया अविवाहित रहातात त्या आजन्म स्वतंत्र आयुष्य काढतात कां ? कां त्या अधिक बंधनांत पडतात याचा त्यांनीच विचार करावा. स्वतंत्र राहून तरी मिळविलेल्या विद्येचा काय उपयोग करतात ? आज पन्नास पाऊणशे वर्षांचा स्त्रियांच्या उन्नतीचा इतिहास पाहिला तर त्यांच्या उन्नतीला पुरुषांनी हातभार किती लावला आणि प्रत्यक्ष स्त्रियांनीं किती लावला याचे मोजमाप काढलें तर स्त्रियांच्या पदरांत शून्याइतका तरी वांटा पडेल कीं नाहीं याची शंकाच आहे.

एका नवऱ्याला दोन बायका असल्या म्हणजे पहिली बायको परिस्थिती-मुळें पतीची अखंड सेवा करीत असते आणि दुसरीचा उद्योग कोणता असतो तर स्वत: कांहीं एक न करताना पहिली जी सारखी कामें करीत असते तिला तोंडाची वटवट करून नांवे ठेवीत रहाणें !—कांहीं एक न करताना नुसता टेंबा मिरवीत रहाणें ! कारण ती प्रीतीतली असते—तिनें जेठा मारावा आणि तोंडपाटिलकी करीत रहावे—आजच्या शिकलेल्या स्त्रियांची अशी स्थिति आहे. गेल्या पन्नास वर्षांत कितीतरी पुरुषांनीं स्त्रियांच्या उन्नतीकरितां द्रव्यानें, शरीरानें, झीज सोसून मदत केली आहे. न्या.रानडे, तेलंग, चंदावरकर, नानाशंकरशेट, टिळक, आगरकर, गोखले, आपटे, गोळे, कर्वे, देवधर आणि अशी किती तरी माणसें ? आणि स्त्रियांची किती नांवें घ्यावीत ? चटदिशीं डोळ्यापुढें येणारे असे मला एकच नांव आठवते, ते म्हणजे रमाबाई रानड्यांचे. पण कामाची तुलनाच करायची झाली तर रमाबाई इतकी कामगिरी आजचा एखादा

सामान्य सुधारकही करूं शकतो. आणि स्त्रियांनीं आजपर्यंत काय केले तर सवतीसारख्या पुरुषाना शिव्या देत देत आपले आयुष्य घालविलें ! पुरुषांना शेलक्या शिव्या कशा द्याव्या, त्यांची सारखी निंदा कशी करीत रहावीं याचा इतिहास जर कोणाला आज वाचण्याची इच्छा असेल तर त्यांनीं आजची स्त्रियांकरितां वाहिलेली अशी मासिके चाळून पहावीत म्हणजे मी म्हणतो याचें सत्यत्व त्यांचे नजरेस येईल. आजच्या स्त्रियांनीं आम्ही वाटेल ते करूं म्हणून शेखी मिरवावी पण त्यांचा हा सहजधर्म नव्हे. त्यांना हे जमायचें नाहीं. जी कामें पुरुष स्वयंस्फूर्तीनें करतात त्यांचा मत्सर करून आणि आपलें जे प्रजोत्पादनाचें खरें कर्तव्य ते बाजूला सारून त्यांनी समाजामध्यें निष्कारण अस्वस्थता कां माजवावी ? तेव्हां स्त्रियांनीं शिक्षण घेऊं नये असे कोणीही म्हणणार नाहीं पण त्यांना ज्या गोष्टींची खरोखरीच जरूरी नाहीं त्याचा वृथाभिमानानें हव्यास कां धरावा ? पुरुषांना " तुम्ही उद्योग काय करता ? " असा कोणी सहज प्रश्न करील आणि स्त्री भेटली कीं "काय, तुम्हाला किती मुलेंबाळें आहेत ? " असा प्रश्न केला तर त्यांना त्यांत कमीपणा कां वाटावा ? अपमान कां वाटावा ? शिक्षणापेक्षां ही काय कमी महत्वाची गोष्ट आहे ? एका हातात पुस्तकाचा भारा आणि दुसऱ्या हातांत छत्री घेऊन जन्मभर सारखे रस्त्यानें मिरवीत रहायचे त्यापेक्षां एका हातांत विमलचें बोट आणि दुसऱ्या हातांत मधुकराचें बोट धरून चालणाऱ्या स्त्रीचें दृश्य काय हिडीस दिसेल ? जी गोष्ट करायला आज पुरुष कंटाळून त्रासून गेलें आहेत, ज्यांत कांहीं अर्थ नाही—राम नाहीं—असे पुरुषांना खात्रीनें वाटूं लागले आहे, त्याच्या मागें हट्टानें बायकांनीं धांव घ्यावी यांत खरोखरच त्यांचे हित आहे कां ? याचा त्यांनीच विचार करावा. आणि ज्ञानवृद्धी करणें हेंच जर शिक्षणाचे ध्येय असले तर लग्नानंतर किती तरी काळ त्यांना मोकळा आहे ? आज सौ. गिरजाबाई केळकरांचे उदाहरण डोळ्यापुढें आहेच. शिक्षण घेऊन अविवाहित राहि-

लेल्या किती स्त्रिया गिरजाबाईंच्या बरोबरीला बसतील? तेव्हां जरूरीपुरतें शिक्षण घेऊन प्रत्येकानें आपलें जे स्वकर्म तें केलें तरच समाज सुधारेल आणि व्यक्तीची उन्नति होईल!—

(१०) प्रेम

आजच्या समाजाचा अत्यंत आवडता असा जर कोणता विषय असेल तर तो प्रेम हा होय. पूर्वींच्या लोकांचं कसलं ते आयुष्य!—काय ती नवरा बायको! कधीं सटीसामाशीं नवराबायकोच्या गांठीं पडायच्या आणि त्या देखील किती चोरून—नवऱ्याच्या खोलीकडे जाताना बायकोच्या पावलाचा आवाज देखील होतां कामा नये—दिवसा नवऱ्याची चुकून कुठं गाठ पडली तर कोण ती त्या बायकोची तिरपीट—छाती काय धडधडूं लागायची, इकडून सासूबाई येतील कां—जिन्यांत मामंजी एकेक पायरी चढत असल्याचा खोटाच भास व्हावा! कधीं जोडीजोडीनं हातांत हात घालून चांदण्यांत फिरणं नाहीं—त्यांना प्रेमाची—आयुष्याची कल्पनाच नाहीं. कसलं ते नीरस जीवन?—आजचं प्रेम!—काय त्याचं वर्णन करावं!—आजचं आयुष्य म्हणजे प्रेम!—आजचं जगणं म्हणजे प्रेम—प्रत्येक मिनिटा मिनिटाची हालचाल म्हणजे प्रेम! तोंडांतून शब्द निघेल तो प्रेम—आज चालण्यांत, बोलण्यांत, हंसण्यांत—खाण्यांत, पिण्यांत प्रेम. बस्—दुसरा विषय नाहीं. आज एखाद्या तरुणानें रस्त्यानें बोडके जाणें—प्रेम!—एखाद्या तरुणीची केसाची बट कपाळावर, गालावर रुळत असली—प्रेम—दोन तरुण भेटले प्रेमाच्या गोष्टी! आजच्या गोष्टी पहा—कला, सौंदर्य, हृदय, शारदा, प्रेम—पूर्वींच्या पोरापोरींत तुम्हाला आजच्या गोष्टी स्वप्नांत तरी पहायला मिळाल्या असत्या कां? पूर्वींची ती कसलीं गलेलठ्ठ शरीरं आणि आजची? प्रेमाकरतां झुरणारी—प्रेमाकरितां नाजुक नाजुक झालेली शरीरं—आजच्या कवींना तरुणींची दिसणारीं हाडं पाहून काव्य सुचतं—पूर्वींचे लोक छाती काढून चालणारे पुरुष ते शूर म्हणे!—किती रुक्ष दृष्टी!—

आपणाला जो अत्यंत प्रिय असा नवरा–त्याचं नांव घ्यायला पूर्वींच्या बायकांना लाज वाटावी? हाऊ सिली--आज नवऱ्याची लांबून अस्पष्ट अशी जवळ जवळ येणारी आकृति दिसण्याचा अवकाश, वृत्ती काय उचंबळून येतात, भावना काय उद्दीपित होतात, आनंद काय उड्या मारूं लागतो, शरीर काय थयथय नाचूं लागतें, तो जवळ यायचा अवकाश—बायका ताक काय रवीनं जोरांत घुसळत असतील असं त्याला "ओमाय डीअर" "हाऊ फनी–हाऊ लव्हली" "यू आर चार्मिंग मॉर्निंग"—"यू आर प्लीझिंग सन्!"—छे–एवढ्यानें भागत नाहीं तर हातात हात घालून अंतःकरणांत जशा प्रेमाच्या उकळ्या फुटतात तसे दोघांच्याही शरीराला हादरे बसले पाहिजेत!—हे खरं प्रेम! हे खरं जीवन! खडकांतून शांतपणानं झुळुझुळूं वाहाणारं जसं पाणी तसं हृदयांतून लपतछपत कधीं गालावर, तर कधीं ओठावर, तर कधीं डोळ्यांत, चोरून पहाण्यांत, लाजून उभं रहाण्यांत दिसणारं तें पूर्वींचं प्रेम–छे, ते कसलं प्रेम–आजचं प्रेम म्हणजे ओढयातून वहाणाऱ्या पाण्याचा खळखळाट, हरणासारखं उड्या मारीत जाणारं ते खरं प्रेम! आजच्या प्रेमाचा बाजार उघड्या रस्त्यावर!

पूर्वींच्या नवरा बायकोचं काय त्यांचं ते मलॅंकली, सॅड लाइफ! कसल्या त्या हौशी?—अगदीं लग्नाला सुरवात झाल्यापासून तें मुलें बाळें झाली तरी—इश्श काय तो धांगडधिंगा! लग्नांतलें ते सोहाळे काय, आठन्हाण, दसन्हाण, मासन्हाण, आषाढपाठी काय, श्रावणपाठी काय, दिवाळसण काय, गर्भदान डोहाळजेवणें ही काय प्रेमाची लक्षणं?

पूर्वींचे पुरुष बायकोच्या नाकांत नथ घालीत होते! ते त्यांचें प्रेमाचे लक्षण नव्हे–तो रानटीपणा! आणि आज गुलाबाचं फुकटचं मिळणारं फूल तोडून ते बायकोच्या बुचड्यांत खोंचणं, हे मात्र खऱ्या प्रेमाचं लक्षण! पूर्वींचा तो अजविलाप किंवा दगडाला पाझर फुटणारा रामाचा करुण रस-छे

तें काव्य नव्हे आणि आजचे निर्झरणीतून स्रवणारे; खिडकीतून डोकावणारे खडकांतून लपलेलें ते मात्र खरं काव्य ! ?

पूर्वी लग्नानंतर जसजसा स्त्री-पुरुषाचा सहवास वाढे तसतसा त्यांच्यांत प्रेमाचा उद्भव होऊन त्याची वाढ सारखी सुरू असे; त्या तसल्या प्रेमांत, तसल्या जीवनांत, तसल्या आयुष्यांत कांहीं अर्थ नाहीं आणि हल्लीं ज्या वयांत प्रेमाची कल्पना यायला नको त्या वयांत प्रेमाची कल्पना पूर्ण येते आणि मग त्या प्रेमाची जोपासना करण्याच्या ऐवजीं प्रेमापायीं झुरणीस लागण्याची मात्र वेळ येते आणि मृत्यूजवळ येत चालला म्हणजे प्रेम मिळण्याची आशा उत्पन्न होते आणि मग प्रेम—प्रेम निराशा निराशा म्हणत प्राण सोडण्याची पाळी येते ! आयुष्यातला खरा रोमान्स म्हणजे नेहमीं उदासीन असणं, श्वास सोडीत रहाणं, निराशेची काव्य रचीत बसणं, शरीराला वाढूं न देता झुरणीस लावणं--निराशा निराशा "कळ्यांचें निःश्वास" ही प्रेमाची जादू कां ! प्रेम कोणी कोणावर करूं नये असें कोण म्हणेल ? पण प्रेमाला किती महत्व द्यायचे याचा प्रत्येकानें विचार केला पाहिजे. प्रेम हे कांहीं सर्वस्व--आयुष्याचें इतिकर्तव्य नव्हे. आज माणसानं प्रेमी असूं नये असं कोण म्हणेल ? प्रेमाच्या आधाराशिवाय जग चालणच शक्य नाहीं पण त्या प्रेमाला तरी आपण किती महत्व द्यायचें याचा आपण प्रथम विचार केला पाहिजे. आपलं सर्व आयुष्य म्हणजे प्रेम, आपलें जगणें म्हणजे प्रेम असें मानणें खास चुकीचे आहे. आज प्रेम जर कुठे बोकाळत असलेलं दिसेल तर ते शाळा आणि कॉलेज—विशेषतः कॉलेजमध्येंच. याचें कारण डोळ्यांपुढे ते चित्र—सारखे खेळत असते. मनुष्य हा जात्याच उत्सवप्रिय आहे. कॉलेजचें स्वतंत्र वातावरण, चैन करायला पूर्ण मोकळीक, हातीं मुबलक पैसा, कोणाचा धाक नाहीं, दरारा नाहीं, अशा स्थितीत मन उड्या मारूं लागलें तर त्यांत नवल काय ? गोड गोड काव्यं वाचायची, रोज तरुणांना तरुणी भेटणार, तरुणींना तरुण भेटणार, प्रत्यकानें मला अधीक रोमांटिक कसं वागतां

येईल, अधिक सुंदर कसं रहातां येईल, ही अहमहमिका जोरांत सुरू रहायची त्याचा परिणाम मनावर शरीरावर बुद्धीवर बरा वाईट झाल्याशिवाय कसा राहील ? कॉलेजच्या आयुष्यांत आनंद नाहीं असं नाहीं पण जर तें वातावरण तितकं उच्च असेल तरच मनुष्य मनुष्याकडे माणुसकीच्या दृष्टीनें पाहील. शरीराच्या बाहेरच्या भपकेबाज देखाव्यापेक्षां आंत खरा आनंद देणारी अशी एक-गूढ शक्ती आहे हे जाणण्याची त्यांचें अंगी पात्रता येईल ! पण मनाची उच्च भूमिका ठेवून त्या प्रेमांत, त्या आनंदात रममाण होणाऱ्या व्यक्ति क्वचितच-- प्रवाहपतितच सगळे ! आज प्रेमाच्या पायांत नासाडी झालेल्या जीवांचीच चित्र चोहोकडे दिसत आहेत !

आज प्रेमाच्या पांयांत पुष्कळ तरुण तरुणींची निराशा झाल्यामुळें त्यांची आयुष्य "सुकलेलें फूल" झाली आहेत. !

आयुष्याचं ध्येय केवळ प्रेम नसून त्याला कर्तव्याची ही जोड दिली पाहिजे. आजचं प्रेम हा एक उल्लूपणा झाला आहे. आरंभाआरंभाला जोपर्यंत जबाबदारीचे आयुष्य नसते तोपर्यंत उल्लूपणा खपून जातो पण त्या जबाबदारीच्या आयुष्याला सुरवात झाली म्हणजे त्या प्रेमाचे परीणाम भोगायची पाळी येते आणि बहुतेकांची त्यांत शेवटीं निराशा होऊन आयुष्य नीरस ठरते.

आज प्रेमाला किती महत्व आले आहे ! जबाबदार माणूसही माणुसकीला या प्रेमाच्या पायांत मुकतो. कवी यशवंतचीच गोष्ट घ्या. त्यांच्या मित्रांनीं "सहृदयतेचा, सहानुभूतीचा" कितीही मोठा डांगोरा पिटला तरी केवळ व्यक्तिच्या सुखाकरतां प्रेमाकरतां केलेली गोष्ट त्याज्य, निद्यं तिरस्करणीयच ठरणार. असलें हे प्रेमाचे चाळे बंद झाले पाहिजेत, तरुण तरुणींची दिशाभूल करणाऱ्या या खल कृति होत.

ज्या वेळेला आपण प्रेमाचा प्रवास करायला सुरवात करतो त्यावेळेला हा समाज-भावी काळ नंदनवन आहे, स्वर्ग आहे-यांत दुःखाना-संकटाना वावच

नाहीं, वातावरण अगदी स्वतंत्र आहे-रान चरायला मोकळे आहे-आपण जशा उड्या मारूं तसा आपला आनंद द्विगुणित होणार आहे या कल्पनेंत आपण तरंगत असतो पण गुलाबाच्या झाडाला फूल एक पण काटे मात्र शंभर असतात. फुलाचा आस्वाद थोडावेळच मिळतो पण काट्यांच्या बोचण्या मात्र सारख्या सोसाव्या लागतात. समाज आपणाला वाटतो इतका खास सहानुभूतीचा नसतो. त्यावरती आपण फाजील विश्वास टाकून चालणें चुकीचे आहे. आयुष्याचे ध्येय केवळ प्रेम हे खास नाहीं. त्या प्रेमाला जर सर्व समाजरुपी प्रभावळीत बसवले तरच त्याला शोभा येणारी आहे. आज प्रेमापायीं जन्मदातें आईबाप नकोत-"जननी जन्मभूमीश्च नको-संस्कृति नको, धर्म नको स्वदेश नको-ही बेफिकिरी खास त्याज्य आहे-आजच्या तरुणतरुणीनी थोडी सबूर करुनच प्रेमाच्या वाटेवर आस्ते आस्ते चालावें. ग्रंथकार पुष्कळ प्रेमाच्या गोष्टी लिहितील-ते कल्पनेनें पुष्कळ स्वतंत्र वातावरण निर्माण करतील, अटकेपार जाण्याला सांगतील पण त्यांनीं पैलतरि गाठलेला असतो आणि दूर बसून ते शिष्टाईच्या गप्पा मारीत असतात, पुढच्या पिढीला समाजाशी टकरा घ्यायच्या असतात, तेव्हां या पोकळ शिष्टपणाच्या गप्पाकडे पहाताना आजच्या तरुण तरुणींनी सावधगिरी बाळगावी. कारण आयुष्याचा पल्ला फार लांबचा आहे. त्यांत सुंदर बागा आहेत आणि भयाण अरण्यें ही आहेत.

प्रेमाच्या गोष्टी बोलूं नयेत असें नाहीं. प्रेमाची काव्यें लिहूं आणि वाचूं नयेत असें नाहीं. प्रेमी जीवाची सोबत करूं नयें असें नाहीं पण तेंच काय तें सर्वस्व अशा खुळ्या कल्पनेनें मात्र वेड लावून घेऊं नये त्याला कर्तव्याची माणुसकीची ही जोड जरूर दिली पाहिजे. तरच आयुष्य यशस्वी होते; नाहीं तर कळी उमलायच्या आंतच निखारा पडून करपून जाते! या प्रेमापायीं आज किती तरी कळ्या करपून गेल्या आहेत!

(११) विवाह.

पूर्वीच्या समाजाचा अत्यंत महत्वाचा आणि आवडीचा विषय जर

कोणता असेल तर तो विवाह हा होता. आजच्या समाजाचा अत्यंत नावडता असा जर कोणता विषय असेल तर तो विवाह हा होय. जरा मुलगा अगर मुलगी मोठी दिसूं लागली कीं "किशीचं किंवा नाऱ्याचं लग्न केव्हां करणार?" हा पूर्वीच्या समाजाला प्रश्न होता, आज मुलामुलींना विचारा "लग्नच करायचं नाहीं" हें त्याचं ठराविक उत्तर. लग्नाचं वय नसतानाही पूर्वी समाजांत लग्नाची घाई उडत असे आज लग्नाची वयं होऊन गेली तरी लग्नाचं नांव कुणी फारसं काढत नाहीं. पूर्वीच्या समाजाला लग्न हा एक आयुष्यांतील आनंदाचा प्रकार आहे, पवित्र संस्कार आहे, व्यक्तीच्या आयुष्याचा विकास व तिची पूर्णावस्था होण्यास लग्न हेच एक साधन आहे असे वाटत असे. आज विवाह हे प्रत्येकाला संकट, बंधन, गुलामगिरी वाटूं लागली आहे. वंशवृद्धि, कुटुंबसंस्था टिकविण्याकरतां लग्नाची जरूरीच आहे असें पूर्वीच्या समाजाला वाटत होते, आज कुटुंब, संस्था, संस्कृति हे सर्व झूट आहे, लग्नाची उभारणी फक्त प्रेमाच्या पायावर झाली पाहिजे असे आजच्या समाजाचें मत आहे. पूर्वी मुलीचें कुलशील पहाणें, घराण्याचा लौकिक, चालरीत पहाणें हे हिताचे आहे असे वाटत होते. आज कुळाचा पत्ता लागला नाहीं तरी चालेल, फार काय पण कुलटा समाजांतील, वेश्या वृत्तीतील मुलगी असली आणि ती जर एखाद्या तरुणाच्या प्रेमाला पात्र झाली तर तो विवाह अभिनंदनीय ठरतो. पूर्वीच्या समाजापुढें लग्न केलें तर आपलें व बायकोचें पोट कसे भरेल ही चिंता नव्हती आज लग्नें लांबत आहेत याच्या बुडाशीं आर्थिक प्रश्न प्रामुख्यानें उभा राहिला आहे. पूर्वीच्या समाजाला मोठ्या कुटुंबांत आपली मुलगी पडावी असे, वाटत असे आज एकटा मुलगा असला तर ते स्थळ प्रथम पसंत करण्यांत येतें. पूर्वीच्या विवाहात प्रेम भीति आणि नशीब यावर मदार ठेवली जात असे आज करार कायदा यावर विवाहाची उभारणी व्हावी असे जोराचें प्रयत्न सुरूं आहेत. "असे पति देवचि ललनाना" हे पूर्वीच्या स्त्रियांचे ब्रीदवाक्य होते. आज पति

स्त्रीच्या मर्जीनं चालणारा असला तर ठीक नाहींतर त्याच्याशीं काडी मोड करून दुसरा पति मिळवणें हा हक्कप्राप्तीचा लढा जोरांत सुरूं आहे. पूर्वीं पतीनें मिळवावें आणि पत्नीनें प्रपंच चालवावा अशी प्रथा होती; आज एक मेकांनीं स्वतंत्र धंदे करून पैसा मिळवून एकमेकाना मदत करावी अशी रहा पडत चालली आहे. आजच्या समाजांतील कांहीं लोकांना विवाह नसलेला बरा असे वाटूं लागलें आहे. विवाह न करताना विवाहसुख कसें मिळवतां येईल यासाठी त्यांची धडपड सुरूं आहे. आपण पुरुष मित्र करून किती प्रेमानें रहातो, तिथं कुठं विवाह बंधन आहे; मग स्त्री मित्र असली म्हणून बिघडलं कुठें; आणि अशा मैत्रित कामवासना उद्दीपित झाल्या तर त्या पूर्ण करण्याला तरी कोणती हरकत आहे? निसर्गानं घडून येणाऱ्या या सहजच्याच गोष्टी आहेत, यांत नीतिअनीतीचा कुठं प्रश्न येतो? एकमेकांच्या इच्छे विरुद्ध जुलूम झाला तर तो गुन्हा होईल. ती अनीति!. आर्थिक परिस्थिति बिकट झाल्यामुळें लग्नें जर लौकर होणे शक्य नाहीं आणि वयोमानाप्रमाणें विकार हे उत्पन्न होणार तर ते नीतीच्या नावांखाली दडपून कां टाकावेत? जसे पाणी वाहील त्याप्रमाणें त्याला मार्ग हा काढून दिलाच पाहिजे; त्याला विरोध करणें हा घातकीपणा आहे; स्त्रीला पूर्वीं शिक्षण नसें त्यामुळें आज श्रद्धावान पांडुरंगभक्त ज्याप्रमाणें आषाढी कार्तीकी आली कीं वाटेल तसले हाल सोसून विठोबाच्या पायावर मस्तक ठेवण्यास जातात त्याप्रमाणें पूर्वीच्या स्त्रिया आपले सर्व आयुष्य पतिचरणीं अर्पण करीत असत. आज मुलामुलींना शिक्षण मिळूं लागलें आहे. पक्कान्न आपण खाल्लें कीं ज्याप्रमाणें त्याचा शरीरांत मद चढतो त्याप्रमाणें विद्या मिळाल्याबरोबर ज्ञान वाढलें; जिज्ञासा वाढली; चिकित्सा वाढली. चांगलं वाईट याची निवड होऊं लागली. मुलामुलींच्यापुढें आयुष्यासंबंधीचें निर-निराळें प्रश्न उभें राहूं लागलें. या प्रश्नाच्या गोंधळांत लग्न मर्यादा इतकी

वाढली कीं कित्येकांचीं आयुष्य लग्नाशिवायच गेलेली आहेत. कित्येकांना निराश होऊन अखेर पदरीं पडलें तें पवित्र झाले असें मानून चालणें भाग पडत आहे.

आज अशी परिस्थिति कां निर्माण झाली आहे असा जर कोणी आजच्या तरुण तरुणीस प्रश्न केला तर प्रामुख्यानें त्यांचेकडून एकच ठरलेलें उत्तर येतें कीं " आर्थिक परिस्थिति बिघडली " माझ्यामतें हे प्रमुख कारण नव्हे. अनेक कारणांपैकीं ते एक कारण होऊं शकेल. बेजबाबदार, अनवश्यक आणि परकीय शिक्षणाचा पगडा मनावर बसल्यामुळें ज्या खुळ्या, वेडे-पणाच्या, स्वैरवृत्तीच्या कल्पना समाजांत पसरल्या आहेत त्या प्रामु-ख्यानें कारणीभूत आहेत. आज बंधनांच्या पलीकडे प्रत्येकाला जायला पाहिजे. एकटा मुलगा पाहून मुलगी देणें हीच एक नवीन कल्पना घ्या. ज्या माणसांच्या जिवावर एखादी व्यक्ती जगली वाढली त्या माणसांचा तिटकारा करणें हा मुलींच्या आईबापांचा दृष्टिकोन न्याय आहे कां ? दहाजणांत मुलगी पडूं दे ही पूर्वीच्या लोकांची व्यवहारिक कल्पना आर्थिक परिस्थिति बिकट करीत होती कां—" अबब एवढ्या खटाड्यांत कोण मुलगी देतो " ही आजची कल्पना आर्थिक परिस्थिति सुलभ करतें कां संकटात पाडणारी आहे यांचा प्रत्येकानें विचार करावा ? नवराबायकोनें एकटें राहून मोलकरणीनें, डॉक्टरानें, प्रसुतिगृहानें पैसा खाल्ला, शेजारी पाजारी यांचे आर्जव करून त्यांचे उपकार घेतले तर ते चालतात पण तोंच पैसा आईबापाप्रीत्यर्थ खर्च करणें नको वाटतें; कारण आईबाप जवळ असले कीं ते " असं नको वागूस—तसं नको करूस " हे बोलणार आणि हे तर त्यांना नको असते. परक्यांची खेटरें खाण्याचा, बायकोची लुगडी धुण्याचा अगर चुलीजवळ बस-ण्याचा प्रसंग येवो त्यांत अपमान, त्रास न मानण्यांत आजच्या पुरुषाला धन्यता वाटते पण बायकोच्या लहरीकरतां तिचं स्वातंत्र्य जातं म्हणून आईबाप मात्र नको असतात. मुंबईपुण्यासारख्या ठिकाणीं लहान जागेंत आईबाप

भाऊवहिणी यांना रहायला अशी मुबलक जागा कुठे असते हे एक शिष्टपणाचे सांगणे असते-खेरा उद्देष स्वतंत्र रहाणें हाच असतो,त्या जागेंत निष्कारण खुर्च्या पलंग कपाटे ठेवायाला मात्र जागा असते-ज्यांनीं जन्म दिला त्यापेक्षां ही अडगळ खपते:— या खुळ्या, स्वार्थी-कल्पनेमुळे समाजात दुःख पसरले आहे. कोकणांत किंवा देशावर आईबापाना महिना दहा रुपयें पाठवून वेळेन्सार स्वयंपाकाच्या बाईप्रीत्यर्थ वाटेल तो पैसा कुरकुरनच खर्च करणारे किती तरी सांपडतील !

आजचा विवाहाचा प्रश्न बिकट झाला आहे याला आर्थिक परिस्थिती पेक्षां अंधपणा हे ही एक कारण आहे. पूर्वीचे लोक सारासार विचार करुन ज्याप्रमाणें मुलीला आठवें किंवा दहावें वर्ष लागलें कीं तिचें लग्न करुन टाकीत असत त्याप्रमाणें आजचा समाजही कोणत्याही गोष्टीचा विचार न करताना निष्कारण लग्नाच्या मुली वीस वीस वर्षांपर्यंत वाढवीत बसतात; केवळ आर्थिक परिस्थिति बिघडल्यामुळें लग्नें लांबतात ही गोष्ट खोटी आहे. मुलीच्या लग्नाकरतां पैसा नाहीं म्हणणारा बाप किती तरी पैसा मुलीच्या निरर्थक लहरीकरतां आणि अनवश्यक शिक्षणाकरतां खर्च करीत असतो याचा त्यांनी कधीं विचार केला आहे? मुलीचं फुलाचं वेड, कपड्यांचं वेड, फॅशनचं वेड, शिक्षणाचं वेड यापायीं किती पैसा खर्च होतो ? मुलाच्या हौशीकरतां किती पैसा खर्च होतो? ज्या मुलांच्यापुढें कॉलेजचे शिक्षण संपल्यावर विवाहाच्या बाबतीत आर्थिक प्रश्न उभा रहातो तीच मुलें कॉलेजमध्ये असताना अविचाराने केवळ चैनीप्रीत्यर्थ पाण्यासारखा पैसा उधळून आईबापाना बुडवीत असतात याचा त्यांनीं कधीं विचार केला आहे कां?“लग्न करुन काय करुं, बी. ए. झालो खरा पण बायकोचं पोट कसं भरुं” ही ज्याच्यापुढें काळजी उभी रहाते तो कॉलेजमध्ये एका महिन्याच्या जेवणाकरतां पंचवीस तीस रुपये उडवीत असतो-रेस्टोरंटमध्यें चार मित्र घेऊन शिरला म्हणजे पांच रुपये कां बिल होइना

तें फेंकून देंण्यांत तो काडीची ही दिक्कत बाळगत नाहीं; ती त्यावेळची ऐट आणि नंतरचें उसासे पहावेत! आईबाप मुकाट्यानें पैसे पाठवीत असतात-मुलगा मनमुराद पैसे खर्च करीत असतो. यावरुन आर्थिक परिथिति खरी बिघडली म्हणून लग्नाचा प्रश्न बिकट झाला या म्हणण्यांत किती तथ्य आहे याचा वाचकानी विचार करावा.

विवाहाचें बंधन नको म्हणून कांहीं लोकांची जी ओरड आहे याच्या बुडाशीं वैयक्तिक सुख, स्वैराचार या पलीकडे दुसरी भावना नाहीं. कॉलेजमध्ये एकमेकांच्याबरोबर खेळाडु वृत्तीनें आयुष्य घालवण्याची चटक लागलेल्या आजच्या तरुण तरुणीना विवाह हे बंधन वाटलें तर त्यांत नवल काय! अशीच स्वैरवृत्ति विवाहानंतरही असावी असे त्यांना वाटलें तर त्यांत नवल काय? आर्थिकपरिस्थितीपेक्षां या खुळ्या कल्पनानीच-आजच्या विवाहाचा प्रश्न खरा बिकट केला आहे. सकाळीं गावाबाहेरील टेकडीवर हिंडा-फिरावयास जावें,निरनिराळ्या तऱ्हेचें पोषाख करावेत,रात्र झाली कीं पूर्ववयांत सीनेमाची लागलेली चटक प्रक्षुब्ध व्हावी-लहर आली कीं वेळ अवेळयाचा विचार न करतां चहाकॉफी ढोसावी असलें खर्चाचे व उनाडटप्पू आयुष्य घालवायला तर पाहिजे आणि पैसे हातीं नाहींत तर "तूं मिळव आणि मीही कुठें नोकरी पहातो" असे विचार तरुणतरुणींच्या मनांत आलें तर त्यांत नवल काय? असलें जिथें आपण पोषाखी आयुष्य बनवलें आहे तिथें विवाहाच्या आड आर्थिक परिथिति येते या म्हणण्यात काय अर्थ आहे? मनुष्यानें सौंदर्य प्रेमी असूं नयें, त्यानें खेळाडू वृत्ति स्वीकारूं नये असे कोण म्हणेल पण तेंच जीविताचें खरे-सर्वस्व सुख असे मानूं नयें.

वास्तवीक खरी गोष्ट अशीं आहे कीं ज्या कामामुळें आर्थीक परिथिति सुलभ होईल ती पुरुषाना बाहेरील आणि स्त्रियाना घरांतील कामें करण्यास लाज-मान हानी कां वाटावी? आणि जिथें आर्थिक परिस्थिति बिघडेल तिथे मात्र - मनानी वाटूं नयें याचें आश्चर्य वाटतें! सुशिक्षित स्त्रियाना

घराबाहेरील धंद्याची कामें-दुकानांतील टेबलें खुर्च्या कपाटें साफसूफ करणें गिऱ्हाइकांच्यापुढें तोंड वेंगाडणें यांत बायकांना कमीपणा वाटत नाहीं; पण घरांतील दळणें, कांडणें, भांडीं घासणें यांत कमीपणा वाटतो. दुसरीकडे श्रम करून मिळवलेला पैसा या कामीं पटापट खर्च करतील हें आश्चर्य नव्हे काय?

आजचे विवाह अकालीं होऊं लागल्यामुळें स्त्रियांत व पुरुषांत नाना प्रकारच्या रोगांचा प्रवेश सुरूं झाला आहे. अवयवांची व बुद्धीची पूर्ण वाढ झाल्यावर विवाह होणें हें इष्ट आहे असें मत प्रतिपादन करतांना मन कामविरहीत असतें अशी कल्पना होते. पण वस्तुस्थिति अगदीं उलट आहे. पूर्वीच्या मुलांमुलींची लग्नें होऊन गेलेलीं असलीं तरी कामाच्या बाबतींत ती थोडी अज्ञच रहात, पण आज तेरा चौदा वर्षांची मुलगी अगर मुलगा घेतला कीं, त्याला या सर्व कल्पना येतात मग भूकतर लागली आणि अन्न कांहीं मिळेना अशा स्थितींत प्रकृति बिघडण्याचा जसा संभव. तशीच स्थिति विवाहापूर्वी मुलामुलींची होते. पूर्वीच्या स्त्रियांना त्या विद्येंत अडाणी म्हणून त्यांना कितीही नांवें ठेवा, पण त्या वेळची त्यांची प्रकृति—त्यांचा संसार व त्याचें कुटुंब पूर्ण सुखी असें. याचें कारण ज्या वयांत ज्या ज्या इच्छा त्यांच्या मनांत वयोमानानें येत त्या पूर्ण होत असत त्यामुळें त्यांच्यांत तळमळ, तडफड, निराशा बिलकुल दिसत नसे. लहानपणीं लग्न झालें, न्हाण आल्यावर पतिसुख मिळालें, पतिसुखांत रममाण असतांना पुत्राची इच्छा उद्भवली-ती पूर्ण झाली-तो मोठा झाला-त्याला संसाराला लावलें असें सुरळीत चालत असें. आजची स्थिति कांहीं विलक्षणच! भुकेनें तर पोटांत डोंबाळा पेटावा आणि लाडू जिलब्या ज्या कोठीच्या खोलींत त्याला भले लठ्ठ कुलूप लावलेलें-मग तो जसा त्या अन्नाकरतां तडफडत असतो तशी आजच्या तरुणतरुणींची स्थिति होत असते. त्यांच्यांत कामवासना उत्पन्नच होत नाहींत हें म्हणणें निखालस खोटें आहे. न्हात्या मुली चारचार पांचपांच वर्षें शिक्षणाच्या हौशीनें अविवाहित ठेवणें याच्याइतका मूर्खपणा दुसरा कोणताही नाहीं. मनुष्याच्या वाढीला हा खास अडथळा आहे. हिस्टेरिया, फिटस या रोगांची वाढ, प्रजा खुरटी

५

अल्पायुषी हाच त्याचा परिणाम ठरलेला; आतां विवाहाच्या बाबतींत शारदा कायदा पास झाला आहे तेव्हां त्याच्या विरुद्ध लिहून कांहींच उपयोग नाहीं; पण मुलींच्या आईबापांनीं शक्य तर तेरा ते चौदा वर्षांपर्यंत याचा स्पष्ट अर्थ ऋतु प्राप्त होण्यापूर्वी किंवा त्या सुमारास मुलींचीं लग्नें लावून टाकावींत हाच खरा शहाणपणाचा मार्ग आहे. त्यामुळें निरुपयोगी शिक्षणाकरितां पैसा व्यर्थ खर्ची पडणार नाहीं आणि मुलीच्या आयुष्याची कुचंबणा होणार नाहीं. बालविवाहापासून जसे तोटे आहेत त्या पेक्षां खात्रीनें फाजील प्रौढविवाहापासून दसपट तोटे आहेत. चांगलें लिहितां वाचतां येईल इतकें शिक्षण आईबापानीं मुलींना द्यावें, पुढच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांनीं त्यांच्या नवऱ्यावर सोपवावी कारण एकमेकांना जर सहचर्यानें आयुष्य काढावयाचें आहे तर एकमेकांच्या आवडीनें व पसंतीनें झालेलें बरें. कारण अशा किती तरी स्त्रिया सांपडतील कीं ज्यांनीं विवाहापूर्वी इंग्रजी पांच सहा इयत्ता पर्यंत शिक्षण घेतलें आहे त्याची वाढ विवाहानंतर त्यांच्या पतीकडून बिलकुल झालेली नाहीं. तेव्हां उगाच भलत्या कामांत अंधपणानें कोणीही वागूं नयें.

आतां मुलींचे बाप कदाचित असा एक आक्षेप आणतील कीं, आम्ही मुलींचीं लग्नें अल्पवयांत करण्यास पुष्कळ तयार झालों; पण तेवढ्याच लहान वयांत लग्नें करण्यास मुलें तयार झालीं पाहिजेत ना? आज कॉलेजचा कोर्स पुरा होऊन नोकरी मिळेपर्यंत म्हणजे सरासरी पंचवीस ते तीस वर्षांच्या सुमारास मुलें अगर त्यांचे पालक लग्नाच्या गोष्टी बोलूं लागतात, मग अशा स्थितींत लहान मुलींना कोण विचारणार? उलट त्या जितक्या लग्नाला वाढतील तितक्या बऱ्या, कारण मुलाची प्रवृत्ति थोर मुलगी करण्याकडेच असणार; आणि अशा जर मुली वाढवणें भाग आहे तर त्यांना रिकाम्या ठेवण्यापेक्षां त्यांना शिक्षण दिलें म्हणून बिघडलें कुठें? शिवाय आज कोणताही विवाहेच्छु मुलगा मुलीच्या इतर गुणाकडे फारसा लक्ष न देतां प्रथम "मुलगी शिकली किती?" ही चौकशी करतो व मुलीच्या बापाची अशी एक खुळी कल्पना असतें कीं मुलीला थोडंबहुत शिक्षण असलं कीं

लग्नाचा प्रश्न बराच सुलभ होण्याचा संभव असतो तेव्हां मुलीला वाढवणें व तिचें लग्न होईपर्यंत तिला शिक्षण देणें हिताचें आहे.

आजच्या समाजस्थितीकडे लक्ष दिलें तर वरील दोन्ही गोष्टींत सत्यता आहे. आर्थिक परिस्थिति बिघडल्यामुळें मुलांना बायकोचा भार वाटूं लागला आहे, आणि त्यामुळें आईबापांची मुलींच्या लग्नाच्या बाबतींत पुष्कळ धडपड चालू असली तरी त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं.

अशी बिकट परिस्थितीत आज समाज पडला आहे खरा आणि त्यामुळें शारदा कायदा पास झाला आणि प्रौढ विवाहाची पद्धत सरसहा अंमलांत आली असली तरी विवाहाचा प्रश्न कांहीं सुटलेला नाहीं.

प्रत्येक काळांत कोणत्या तरी एका निष्कारण गोष्टीला महत्त्व येत असते. पूर्वी हुंड्याला इतकें महत्त्व होतें कीं, केवळ हुंड्यांपायीं लग्नें मोडलेलीं आहेत! परंतु हुंडा घेण्यापासून कितीकांचें कल्याण झालें आहे? ज्यांच्या घरीं अलोट संपत्ति त्यांनीं हुंडा घेणें किती मूर्खपणाचे? पण त्यांत एक मोठा मान समजला जात असे. हुंडा घेण्यापासून लौकीक वाढतो ही खुळी कल्पना! त्याच प्रमाणांत आजच्या मुलांच्या डोक्यांत स्त्रीशिक्षणाची खुळी कल्पना पसरली आहे. पूर्वी हुंड्याला मान असे, आज शिक्षणाला मान आला आहे. पण शिकलेली मुलगी पाहून ज्यानी विवाह केलें त्यांनी आपल्या आयुष्यांत विवाहानंतर पत्नीच्या शिक्षणाला किती मदत केली? शिक्षणासाठी धावपळ करणारी मुलगी अखेर चुलीजवळच बसते. कारण ज्या ऐटीत विवाहेच्छु मुलगा मुलीच्या शिक्षणाची चौकशी करीत असतो ती त्याची ऐट विवाहा नंतर नालायकीमुळें इतकी जिरलेली असते कीं शिक्षण तर राहोच पण तिच्या पोटालाही घालण्याची त्याच्यात ताकद उरत नाहीं. ज्या मूर्ख तरुणानी आजपर्यंत मुलींच्या बापाना हे शिक्षणाचें आमीष दाखवून बुडवले असेल व विवाहाचा प्रश्न बिकट व निष्कारण खर्चाचा करून ठेवला असेल त्यांचे अनुकरण पुढच्या तरुणानी करूं नयें; म्हणजे मुलींचें बाप पैशापायीं बुडणार तरी नाहींत आणि मुलींच्या आयुष्याची खराबीही होणार नाहीं.

## ( १२ ) स्त्रिया आणि नवमतवाद.

छे, या विषयावर तर बोलण्याची व लिहिण्याची सोयच नाहीं ! आभाळच फाटलं त्याला ठिगळं कुठं कुठं द्यायचीं ? पाणी जोरानं वाहूं लागलं त्याला बंधारा घालणार तरी कसा आणि किती ठिकाणीं ? सुनेचा पदर थोडा अव्यवस्थित दिसला तर सासू " अगं जरा नीट सांवरून चाल " म्हणेल, पण " मला नागडंच हिंडायचं आहे ! समाज स्वास्थ्यावरचं चित्र पाहिलत कां सासूबाई ? किर्लोस्कर, स्त्री मासिकांतील सुधाकांताच्या गोष्टी दाखवूं कां वाचून ? आतां धाबळीचें दिवस नाहीं उरलें ! " अशी जर सून बोलूं लागली तर सासूबाई " नाच बाई, ती तरी तुझी एकदां हौस फिटूं दे ! " या शिवाय दुसरं काय बोलणार ?

नवीन मतं व नवीन गोष्टी या दोन कारणांनीं निर्माण होत असतात.

मांजरी जशी कोंडलेल्या जागेंतून निसटून बाहेर पडली म्हणजे सैरावैरा धांवत सुटते तशीच नवमतांची गोष्ट आहे. नवीन विचार, नवीन मतें, नवीन वाद म्हणजे तरी काय आहे ? जुन्याला त्रासून, कंटाळून, वैतागून त्यांतूनच निघालेल्या नवीन गोष्टी किंवा दुसऱ्या दृष्टीनें म्हणजे जुनें कितीहि चांगलें, हिताचें असलें तरी दुसऱ्याचं नवीन अद्भूत कांहींतरी पाहिल्यावर डोळे दिपून जावेत आणि आपण काय करतो, कोणत्या दिशेला धांवत जातो, याचें भानच न रहावें व त्याचें अंधपणानें व उतावीळपणानें अनुकरण करीत असावें.

फुलाची मजा पहा—कळी पण नाहीं आणि पूर्ण उमललेलंहि नाहीं अशा यौवन स्थितींतच तें सुंदर दिसत असतें. सुवास देण्यासही तें त्याच वेळेला योग्य असतें. समाजाचेही असेंच आहे. नव्या जुन्याचा मिलाफ आहे—या मधल्या स्थितींत तो जोंपर्यंत आहे तोंपर्यंत तो स्थिर आणि सुखाचा आहे असें समजावें. पण एक टोंक सोडून ज्या वेळेला फूल दुसऱ्या टोंकाला जातें तेव्हां त्या फुलाला नुसता हात लावण्याचा अवकाश कीं, त्याच्या दशा

पाकळ्या पटापट गळून पडूं लागतात तसा समाज दुसऱ्या टोकाला जाऊन पोंचला कीं, कोणताही नवीन विचार त्याला स्पर्श करूं द्या—तो समाज विस्कळीत झालाच म्हणून समजावें. त्याची छकलं पडायला सुरुवात होते. समाजात ज्या वेळेला अशा प्रकारची खळबळ उडून जाते त्या वेळेला समाजापुढें निश्चित असा मार्गच नसतो. चोहोंकडून जमून आलेले कण वादळांत सांपडले कीं, ते जसे वाऱ्याच्या झोतानें स्वैर उडत असतात तशीच स्थिति नवमतवादाच्या वादळांत सांपडलेल्या लोकांची होते. सुधारणेंत नीति अनीति पहायची नाहीं, माणुसकी, पशुवृत्ति पहायची नाहीं, तर मग धर्म, संस्कृति, स्वदेश व स्वधर्म याला विचारतो कोण ?

आजचा नवमतवाद काय आहे हें जर कोणास पहायचें असेल तर या विषयावर लिहिलेल्या जगांतल्या कोणत्याही ग्रंथाकडे धांव घेण्याचें कारण नाहीं. पुणें येथील समाजस्थितीचें पूर्ण नीरीक्षण केलें कीं बस्स आहे. ओतप्रोत नवमतवाद पुण्यांत आहे. नवमतवाद या विषयाशीं निगडीत झालेली अशी एकही गोष्ट नसेल कीं जी पुण्यास पहावयास मिळणार नाहीं. बंधनांच्या पलीकडेच काय पण त्याच्याही पलीकडे गेलेल्या गोष्टी पुण्यांत आहेत. बिचाऱ्या देशपांड्याना वाटलें असेल कीं, मी केवढा नव-मतवादी, केवढा धडाडीचा—धाडशी—बेडरवृत्तीचा लेखक ! आर्य पुत्रानें आर्य संस्कृतींत जन्मलेल्या, वाढलेल्या मुलीशीं विवाह, छे—हें बंधन तोडलें पाहिजे म्हणून ब्राह्मण प्रभाकराची आणि एक नायकीणीची मुलगी मैना यांची प्रेमाची गांठ बांधली ! नवमतवादावर केवढा विजय मिळवला म्हणून देशपांडे मनांत मांडे खावोत; पण देशपांड्यांचा हा विवाह हें तरी मनोराज्यच—कल्पना सृष्टींतच हें चित्र रंगवलेलें; ते बिचारे हिंदु तरी होतें ! देशपांड्यांचा हा कांहीं शंभर नंबरी नवमतवाद नव्हें. पुण्यांत बरोबर शंभर नंबरी नवमतवाद म्हणजे खानपाळंदीकर विवाह ! देशपांड्यांच्या नवमत-वादावर केवढी ही उडी ? नवमतवाद नवमतवाद झाला तरी याच्या पलीकडे काय सांगणार ?

आज सौंदर्यांत नवमतवाद इतका पुढें गेला आहे कीं सदाशिव पेठेंतून हिंडतांना फणीकरंड्याच्या पेटीसमोर वेणी घालीत बसलेली बाई पहात पहात बुधवारांत यावें तों पुरुषी ड्रेसांत केस कापून (बॉब करून) पुरुषांनाही लाजवील अशा थाटाची स्त्री जोरानें मोटार सोडीत "चल हट् पुराण पुरुषा! हो बाजूला! दे रस्ता करून माझ्या नवमतवादी मोटारला" असें जणूं कांहीं आव्हानच करीत आहे असा देखावा दिसेल.

सहशिक्षणाचा पुरस्कार करतां करतां त्या क्षेत्रांत रा. वामनराव जोशी यांनीं आजच्या तरुणतरुणींना एवढें मोठें पाऊल टाकण्यास सांगितलें आहे कीं, केवळ शिक्षणापुरतेंच तुम्ही एकत्र येतां कामा नये, तर तुमच्या गांठभेटी, पत्रव्यवहार झाला तरी तो नवमतवादपुष्पाचा विकासच होय. परस्परांत स्नेह वाढल्यानें लग्नाचा प्रश्न (अशी सवलत मिळाल्यावर लग्नाच्या आड वाटेला जाईलच कोण म्हणा!) सुलभ होईल. नवमतवाद नवमतवाद आणखी तो काय?

यांत अनेक प्रश्न उत्पन्न होतात. नवमतवाद या नांवाखालीं तरुणतरुणींनीं एकत्र येणें त्यांच्या भावी आयुष्याच्या हिताच्या दृष्टीनें योग्य आहे का? ते जर एकत्र आले तर त्यांच्या कामवासना उद्दीपित होणार नाहींत का? त्या जर तशा झाल्या तर त्या दपडून टाकणें शक्य आहे का? त्यांचा पत्र व्यवहार, त्यांच्या एकांतांत भेटी हा व्यभिचार ठरतो का?

उगाच फाजील शिष्टपणानें, भलत्याच आत्मविश्वासानें किंवा आत्मवंचनेनें खोट्या गोष्टी दडपून बाजूला सारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. स्त्रीपुरुष जवळ जवळ आले कीं, वासना ह्या उत्पन्न होणारच. रा. अत्रे यांनीं एकदां अशीच फुशारकी मारली होती कीं, मी केवढ्याही मोठ्या स्त्रीसमुदायांतून हिंडलों, फिरलों, वावरलों तरी माझें मन निर्विकार होतें. मी स्पष्ट रीतीनें म्हणतों कीं, रा. अत्रे जर माणुस असतील तर हें त्यांचें विधान साफ खोटें आहे. त्यांच्या हातून अतिप्रसंग फार तर झाला नसेल; पण रा. अत्र्यांसारख्या

रसिकानें असलें नीरस विधान करून समाजाची फसवणूक करूं नये. गुलाबाच्या फुलाला वास नसतो हें म्हणणें जितकें वेडेपणाचें आहे तितकेंच तरुणतरुणी एकत्र आल्या कीं, त्यांच्यांत कामवासना उत्पन्न होत नाहींत हें म्हणणें साफ खोटें आहे.

पूर्वींच्या अगदीं वेदकालांत पंधरा पंधरा वर्षोपर्यंत ऋषींच्या आश्रमांत राहून विद्याभ्यास करणारे विद्यार्थी, स्त्रीचें मुखही ज्यांच्या दृष्टीस पडायचें नाहीं आणि ज्यांना हा कामाचा मार्ग माहीत नाहीं त्यांनीं स्त्री पाहिली तर कदाचित् "कोण हा विचित्र प्राणी" म्हणून त्यांनीं आश्चर्योद्गार काढले तर त्यांत कांहीं तरी तथ्य आहे असें म्हटलें तर एक वेळ शोभेल; पण आजचा समाज म्हणजे द्राक्षाचा बाग–त्यांत शोभा आहे, सौंदर्य आहे, रस आहे, कला आहे. आज कॉलेजांतील मुलें मुली वर्डस्वर्थ, शेले, कीट्स्, कालिदास वाचतात, पण छे! प्रेमाच्या पंथातले हे आतां झाले जुने, आज प्रेमाच्या गुजगोष्टी बोलणारे वाङ्मय रोज निर्माण होत आहे--जसे कांहीं द्राक्षाचे घोसच! प्रेम व भावना उद्दीपित होतील असे प्रसंग डोळ्यांना पहायला मिळतात. लैङ्गिक ज्ञानाचीं पुस्तकें 'प्राब्लेम' म्हणून मननीय अशी डोळ्यांपुढें ठेवलीं जातात, पहातांच तोंडाला पाणी सुटेल अशा जणुं कांहीं मिष्टान्न पदार्थांच्या रांगांच ! अशा तरुणींच्या घोळक्यांत तरुण वावरतात–त्यांचा सहवास, त्यांच्या भावना, त्यांचा अभिनिवेष, त्यांचा आचार, त्यांची वेषभूषा, त्यांचें उपजत सौंदर्य, " डोळे हे जुलमी गडे " हा त्यांचा लडिवाळपणा, त्यांच्या हालचाली म्हणजे चमकणाऱ्या विजांचा लपंडावाचा खेळ, त्यांचा क्षणोक्षणीं आस्वाद घेणें, त्यांच्या रम्यशा कल्पना सृष्टींत वावरणें, कधीं कधीं नितांत सुंदर उदयास्तांच्या रंगपालट देखाव्यांत रममाण होणें, त्यांच्या प्रत्येक निश्वासावर, पदन्यासावर " प्रणयनीचे विलास " म्हणून कौतुकानें पहात रहाणें, ती ' ओलीतीं ' दिसेल का म्हणून प्रसंगाची वाट पहात बसणें, चित्रकार व कवी होण्याचा प्रयत्न करणें, प्रत्येक तरुणीच्या प्रेमाला पात्र नसलो तरी सुंदर कसा दिसेन या अहमह-

मिकेने नटणें, थटणें, अशा रम्य काळांत ज्याला विचार करायला बुद्धि, पहायला डोळे, आणि ज्यांत भावनांच्या उकळ्या फुटत रहातील असं हृदय आहे—तो तरी समोर तरुणी उभी असतांना दगडापेक्षांही दगड राहील हें म्हणणे निसर्गाच्या, देहधर्माच्या विरुद्ध आहे. स्त्री एकांतांत भेटली कीं पुरुष पाघळलाच पाहिजे. आणि हा मनुष्य स्वभाव जाणूनच माणसाच्या माणुसकीला कांहीं तरी कडक बंधने घातलीं पाहिजेत तरच समाजांत स्वस्थता नांदेल या सद्हेतूनें प्रेरित होऊन कायदे केले, शास्त्राचे नियम केले, तशा रूढी पाडल्या आणि आचार सुरू केले.

स्त्रीचें पावित्र्य व तिची एकनिष्ठता ह्या वस्तूच अशा आहेत कीं, त्यांत बिघाड झाला कीं, हॅम्लेटप्रमाणेंच ' जगावें कीं मरावें ' हा प्रश्न कोणत्याही काळांत प्रत्येकापुढें उभा राहील. स्त्रीच्या पायांत माणुस अमानुष बनणार ही गोष्ट जगाच्या अंतापर्यंत चालणारी आहे. आजच्या स्त्रियांनीं अगर पुरुषांनीं प्रतिष्ठितपणाचा भलताच टेंभा मारून स्वतःची आणि दुसऱ्याची दिशाभूल करूं नये. मनुष्यानें जन्मभर स्वैर संचारी राहून भागणार नाहीं. त्याला कुठें तरी स्थिर हे झालेंच पाहिजे. आणि तसें स्थिर व्हायला त्यानें आपली भूमिका निसर्गाच्या नियमांना धरूनच ठेवली पाहिजे. मोटारला ब्रेक नको ही शिकवण शहाणपणाची ठरेल का ? ब्रेक नसला तर भरधांव धांवणें हा तिचा धर्मच आहे. भरधांव धांवत असतांना कदाचित् दिसायला तो एक सुंदर देखावा असेल,पण त्याबरोबर किती प्राण चिरडले जातील व ती खड्डयांत पडली तर तिची काय अवस्था होईल याचा विचार करायला नको का ? नवमतवाद नवमतवाद झाला म्हणून काय झाले ! त्यालाही ब्रेक पाहिजेच. नवमतवादी स्वदेश, स्वधर्म, स्वाभिमान व माणुसकी सोडून वागत असला तरी त्याच्याकडे कौतुकानें पहायचें काय ? त्याची शिष्टपणांत गणना करायची काय ?

आज आपली एखाद्या वेड्या माणसासारखी स्थिति झालेली आहे. माती दिसली माती खावी, शेण दिसलं तेंच खावं, डोक्याला गुंडाळावसं वाटलं

तें गुंडाळीत सुटावें. त्यांत विचारच नाहीं. मला वाटतें कोणत्याही डॉक्टरानें रोग्याची चिरफाड इतक्या मोठ्या प्रमाणांत केली नसेल इतक्या प्रमाणांत आज विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, स्त्रीजीवन, मातृपद वगैरे विषयांची चिरफाड रोज होत आहे. डॉ. परुळेकर घ्या, कवी यशवंत घ्या. समाजाला लाथ मारून नीरस (!) आयुष्यांत जिवंतपणा (लाइफ) यावा म्हणून जो योग घडवून आणला आणि ज्यांची त्यांच्या चहात्यांनीं ढोलकीं बड-वलीं—इंडिव्हिज्युअल फ्रीडम प्रींच करणारे फ्राईड रसेल हे पुस्तकं लिहून तरी कशाची वाट पहाणार ? आमचं आजचं पुणं कोणत्याही परदेशस्थ सुधार-काला खात्रीनें लाजवील इतका नवमतवाद एका टोकापासून दुसऱ्या टोकाला गेला आहे.

प्रत्येकानें स्वतंत्रपणें वागावें हे सांगणें फार सोपे-शिष्टपणाचें आहे, आजच्या समाजाला पटण्या सारखे आहे. पण या पासून किती तरी मुलें मुली आपल्या भावी आयुष्यांत तोंडघशी पडतील, समाजाकडून तुडविल्या जातील याचा विचार असल्या पंडितानी कधीं केला आहे कां? स्त्रीच्या, प्रेमाच्या बाबतींत मनुष्यस्वभाव किती मत्सर ग्रस्त आहे याची कल्पना तरी कशी करावी हेंच कळणें कठीण आहे.

चांदण्या रात्रीं अनेक मुलामुलीनी हिंडणें फिरणे गैर नाहीं ही कल्पना रम्य आहे यांत शंका नाहीं. पण ज्या जोडप्याची लग्ने ठरली आहेत तेवढी गेली तर ते योग्य होईल. पण भलत्याच पोराबरोबर पत्रव्यवहार गप्पागोष्टी सहली करणाऱ्या मुलीला ती सीता सावित्री म्हणून पत्करायला किती नवमतवादी-किती उदार तरुण पुढे येतील याची शंकाच आहे. हा व्यभिचार नाहीं हे तोंडानें म्हणणे-फुकटची ही वाफ सोडणें कठीण नाहीं पण अशा मुलीनी असं वागून समाजाचा अनुभव घ्यावा म्हणजे त्यांना अशा वागण्या पासून सुख आहे कां दुःख आहे हे कळून येईल--हं; आतां 'समाजस्वास्थ्य राखण्याकरतां रुचीपालट करण्याचें ठरले तर

मग लग्न हा शिक्का तरी कशाला? नवरा आणि बायको हे नातें तरी कशा करतां?'सब एक' म्हणून राहिले कीं झालें! परंतु आपण खोलींत बसून बनवलेलीं मतें आणि प्रत्यक्ष जगाचा अनुभव यांत जमीन अस्मान इतकें अंतर आहे.

मोटार प्रमाणेंच आपण जो वेग द्यावा त्या वेगानें सुधारणा धावत असते पण त्या मोटारच्या वेगाला पूरक जसे पेट्रोल असते त्या प्रमाणे सुधारणे बरोबर ती पचवायला समाजाची तितकी संस्कृतीही उच्च बनावी लागते-मन तितकं उदार बनावं लागतं. समाजात स्त्रियानी वाटेल तसे स्वतंत्रपणानें वागावें हें बोलणें लिहिणें जितके सोपे आहे तितकें त्यांचे स्वातंत्र्य पचनी पाडण्याइतके खंबीर किंवा उदार मताचे किती पुरुष—किती सुधारक सांपडतील? नवीन कां होईना नीति पाहिजे पण ती नीति देखील जर अमर्याद वाहूं लागली तर जुने लोक तर त्याचा तिरस्कार करतीलच करतील पण सुधारक देखील विवाहापूर्वी ज्या मुलीनी स्वातंत्र्याचा गमती केल्या आहेत त्याच्याशीं एकदम विवाह लावायला कितपत तयार होतील हा प्रश्नच आहे. स्त्रियानी याचा अनुभव घेऊन पहावा म्हणजे समाज कसा आहे हे त्यांना तरी कळून येईल-त्यांचा अनुभव हा पुढे येणाऱ्या त्याच्या भगिनींना आदर्श होईल!

असं धरून चाला कीं सुधा आणि सुधाकर यांचा विवाह झाला; व ती दोघेहि पदवीधर आहेत. सुधा ही कॉलेजमध्यें असतांना तिचा अनेक विद्यार्थ्यांशीं संबंध आला. त्यावेळचा तो पत्रव्यवहार व स्नेह्याच्या बरोबर काढलेले गंमत म्हणूनचे फोटो जर सुधाकराच्या नजरेस आले तर सुधाकराची काय मनोवृत्ति राहील ? वेळेनुसार तो तिचा खून करण्यास प्रवृत्त होईल. आज आपल्या समाजांत थोड्याबहुत प्रमाणांत कां होईना ज्या शिकलेल्या तरुणतरुणींच्या आत्महत्त्या होत आहेत हें कशाचें द्योतक आहे ?

हे मासिक आणि वृत्तपत्रकारांनो—बेजबाबदार वल्गना करतां कशाला? हाच का धर्म म्हणून समाजाला दिमाख्यानें विचारणारांनो, हातांत आधुनिक गीता घेऊन नवी मतें, नवे विचार म्हणून घोषणा करणारांनो, बंधनाच्या पलीकडे धावणारांनो, अटकेपार दौड मारणारांनो—थोडा विचार करा—कीं, या तुमच्या बेजबाबदार विचारांनीं तुम्ही समाजांत कशी होळी पेटवीत आहांत ती!—बेजबाबदार, पोरकट, थिल्लर विचारांचीं पानें अशी किती दिवस लिहीत बसणार? तुमची शाई संपली तर तुम्हाला पैशाला पन्नास पुड्या मिळतील पण तुमच्या भडक रंगांनीं वेडावून गेलेल्या आईच्या बाळांचीं तोंडें लाखो रुपये ओतले तरी दृष्टीस पडतील का याचा सहृदय अंत:करणानें विचार करा. तुम्ही लिहीत असतांना तुमच्या अक्षराअक्षरां गणिक तुम्ही तरुणांच्या अंगांतील रक्ताचा प्रत्येक थेंबन् थेंब जमिनीवर ओतीत आहांत याचा कांहीं विचार? आज तुमच्या बेजबाबदार लिखाणामुळें प्रेमानें वेडावलेलें जीव काळोखांतून ठेंचा खात खात पोटांत गडबड करणाऱ्या गोळ्यांना घेऊन सैरावैरा धांवत आहेत, हें चित्र तुम्ही डोळ्याआड कसें करतां?

आज समाजापुढें 'अत्यंत जिव्हाळ्याचा' कोणता प्रश्न ठेवीत आहांत? तरुण, तरुणी आणि प्रेम, आणि त्यांच्या कामवासनांचे विचार! बस्स, हे दोनच विषय? जगांत दुसरें उच्च, पवित्र उदात्त असे विषयच नाहींत का? प्रेमाच्या प्रीतीच्या विषमतेपुढें तुम्हाला दुसरा सामाजिक अन्याय जुलूम दिसतच नाहीं कां?—तुम्हांला मजुरांची काळीं तोंडें दिसत नाहींत? तुम्हाला शेतकऱ्यांची हलाखी दिसत नाहीं? तुम्हांला तरुणांची बेकारी दिसत नाहीं? गाईचा संहार तिकडे किती कां होईना! ख्रिश्चन लोक हिंदूंची कितीका मुलें बाटवीनात! दारूचे गुत्ते सरकार तिकडे कितीका उघडेना! आमचा आपला मुख्य विषय म्हणजे 'स्त्री आणि प्रेम!' कां? तुमच्या पुस्तकांचीं कव्हरें, आंतील पानें याच विषयांनीं भरलेलीं?—स्त्री पावसांत भिजत असतांना

छत्री कशी धरते, किंवा हंसताना तिचे हात कसे दिसतात ही काय उच्च ध्येयें? पवित्र शिकवण ? कला? नीति ? या जगांत या व्यतिरिक्त पवित्र अशा आदर्श म्हणून ठेवण्यासारख्या गोष्टी घडल्याच नाहींत ? तुम्ही काय म्हणतां—मुलांमुलींनीं सहशिक्षण घ्यावें प्रेम करावें, मनाची करमणूक म्हणून पत्रव्यवहार ठेवावा ? फडके काय म्हणतां—आजच्या तरुण तरुणींनी अटकेपार जावें? बरोबर आहे—तुम्हांला कांहीं आतां अटकेची कटकट उरली नाहीं, तेव्हां मनाची हौस व लहर म्हणून परोपदेशे पांडित्य करायला काय होतें ? मरेना तो तिकडे समाज आणि खड्ड्यांत कां पडेनात ती तरुण तरुणीं! नवमत-वादी म्हणून पुन्हां प्रतिष्ठितपणा मिळतो तो निराळाच ! नवमतवाद मलाहि कबूल आहे पण केवळ स्त्रियांपुरता नवमतवाद मला मान्य नाहीं. स्त्रियांनी स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावा पण हें स्वातंत्र्य पचवून घेण्याइतका पुरुष उदार मताचा, सुसंस्कृत झाला आहे का ? वामनराव जोशी व्याख्यनांत बोलून गेले कीं तरुणतरुणींनीं पत्रव्यवहार ठेवावा !—त्या मुलींच्या लग्नानंतर जे पूर्ववयांतील पत्रव्यहार त्यांच्या नवऱ्यांच्या नजरेस आले तर असे किती उदार मनाचे नवरे सांपडतील कीं त्यांची मनें संशयानें ग्रस्त न होता तिकडे कौतुकानें पहातील ? आणि दुर्दैवानें उलट स्थिति झाली—त्या नव-ऱ्यानी संशयानी त्या बायकांचे हाल मांडलें तर अशा नवऱ्याना किती फटक्यांची शिक्षा वामनराव सुचवतात ! त्यांच्या आयुष्याच्या नाशाबद्दल कोण जबाबदार ? आज पुरुष जर बेइमान नसते, समाज जर सहृदयी असता, तर बालहत्या झाल्याच नसत्या ! नवमतवादाला वेडावून जाऊन बहकलेल्या, फसलेल्या, अज्ञात अशा किती तरी अबला असतील? पृथ्वीच्या पोटातून तो इतिहास केव्हां बाहेर निघेल तेव्हां नवमतवाद हा प्रेमानंद आहे कां--सुळावरची पोळी आहे ते कळून येईल ! नवमतवाद ह्मणजे स्वैर संचार कां ? ज्या तरुणींनी तरुण मुलांच्या सहवासांत असावें अशी नवमतवाल्यांची इच्छा आहे त्या तरुणांच्या नीतिमत्तेची, शीलाची कांहीं

सं.······
ता.

कसोटी? इंडिव्हिज्युअल फ्रीडम, प्रेम, कला, सौंदर्य, काव्य, निसर्गरमणीयता या वातावरणाभोंवती भोंवती गुंगत रहाण्याऱ्या तरुणींना नादी लावणारे तरुण सांपडणार नाहींत ? त्यांना तोंडघशी पाडून त्यांच्या आयुष्यची राखरांगोळी करणारे तरुण सांपडणार नाहींत? नवमतवादी समाजाला मोठे गमतीचे प्रश्न करतात. "तरुणतरुणींच्या एकांतातल्या भेटी हा व्यभिचार कसा ठरतो?"—दहा झाडावर उड्या मारणाऱ्या पक्षाला स्वैरसंचारी म्हटलें तर अन्याय होईल कां? खरी गोष्ट अशी आहे कीं, ज्या तरुण तरुणांचे एकमेकांवर प्रेम बसलें आहे तेंच एकांतात भेटी घेतलि! मनांतल्या गुप्त गोष्टींचा स्फोट होऊं नये म्हणूनच ते पत्रव्यवहार करतील; ज्या दोघांमध्यें प्रेमच नाहीं तें एकमेकाशीं सलगी करतील कशाला ? आणि पत्रव्यवहाराच्या भानगडींत तरी कशाला पडतील ? तेव्हां तरुण तरुणी एकत्र आल्या, पत्रव्यवहार सुरुं झाला तर त्यांत त्याच्या हातून प्रत्यक्ष पाप घडत नसले तरी घडण्याचा संभव अधीक म्हणून "स्त्रीशीं एकांत करुं नयें" असे कोणी म्हणाला तर त्यांत गैर काय ? बाकी आजचा नवमतवादाचा काळ सर्वंच उलटा, त्यांत कलंक ही शोभा ठरत आहे!-व्यभिचार ही नीति ठरत आहे. उल्लूपणाला स्वातंत्र्याचे गोंडस रुप देण्यांत येत आहे.

आजच्या सुधारणेच्या काळांत नवमतवाद्यांच्या दृष्टीनें स्त्रियांच्या बाबतीतला अत्यंत महत्वाचा असा जर कोणता प्रश्न असेल तर तो स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य हा होय. पूर्वीच्या काळांत तर होतेंच होते पण आजच्या काळांत ही स्त्रियांचे आयुष्य सर्वस्वी परावलंबी आहे. आणि त्या परावलंबनाचें दुष्परिणाम म्हणजे स्त्रियांच्या अंगीं अस्वाभाविक असे भित्रेपणाचें, सहनशीलपणाचें दुर्गुण आलेले आहेत, त्यामुळें त्यांची स्थिति अत्यंत अनुकंपनीय झाली आहे. नवमतवादी म्हणतात आज आपला देश पारतंत्र्यांत खिचपत पडला आहे यालाही हेंच कारण आहे. स्त्रियांच्या अंगी हे परावलंबित्व आल्यामुळें त्यांचें खरें कर्तव्य त्या विसरल्या

आणि " स्त्री ही गृहदेवता आहे–पति हाच स्त्रीला देव, अलंकार" असल्या खुळचट कल्पना त्यानीं आपल्या उराशीं बाळगल्यामुळें त्यांना कायमचें परतंत्रतेंत रहाणें भाग पडलें आहे.

साधारणतः या विषयाची त्रोटक चर्चा मागील प्रकरणांतून झालेली आहे. तरीपण आजच्या काळचा जो नवमतवाद्यांचा विचार त्याचें विवेचन समग्रतेनें होणें इष्ट आहे.

मागच्या आणि आजच्या दोन स्थितींचा विचार केला तर या दोन्ही दोन्हीं स्थितीत स्त्रियांचे श्रेष्ठपण, त्यांचे हित कोणत्या अवस्थेंत आहे याचा विचार प्रथम केला पाहिजे. स्त्रियांनीं पुरुषाशीं विवाह करून पुरुषांच्या तंत्रानें चालणें त्यांच्या जिवावर जगणें हें मानीपणाचें आहे कां त्यांनीं पुरुषाशी सहकारितां न करतां शिक्षण घेऊन, पैसा धंदा करून मिळवून स्वतंत्र आयुष्य काढणें मानाचे आहे ? आपण जशी कल्पना करावी तशी परिस्थिती निर्माण होत असते. कांहीं स्त्रियांना संसार करणें हें मानाचे वाटेल–त्यांत अपमान मानहानी दौर्बल्य कांहीं आहे असे त्यांना वाटणारही नाहीं.

संसार करायचा असं एकदां मनानं ठरवल्यावर तो करीत असताना त्यांत मिळणारे सुख जसे उपभोगावयाचें तसें प्रसंग आला तर दुःख ही सहन केलं पाहिजे. ज्या बाईला आपल्याला मुलं व्हावीत अशी इच्छा आहे तिनं प्रसूति वेदना होतात म्हणून कुरकुरून काय उपयोग ? त्या निमूटपणें सोसल्याच पाहिजेत. याला चांगलही स्वरूप देता येईल, वाईटही देतां येईल. आजच्या नवमतवाद्याना जो स्त्रियावर जुलुम म्हणून वाटतो तो स्त्रियांना आनंदही वाटुं शकेल; कारण तो खरोखर जुलूम नसतोच मुळी. ती गुलामगिरी नसतेच. त्याला परतंत्रता, परावलंबन म्हणणें म्हणजे त्याला जाणून बुजून विकृत स्वरुप देण्यासारखें आहे. पुरुषाला बायको पाहिजे असते म्हणून तो स्त्रीशीं लग्न लावतो. स्त्रीला सुखोपभोग, पुत्रलाभ पाहिजे असतो म्हणुन ती पुरुषाशी लग्न लावायला तयार होते. एकमेकाची गरज एकमेकाला असे।

म्हणून एकमेकाच्या तंत्रानं चालतं असतात. यांत परावलंबन कोठें आहे? ही प्रेमाची देवघेव आहे. यांत केवळ गुलामगिरीचीच दृष्टी कां ठेवावी? सर्वच पुरुष जर स्त्रियांना गुलाम समजत असते तर हे जगच चाललें नसतें. आजचे नवमतवादी समाजाचं खरं चित्र—त्यांतला चांगला भाग न रंगवता कुठं एखादी दिसणारी घाण त्यालाच प्रमुख स्थान देऊन सर्व समाज तसा आहे असं भासवण्याचा प्रयत्न करतात. पुष्कळ पुरुषांच्या मनांतही ही गोष्ट येत नसेल. आज प्रत्येक पुरुश जर स्त्रीला गुलाम समजूं लागला असता तर स्त्रियाकरतां ज्या नित्यनव्या वस्तू निर्माण होत आहेत त्या झाल्या नसत्या. पुरुष स्त्रिच्या बाबतींत इतका हौशी आहे कीं स्त्रीची मर्जी प्रसन्न करण्या करतां बाजारांत रोज नवीन वस्तूचा शोध करीत असतो. खरी स्थिती अशी आहेकी कोणी कोणाचा गुलाम नाही आणि प्रत्येकजण प्रत्येकाच्या गुलाम आहे. बायकानी स्वतंत्र राहून पैसा मिळवला म्हणजे त्या स्वतंत्र झाल्या हे म्हणणें साफ खोटे आहे. पैसा हे कांहीं सुखाचं सर्व साधन नव्हें. आणि पैसा हे सर्व सुखाचं साधन म्हंटले तरी तो मिळवण्या करतां आपणाला परतंत्र गुलाम बनावं लागतच ना? गुलाम हे कोणाचं तरी झाल्याशिवाय जगांत जगणच शक्य नाहीं, यांत स्वतंत्र बाणा तो कसला? शाळेची नोकरी पत्करली तरी त्यांत क्षणोक्षणी गुलामगिरी आहे. अधिकाऱ्यांची मर्जीही संभाळलीच पाहिजे. तुमच्या गरजा, आवडी या सर्व बाजूला ठेवल्याच पाहिजेत-निर्बुद्ध मशीन प्रमाणें तुम्हाला तुमचं आयुष्य एकाच सुरांत चालवलं पाहिजे तुमची चूक नसतानाही वरीष्ट रागवला तरी खाली पाहिलं पाहिजे-तुम्हाला रजा पाहिजे आणि ती वरिष्टाकडून मिळाली नाही तरी चुंब्रत गप बसलं पाहिजे. सर्व कायद्यानी तुम्ही बांधलेले-कितीं प्रकारची स्वतंत्रता मिळते? आणि एवढी धडपड करून तरी आपल्या सर्व गरजा भागतील एवढा पैसा हातीं येतो कां? कां जो मिळतो यांत समाधान मानून राहिलें पाहिजे,-पुन्हां अविवाहित रहाणें फार कठीण आहे!

उगाच पावित्र्याचाटेंबा मारण्यांत काय अर्थ आहे? मनुष्य आहे तर वळेन्सार त्याचे विकार प्रसंगानें जागृत होणारच. मग लोकलज्जेस्तव अब्रू जाईल म्हणून कोंडमारा करून घ्यायाचा प्रकृती बिघडवून घ्यायाची आणि आयुष्याची माती करून टाकायची किंवा चोरटे व्यवहार करून स्वातंत्र्याची ऐट मारायची त्यापेक्षां सरळ मार्गानें जाणेच योग्य नाहीं का? नोकऱ्या करणें हातरी जगातला अगदी श्रेष्ठ मार्ग म्हणून कोणी ठरवला? त्यालाही गुलामगिरी हेंच नांव आहे. त्यांतही मान हानी आहे. संसारांत एक तरी नवरा असतो, प्रसंग पडला तर एकट्याचेच काय आर्जव करण्याचा प्रसंग येईल तेवढा, नोकरींत रोज नित्य नवे नवरे–जो येईल त्याची मर्जी संभाळलीच पाहिजे—त्याच्या तंत्रानें चाललेच पाहिजे—जगांत जगायचें आहे तर जगाच्या तंत्रानें चाललेच पाहिजे. नवमतवाद्यांना समाजात वाटेल तसा धिंगाणा घालायला पाहिजे तर खुशाल घाला—समाज स्वास्थ्य जाहीर उपदेश करीत आहेच कीं नागवें नाचा! ज्याला नाचायची हौस आहे त्यांनीं खुशाल नाचावें पण त्याचा राग पुरुषांवर कां? पुरुषाशीं संसार करून बिचाऱ्या कुटुंबाचा—मुलाबाळांचा संसार सुखानें नांदवीत आहेत त्यांत बुद्धिभेद कां?

याचा अर्थ स्त्रियांना शिक्षण नको, त्यांनीं स्वाभिमानी राहूं नये असे कोणीही समजूं नये. पण ज्या योगानें शिक्षणाचा दुरुपयोग होणार नाहीं. भावी आयुष्यांत सुख लागेल तसें आयुष्याचें ध्येय ठरवलें पाहिजे. जुन्यांत सर्व वाईट आणि जे जे नवीन ते ते सर्व उत्तम ही जी नवमतवाद्यांची शिकवण ती प्रामाणिकपणाची असेल पण त्यांत सत्य फार कमी, अतिशयोक्तीच फार; नवमत वाद्यातलें एक उदाहरण म्हणजे स्त्रियांनीं रंगभूमीवर कामें करावीत कीं नाहीं हाच विचाराकरतां घेऊं. कला किंवा मनाची हौस म्हणून एखाद वेळ काम करणें निराळें आणि पैसे मिळविण्याकरतां धंदा म्हणून तो व्यवसाय पत्करणें निराळें; ज्यांत उत्कृष्ट कला आहे ते सुंदर असणारच.

पण ज्यांत फारशी कला नाहीं पण धंदा म्हणून काम करण्याची पाळी येतें तेथें कोणत्या स्त्रियांनीं कामें करावींत हा प्रश्न साहजीकपणें उद्भवतो. कारण कलावान जगाची पर्वा करीत नसतो धंदेवाल्याला तसे करून चालणार नाहीं. कलेपेक्षां लोकांच्या आवडीलाच त्याला महत्व देणें भाग पडतें. व लोकांची आवड म्हटली कीं ती सदभिरुचीला धरून असतेंच असें नाहीं. कै. श्री. कृ. कोल्हटकर, रा. केळकर यांचीं नाटकें अतीशय सुंदर असूनही रंगभूमीवर त्यांना वाव मिळत नाहीं आणि रा. माधवराव जोशी यांच्या तमाशावजा नाटकाना तिकिटें मिळत नाहींत.

आतां नाटकाचे धंद्यांत पडून पैसे मिळविणें ज्या स्त्रियांनीं ठरविलें आहे त्यांनीं ज्या कंपनीला भरपूर पैसा मिळतो अशाच कंपनींत जाणें हिताचें आहे—आणि तमाशेवजा नाटकें करणाऱ्या कंपनींत जर त्यांना दुर्दैवानें जाणें भाग पडलें तर स्त्रियांनीं रंगभूमीवर कामें करावींत कीं नाहीं या विचाराला किती महत्त्व येईल व त्यांचा हेतु किती प्रमाणांत सफल होईल याचा स्त्रियांनीं रंगभूमीवर कामें करावींत अशी शिफारस करणारांनीं विचार करावा. रंगभूमीवर काम करावें अशा विचारानें जी स्त्री त्या धंद्यांत पडणार ती सुशिक्षित सुसंस्कृत ( कल्चर्ड ) अशीच असणार. अर्थात् वरच्या दर्जाच्या भूमिका सोडून अंबूंगगूसारख्या रस्त्यावरच्या स्त्रीचे जर काम करण्याचा प्रसंग आला तर त्यांना एक निर्लज्ज तरी बनले पाहिजे किंवा हा नाद सोडला पाहिजे. आतां मन्वंतरसारखी एखादी कंपनी निघाली आणि त्यांत विशिष्ट हेतूनीं लिहिलेल्या नाटकांतून कांहीं मर्यादेपर्यंत कामें करण्याचा सुयोग आला तर तो समर्थनीय ठरेल आणि त्या दृष्टीनें सौ. वर्तक किंवा सौ. ज्योत्स्ना भोळे या खास स्तुतीस पात्र आहेत पण त्यांतदेखील त्याला पुढें पुढें निवळ धंद्याचें स्वरूप आल्यावर त्या कंपनीची फाटाफूट झाली. तेव्हां स्त्रियांनीं रंगभूमीवर मजेकरतां एखादवेळ कलेचें प्रदर्शन म्हणून

कामें केलीं तर तो एक कौतुकाचा भाग होऊन बसेल. पण धंद्यांत स्त्रियांनीं पडणें त्यांना कमीपणा आणणारी गोष्ट आहे.

वास्तविक स्त्रियांनीं रंगभूमीवर कामें करावींत कीं नाहीं हा समाजाने विचार करण्यासारखा प्रश्नच नाहीं. या गोष्टीवांचून समाजाचें कांहींच नडत नाहीं समाजाला कांहींतरी घटकाभर करमणूक पाहिजे असते ती स्त्रीकडून मिळाली काय आणि पुरुषाकडून मिळाली काय—तो या गोष्टीचा फारसा विचारच करीत नाहीं. स्त्रियांचीही स्थिति अशीच आहे कीं, जी खरी कलावान स्त्री आहे ती समाजाच्या विचाराची वाट पहात बसते कशाला ? तेव्हां हा समाजानें सोडवण्यासारखा सार्वत्रिक असा प्रश्न होतच नाहीं.

रंगभूमीवर नाचण्याची हाव धरणाऱ्या स्त्रियांना हे कळत नाहीं किंवा त्या त्याचा फारसा विचार करीत नाहींत किंवा पर्वा करीत नाहीं. आजच्या स्त्रियांची अशी स्थिति झालेली आहे कीं, त्यांनीं काय करावें आणि काय न करावें हें ठरविणें मोठें कठीण झालें आहे. त्यांना आज प्रत्येक गोष्टींत पुरुष होण्याची हाव सुटली आहे. त्याला समान हक्काचा गोड मुलामा त्यांनीं दिला आहे. रंगभूमीवर स्त्रियांनीं कामें करावींत कीं नाहीं याच्या बुडाशीं पुरुषाशीं स्पर्धा हीच भावना आहे. ' पुरुषांत विशेष काय आहे ' हा अहंकार ! आतां एकदम फारच निर्लज्ज कसे व्हावे म्हणून त्यांनीं एक उत्तम युक्ति शोधून काढली. त्यांनीं कलेचा बुरखा घेतला आहे. पण थोड्याच काळांत हा बुरखाही नाहींसा होईल अशी भीति वाटूं लागली आहे. शिवाय अलीकडे प्रत्येक कृत्यावर करून सवरून नामानिराळे होऊन त्यावर प्रतिष्ठितपणाचा शिक्का मुलाखतीच्या निमित्तानें मारला जात आहे. आणि त्यांत मग नीतीच्या शिष्टपणाच्या एकेक गप्पा ऐकाव्यात ! जशा कांहीं त्या म्हणजे कल्पना नसणाऱ्या लहान अल्लड पोरीच !—

नवमतवादांतहि जशी अनेक खुळे निघालीं आहेत तसेच संततिनियमनाचेंही एक खूळ निघालें आहे. वास्तवीक नवमतवादाची प्रत्येक बाब पाहिलें

तर त्याला कोठेंच नियमन नको आहे. बंधनं तोडलीं पाहिजेत. अटकेच्या पार गेलें पाहिजे—सीमा उल्लंघन केल्या पाहिजेत. जुन्या माळा तोडल्या पाहिजेत—वेशांतर झालें पाहिजे. पण या संततीच्या बाबतींत मात्र नियमन पाहिजे. कां तर त्यांत राष्ट्राचा खरा उद्धार आहे. टिळकमंदिरांत एका बाईचें संततिनियमनावर व्याख्यान होतें. बाई रोल्सराईज गाडी-तून अशा फ्याशनेबल कपड्यांत आली-मी त्या बाईला अत्यंत विनयानें म्हणालो "बाई आधी आपल्या मनाचे नियमन करा आणि मग संततिचे नियमनावर व्याख्यान द्या – विलायती माल वापरल्याने राष्ट्राचा उद्धार होईल कां ?"

स्त्रियांनीं संततिनियमन करावें कीं नाहीं हा आजकाल वादाचा प्रश्न आहे; आपण जितकें जास्त सुधारत जातो, विचारवान बनतो तितके आपण नकळत परतंत्र कसे होत जातो याचे हे उदाहरण आहे. आम्ही आपल्या मुलीची लग्नें कितव्या वर्षी करावीत याला कायदा कशाला? आमच्या संसाराला मुलें किती व्हावीत याला कायदा? जुलूम झाला बुवा!– त्यांत मुलगा झाला तर बरा, मुलगी झाली तर तिला जिवंत ठेवावी कीं नाहीं कायदा ? त्यापेक्षां आम्हाला गुप्त स्वेच्छाचार पाहिजे, आमची अब्रू बचवण्या करतां ते मुलांचे लिगाड नको असें नवमतवादी सरळ कां म्हणत नाहीत ? वास्तवीक ज्याना नियमन पाहिजे त्यानी एक गोष्ट केली कीं झाली-ब्रम्ह-चर्य पाळावें—नियमन झालेच-पण ते तर नको. स्त्री दाक्षिण्याचे ढोलगे तर बडवायाला पाहिजे–मग आडमार्ग स्वीकारणें इष्ट आहे का?

संतती नियमनापेक्षां भोगेच्छेला नियमन कां नसावें ? फार पोरे झाल्याने बायका मरतात अशी जर नाजुक अबलांची पुरुषाना कीव येतें तर त्यांनीं आपल्या पशुवृत्तीला आळा कां घालूं नयें?. बायकांवर जुलूम तरी कां करावा? ओझे उतरण्यापुरता जो हातभार लावावयाचा त्यापेक्षां त्यांना ओझे घालताच कां? ज्याना स्वतःचे मन आवरता येत नाहीं त्यांनीं संततीच्या

तरी आड कां यावें?– घटस्फोटाच्या मागणीनें एकाहून अधीक लग्ने कर-ण्याचा प्रयत्न कां? लग्न पाहिजे, बायको पाहिजे-ती हुकमात पाहिंजे-वाटले तेव्हां व वाटेल त्या वयांत तिचा उपभोग घेता आला पाहिजे-मग संततीनेच काय-पाप केले? संततीने जर राष्ट्राचा नाश होतो तर ब्रम्हचर्य न पाळल्यानेही राष्ट्राचा नाश नाहीं कां होणार? स्त्रीच्या मागें लागून जे श्रम, जो पैसा, जे तेज व्यर्थ खर्ची पाडायचें त्यापेक्षां कांहीं काळपर्यंत गृहस्थाश्रम केल्यावर सन्यासाश्रम राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें पत्करणें काय वाईट? पण छे; त्या बाबतीत वारा अगदीं उलट्या दिशेने व्हायचा. लग्नाला मर्यादाच नाहीं. त्यात जातगोत धर्म अधर्म स्वदेश विदेश पहायचे नाहीं-त्याला अटक नाहीं अटक मात्र कुठे तर संततीत!–खासा न्याय आहे. आणि हा स्वैर वृत्तीचा उपद्व्याप टाळण्याकरतां युक्त्या पण युक्त्या!– त्याकरतां केवढं मोठं लिटरे-चर प्रसिद्ध होत आहे! केवढ्या कल्पना!–केवढे शोध!– कधीं काळीं असे पुरुष निर्माण होणार आहेत, त्यांच्या डोक्यातून या कल्पना बाहेर पडणार आहेत अशी ब्रम्हदेवाला कल्पना असती तर त्यांने बायकांची तशी कांहीं व्यवस्था केली असती म्हणजे कृत्रीम उपायानी त्या नाजुक देहांचे हाल तरी झाले नसते!– पुरुषानें राक्षस रहायचें, स्त्रीने आपला उल्लूपणा सोडायचा नाहीं आणि समाजावर मात्र नाहीं नाहीं त्या खुळ्या कल्पनांचा मारा करीत रहायचे यांत राष्ट्राचा फायदा आहे कां तोटा आहे हे समाजानेच ठरवावें.

वास्तवीक खरी स्थिती अशी आहे कीं या संतती नियमनाच्या बाबतीत रिकामा न्हावी भिंतीला तुंबड्या लावी अशी स्थिति होउन बसली आहे आयाना मुले मुळीच जड झालेली नसतात आणि बिन मुलाचे लोक मात्र उगाच उर फोडून आपला जीव कासावीस करीत असतात! मुलांच्या घोळक्यांत आईला केवढा ब्रम्हानंद वाटत असेल ती आपल्या जिवाचें संसाराचे तारूं मुलांच्या जिवावर केवढ्या आशेनें हाकीत असेल? किती आयानीं आजपर्यंत समाजापुढें तक्रारी मांडल्या आहेत? उलट दोनचार मुलें झालीं कीं त्यांना

कोणाची दृष्ट लागूं नये म्हणूनच ती जपत असते. यावरुन पाश्चिमात्त्य लोकाना काय वाटत असेल ते असो आपण त्याचा फारसा विचार न करताना आपल्या पुरतें पाहिले तरी संततिनियमाचा समाजाने विचार करण्यासारखी परिस्थति निर्माण झाली आहे असे वाटत नाहीं.

संतति नियमनाच्या बुडाशीं काय आहे याचा जर आपण विचार केला तर विलायतचे हे खूळ इकडे कोणीतरी आणले आणि एकानें ढोलगे बडवले कीं जशी चार माणसे गोळा होतात तशी स्थिति या बाबतीत झाली आहे. एक काहीं तरी नवीन गोष्ट बोलला की त्याला टेकूं द्यायला दुसरा उभा रहातोच. पण समाजरचना शास्त्र वगैरेचा कोण बसतो विचार करीत? नवीन गोष्ट आहे ना-इंग्रज ती आचरणांत आणीत आहेना-बस ती चांगली असलीच पाहिजे. झाली सुरवात त्याचे अनुकरण करायला. संतती नियमनाचें असेच झालें. केवळ ती नवीन म्हणूनच त्याचा विचार न करताना समाजांतील नवविचाराच्या मंडळानी त्याचा पुरस्कार करण्याचें ठरवलें. त्याचा परिणाम मात्र विचित्र झाला आहे. त्या बाबतींत निश्चित मत काहींच ठरत नाहीं.

मूळ किंवा मुख्य वाट सोडली आणि निरनिराळ्या दिशेला जाणाऱ्या वाटा दिसूं लागल्या म्हणजे या वाटेने जावें कां त्यावाटेने-जावें अशी ज्याप्रमाणें माणसाची स्तिथि गोंधळून जाते त्याप्रमाणें आपण आपले जे मूळ ते सोडून परक्याचे चांगलें म्हणून घेत सुटलो त्याचा हा-परिणाम आहे. संततिनियमनाचा प्रश्न डोळ्यापुढें यावाच कां?— खरोखर हा निरुद्योगी लोकांचा उपद्व्याप आहे. लष्करच्या या भाकरी भाजणं आहेत. गरीबाच्या कुटुंबांत चार पोरे अधिक झाली म्हणून किति निपुत्रिक श्रीमंतानी आपल्या इस्टेटी त्यांना बहाल केल्या आहेत? ती कुटुंबें त्यांचा भार सहन करीत आहेत-उगाच नवीन नवीन सोंगें समाजात आणून स्रियांच्या देहांची विटंबना करण्यांत काय अर्थ आहे? अनैसर्गिक आचरण केव्हांही घातकच

ठरणारे आहे. घोडा भरधाव सोडून मग रेन खेचीत बसायचें त्यापेक्षा तो आपल्या चालीने जात आहे तसाच त्याला जाऊं देणें इष्ट आहे पाश्चिमात्य लोकांची रहाणी. आपल्या आचार आणि विचार याच्या अगदीं उलट असल्या कारणानी त्यांना कोणत्याही गोष्टीचा विधिविषेध नाहीं. कुटुंब संस्थेची ते फारशी पर्वा करीत नाहींत. लग्न होवो न होवो एकटे स्वतंत्र आयुष्य स्वतंत्र रीतीनें घालवण्याकडे त्यांची प्रवृत्ति, आणि त्या दृष्टीची त्यांनी आपली मनोरचना बनवली आहे. उत्सव प्रसंगी ते एकत्र जमले कीं त्यांचें नाचरंग पहावेत-कोणाची बायको कोणाजवळ नाचली तरी त्यांना त्याचें कांहीच नाहीं. ही मनोरचना आपल्या समाजावर लादणे-तसा समाज बनवण्याचा प्रयत्न करणें म्हणजे स्वेच्छाचाराला प्रवृत्त करणें यापलीकडे यांत दुसरा कोणता हेतु असणार ? सर्व आयुष्य सुटसुटीत पाहिजे मग पोराचें लेंढार पाठीमागें असल्यावर ते कसे जमणार—तेव्हां संतती नियमन आले-यापलीकडे यांत काहीं तथ्य आहे असे वाटत नाहीं. शहाण्या माणसानी या मूर्खपणाच्या कल्पनामागें धावूं नयें-स्त्रियांची जी नैसर्गिक पवित्र रहाणी आहे त्यावर भलभलते आघात करूं नयेत-त्यांना निष्कारण संकटात आणून त्यांचे आयुष्य धोक्यातं घालूं नयें-ज्यांना शिमगा करायची हौस आहे त्यांनी खुशाल नागवे हिंडावे शहाण्यानी या वेड्यांच्या नादीं लागूं नयें. ते संततिनियमन करोत नाहीं तर एकमेकाच्या बायका रुचिपालट म्हणून अदला बदल करून नंगानाच घालोत तसले समाजस्वास्थ्य, तसली 'स्त्री' सुधारणा त्यांनाच लखलाभ होवो!—सुविचारी आणि खरे समाजस्वास्थ्य खरोखरच टिकावे अशी ज्यांची इच्छा आहे त्यानी या समाजस्वास्थ्याकडे ढुंकून पाहूं नयें कारण समाजस्वास्थ्य मासिकातील विचारांनीं समाजस्वास्थ्य टिकणें बाजूलाच राहो-अस्वस्थतेच्या पलीकडे गोंधळ माजून राहील. ज्या घागरीला बूड नाहीं ती कोठें घरंगळत जाईल याचा काय नेम सांगावा? नंगानाचच तो. त्याचा अधिक विचारच न करणें बरें. नवमतवादात अनेक इतर गोष्टीचा ही अंतरभाव

होत आहे. स्त्रीपुरुषानी आपलें आयुष्य सहानुभूतीच्या, प्रेमाच्या, आधारें काढावें का त्याला कायद्याचें स्वरुप द्यावें, लग्न संस्कार असावा कीं त्याला करारावें स्वरुप द्यावें, पतिपत्नीमध्यें एकनिष्ठता असावी कीं घटस्फोटाच्या कायद्यानें त्यांचे जीवन आखले जावें वगैरे प्रश्न उद्भवतात. हे प्रश्न अर्थात महत्वाचे आहेत. याचा थोड्याबहुत प्रमाणात विचार मागील प्रकरणांतून झालेला आहे. त्यावरुन या विषयाच्या बाबतीत आमची विचार सरणी काय आहे याची वाचकाना कल्पना आलीच असेल. एका शितावरुन भाताची कल्पना येते. सर्वांचे सार एकच आहे. पाश्चिमात्य पद्धतीवर आपल्या आयुष्याची आखणी करण्याचा जो नवमतवाद्यांचा विचार आहे तो आम्हाला बिलकुल पटत नाहीं. कारण तो आमच्या पचनी पडणें शक्य नाहीं. उलट त्याच्या अंगिकारानें शरीरात एक नवीन रोग मात्र निर्माण होत आहे आणि तो आमचे सर्वस्व हरण करून आम्हाला चोहोबाजूनीं दुर्बल बनवीत आहे. पुष्कळअंशी बनवलेही आहे. हातात काठी धरल्याशिवाय आम्ही चालूं शकत नाही इतक्या अवस्थेला त्यांनीं आम्हाला आणून ठेवलें आहे. त्यातून आपली आपण कशी सुटका करुन घ्यावी हा आमच्यापुढे-अर्थात समाजापुढही प्रश्न आहे आणि त्याची यथोचित चर्चा व्हावी म्हणूनच स्त्रियाचा प्रश्न आम्ही चर्चे करतां पुस्तकरूपानें प्रकाशित करीत आहोत. क्रीयेला प्रतिक्रिया ही ठरलेलीच आहे. समाजाला सैरावैरा वाहू देणारे विचार जेव्हां समाजांत प्रसृत होऊं लागले तेव्हां त्याला कांहींतरी आळा बसावा म्हणून आम्ही हा प्रयत्न सुरूं केला आहें. तो एवढ्याच पुस्तकानें थांबणारा नाहीं. त्याला अधिक प्रकाशाची जरूरी आहे आणि त्या तयारीतच आम्ही आहोत.

ग्रंथालय
५३१८

पुढील पुस्तकें

# १ सत्यजीवन

# २ जीवनकलह

## प्रकाशित केलेली पुस्तकें.

| | | |
|---|---|---|
| १ | स्त्रियांचा प्रश्न. | किं. ८ आ. |
| २ | [illegible] | किं. १ रु. |

REFBK-0005318

ज. ना. टापरे,
८०२ सदाशिव, पुणें.